म. ग्रं. सं. ठाणे

म. ग्रं. सं. ठाणें.
विषय
सं. क्र. ८०५

REFBK-0002373

REFBK-0002373

. ठाणें
व्याकरण
५

# भाषा-प्रवेश

( दोन भाग )

लेखक

दत्तात्रय व्यंकटेश पै

किंमत १॥ रुपया.

पुर्तुगेज-मराठी भाषांतर-पाठमाला

पुस्तक १ लें.

# पुर्तुगेज भाषा-प्रवेश

( दोन भाग )


लेखक व प्रकाशक

दत्तात्रय व्यंकटेश पै.

शिक्षक— आल्मैद कॉलेज-फोंडें.



( या पुस्तकाचा पहिला भाग भारत प्रेस-केपें येथें आणि दुसरा भाग श्री आत्माराम मुद्रागार-फोंडें येथें छापला. )

मडगांव-गोंवा.

आगस्ट, सन १९२३

किंमत १॥ रुपया.



2363

REFBK-0002373

# पुर्तुगीज-भाषा-प्रवेश

## प्रस्तावना

गोमांतकाची राजभाषा पुर्तुगीज असल्यामुळें तिचें ज्ञान असणें प्रत्येक गोमांतकस्थाला आवश्यक आहे . पण पुर्तुगीजांच्या चार शतकांच्या दीर्घ अमदानींत त्यांच्या भाषेचें मार्मिक ज्ञान असणारे फारच थोडे हिंदु निपजले! गोव्यांतील हिंदु विद्यार्थी बुद्धिमत्तेच्या बाबतींत ख्रिस्ती विद्यार्थ्यांपेक्षां वरच्या पायरीचे आहेत असें सामन्यतः ह्मणण्यास हरकत नाहीं. पण एका पुर्तुगीज भाषेच्या अभावीं त्यांचें कोणत्याही बाबतींतील बुद्धिवैभव व तयारी दृष्टीगोचर होणेंही अशक्यप्राय होऊन जातें! हिंदु विद्यार्थी पुर्तुगीजीच्या ज्ञानांत कच्चे राहण्याचें एक महत्वाचें कारण हें आहे कीं, तिचें शिक्षण त्यांना आपल्या मातृभाषेंतून मिळत नाहीं व मिळवण्याचीं साधनेंही उपलब्ध नाहींत. ही साधनांची अडचण शक्य तितकी दूर करावी या हेतूनें **पुर्तुगीज-मराठी भाषांतर पाठमाला** या नावांखालीं, **पुर्तुगीज भाषा-प्रवेश** [ दोन दोन भागांचीं दोन पुस्तकें ], **पुर्तुगीज भाषेचे संप्रदाय** आणि **पुर्तुगीज भाषेंतील ह्मणी व सुबोधवचनें** [ त्यांचा मराठी अर्थ व प्रतिवचन यांसह ] अशीं चार पुस्तकें प्रसिद्ध करण्याचा मीं माझ्या मनाशीं संकल्प केला व त्या प्रमाणें कित्येक लिहून काढून, पहिलें-ह्मणजे प्रस्तुत-पुस्तक छापण्यासही सुरवात केली. त्या वेळीं माझी अशी अटकळ होती कीं, गेल्या सालच्या जून अखेर तरी तें विक्रीस तयार होईल व म्हणूनच तसें जाहिर करण्यांत आलें होतें. पण पुस्तककर्त्याचें दारिद्र्य, कौटुंबिक आपत्ती व छपाईच्या साधनांचा अभाव यांमुळें ती खरी ठरली नाहीं याबद्दल पुस्तकाच्या आगाऊ आश्रयदात्यांनीं त्याला क्षमा करावी .

प्रस्तुत जितका मजकुर या पुस्तकांत आला आहे त्याच्या निदान एक तृतियंशानें अधिक मजकुर देण्याचा मूळ विचार होता. पण इतका छापून निघण्यास जिथें दीड वर्षावर काल लोटला तिथें राहिलेला छापून पडण्यास किती वेळ लागला असता याचा वाचकांनींच विचार करावा ! तितका काळ ग्राहकांना तिष्ठत ठेवणें मला योग्य वाटेल नाहीं. तथापि मजकुर कमी करण्यापासून ग्राहकांचें आर्थिक नुकसान होऊं दिलें नांहीं हें त्यान किमतीवरून ताडलेंच असेल.

कोणत्याही भाषेच्या सामान्य ज्ञानांत तीन गोष्टींचा अंतर्भाव होतो:— शद्बोच्चार, शद्बार्थ आणि वाक्यरचना. एका भाषेंतील शद्बांचे उच्चार दुसऱ्या भाषेंतून जशाचे तसे देतां येणें शक्य व ह्मणून इष्टही नाहीं. सबब या पुस्तकांत दर शद्बाचा मराठींतून उच्चार दिलेला नाहीं. तथापि उच्चारांच्या बाबतींत सार्वत्रिक स्वरूपाचे जितके नियम देतां येण्याजोगे होते त्यांपैकीं बहुत्येक सर्व पहिल्या भागांत देण्यांत आले आहेत. शद्बार्थज्ञानासाठीं दुसऱ्या भागांत प्रत्येक पुर्तुगीज शब्दाचा, अर्थातच, मराठींतून अर्थ दिला आहे; शिवाय शद्ब देतांना अशी व्यवस्था करण्यांत आली आहे कीं, एकाच विषयासंबंधींचे शद्ब एका किंवा अधिक धड्यांमधून पण, एकत्र सांपडावे. उदाहणार्थ, ३ ऱ्या, ६ व्या व १० व्या धड्यांत, जनावरांसबंधींचे, ११ व्यांत रंगांसंबंधीचे, १६ व्यांत शारिरावयवांसंबंधींचे इ० पण एखादी भाषा लिहितां किंवा बोलतां येण्यास शद्बाचा नुसता अर्थ कळून भागत नाहीं तर वाक्यरचनेची माहिती पाहिजे. वाक्यरचनेंत शद्बांच्या अनुक्रमाला फार महत्व असतें, शिवाय वाक्यांमधील शद्बांच्या अनुक्रमाच्या बाबतींत, मराठी व पुर्तुगीज या दोन भाषांमध्यें फारच भिन्नत्व आहे. उदाहरणार्थ, पहिलींत क्रियापद नित्य वाक्याच्या शेवटीं येतें तर दुसरींत तें बहुधा मध्यें येतें. पहिलींत विशेषणें विशेष्याच्या आधीं येतात तर दुसरींत प्रायः नंतर येतात. आणि त्यामुळें आमच्या हिंदु विद्यार्थ्यांचें पुर्तुगीज भाषेच्या बाबतींत विशेष जर कोठें बिघडत असलें तर या शद्बानुक्रमाच्या बाबतींतच. ह्मणून या पुस्तकांत त्यावर पुष्कळच भर

देण्यांत आला आहे, दुसऱ्या भागांत अगदीं आरंभींच्या धड्यांपासून व्याकरणांतील नियम देतांनाच पुर्तुगिजीचें रचनावैशिष्ट्यही दाखवण्यांत आलें असून तें कायम लक्षांत रहाण्याकरितां त्याच नियमावरील अनेक शब्दप्रयोग व वाक्यें जुळवण्यास सांगितलें आहे.

एकच पुस्तक, विद्यार्थ्यांना, पाहिजे तर छोटासा शब्दकोश ( vocabulário )', पाहिजे तर पुर्तुगिजीचें मराठींतून व्याकरण व पाहिजे तर स्वयंशिक्षक यां नात्यानें उपयोगी पडावें असे तीन हेतु साधावयाचे असल्यामुळें व्याकरणांतील प्रकरणांचा सामान्य क्रम बदलावा लागला आहे. त्याच हेतूमुळें शब्दविचार व वाक्यरचना हीं निरनिराळीं न देतां समवायानें दिलीं आहेत. अभ्यासार्थ दिलेले कांहीं शब्दप्रयोग कर्णमधुर असे झाले नाहींत व पाठांचा विस्तारही प्रमाणशीर झालेला नांहीं. पण त्याचें कारणही वरील हेतुत्रयसिद्धि हेंच होय. व्याख्या देतांना शास्त्रापेक्षां समजूत लवकर पडण्याकडेच अधिक दृष्टी दिली आहे. एकंदरींत, ' थोड्यांत फार ' मिळावें व मिळालेलें कायम रहावें एतदर्थ, शिकवतांना आलेला अनुभव व पुस्तककर्त्याची अल्प बौद्धिक शक्ति यांना जें काय करतां येणें शक्य होतें तें करण्यास कसलीही कसूर करण्यांत आलेली नाहीं. व ह्मणूनच अशी खात्री देतां येईल कीं, प्राथमिक शिक्षणाचे किंवा लिसेवाचे विद्यार्थी यांस जसें हें व पुढील पुस्तकें पुष्कळच फायदेशीर होतील तसेंच, कोणाही लक्षपूर्वक व नियमानें शिकणाऱ्या इतर गृहस्थांस त्यांवरून एका वर्षाच्या आंतच सामान्य व्यवहारापुरतें पुर्तुगीज शुद्ध रीतीनें लिहितां व बोलतां आल्याशिवाय रहाणार नाहीं. या पुस्तकांत न आलेले— शब्दयोगी अव्ययांची योजना, भेद, प्रयोग, शब्दसिद्धि, पत्रव्यवहार पद्धति इ० — व येऊन अपुरे राहिलेले विषय, अर्थात्‌च, पुढील पुस्तकांत येतील.

परंतु, भाषाप्रवेशाचें दुसरें पुस्तक काय किंवा पुढील दोन्ही काय, प्रसिद्धीस येणें न येणें हें, गोमांतकीय बंधुभगिनीनीं, अपरिहार्य अडचणींमुळें राहून गेलेलीं अशुद्धें व इतर दोष असलेल्या या पहिल्या पुस्तकाच्या पहि-

त्याच प्रयत्नाकडे क्षमाशील दृष्टीनें पाहून त्यास आपला उदार आश्रय देण्यावरच सर्वस्वीं अवलंबून राहील !

शेवटीं, **श्री आत्माराम मुद्रागार** व **भारत प्रेस** यांच्या मालकांचे आणि ज्यांच्या सर्व प्रकारच्या साह्याशिवाय हें पुस्तक जन्मासच येऊं शकलें नसतें ते माझे मातुलद्वय ती. रा. **पुरुषोत्तम** व **जयवंत श्रीनिवास सुकेरकर**– मडगांव – यांचे जाहीर आभार मानल्याशिवाय माझ्यानें ही प्रस्तावना संपवतच नांहीं.

मडगांव, तां. १ आगष्ट सन १९२३ } **दत्तात्रय व्यंकटेश पै.**

# शुद्धिपत्र

## भाग २ रा.

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १० | १ | १ ल्या व २ ऱ्या | ३ ऱ्या व ४ थ्या. |
| १५ | ७ | अमेरिक | अमेरिका |
| १५ | १० | lisboense | lisbonęnse |
| १५ | १३ कॉलम १ व २. | आल्गार्व्हियु Algárvio | Algarve आल्गार्व्हि |
| १९ | ६ | वरील 'im;' नंतर 'o' हा स्वर पाहिजे | |
| २२ | २० | bençāo | bençāo |
| २३ | २ कॉलम २ मधील | äo किंवा es | āos किंवा ōes |
| २३ | | वरील नियम ३ ऱ्या वर "पाठ १५" अशीं अक्षेरं पाहिजेत. | |
| २५ | | वरील नियम ५ च्या वर " पाठ १६ वा" अशीं अक्षेरं पाहिजेत | |
| २८ | १८ | nonuplo | nónuplo |
| ३१ | १३ | brindoeira | brindoeiro |
| ३२ | १४ | Jambuleira | Jambuleiro |
| ३३ | ५ | empar | impar |
| ३८ | १७ | व आणि | आणि |
| ४१ | ७ | Adega | adega |
| ५५ | १६ | भविष | भविष्य |
| ५८ | ३१ | perticipio | participio |
| ६९ | १३ | eufastiais | enfastiaes |
| ७५ | ११ | मासणें | माणसें |
| ९६ | १ | जिरवणें, पचवणें | जिरणें, पचणें |
| ९७ | २४ | heroico | heróico |
| ९९ | ५ | unira | unirá |

| | | | |
|---|---|---|---|
| १०३ | १४ | caia | caia |
| १०६ | १४ | irm | irmă |
| १०६ | १४ | todo | todos |
| १११ | ९ | सोडवता | सोडवती |
| ११२ | २१ | êla | ela |
| ११३ | १ | झाले | झालां |
| ११३ | २४ | Socegada | Sossegada |
| ११४ | २२ | teus | tens |
| ११८ | १८ | Nos | Nós |
| ११८ | २७ | — | ला |
| १२२ | २८ | ( भाडीं ) | ( भांडीं ) |
| १२२ | ३० | vos | vós |
| १२४ | २७ | वर्षापुर्वी | वर्षांपूर्वीं |

# अनुक्रमणिका.

## भाग १ ला.


| | पृष्ठ |
|---|---|
| धडा १ ला—सर्वसाधारण माहिती. | १ |
| धडा २ रा—अक्षरांसंबंधीं. | ५ |
| धडा ३ रा—खुणांसंबंधीं | ६ |
| धडा ४ था—जोडाक्षरांसंबंधीं. | ७ |
| धडा ५ वा—वर्णांच्या उच्चारांसंबंधीं. | ८ |
| अ) स्वरोच्चार. | ९ |
| आ) संयुक्त स्वरोच्चार. | १२ |
| इ) अनुनासिक स्वरोच्चार. | १३ |
| ई) व्यंजनोच्चार-सामान्य माहिती. | १४ |
| ,, विशेष माहिती. | १९ |
| धडा ६ वा—शब्दांचे उच्चार—सा. माहिती | २० |
| एकावयवी शब्द. | २१ |
| अनेकावयवी शब्द. | २२ |
| विशेष माहिती. | २३ |
| धडा ७ वा—व्याकरण:— | |
| अ] सामान्य माहिती | २५ |
| व्याकरण—शब्द—संग्रह नं. १ | २६ |
| आ] वर्णविचार. | २६ |
| व्याकरण शब्द—संग्रह नं. २ | २७ |

व्याकरण शब्द-संग्रह नं. ३ २८
कांहीं शब्दांचे अर्थ. २८
खुणा व त्यांचे उपयोग. २९
विरामचिन्हें ३१
शब्द तोडण्यासंबंधीं. ३२
हातांनीं लिहावयाची इटालिक लिपी ३३

---

**चुकांची दुरुस्ती—** पृष्ठ ३ वर ओळ १५, १६ व १८ यांत क. ६८, ७० व ७७ असें आहे तेथें क. ६३, ६५ व ७२ V असें वाचावें.

# अनुक्रमणिका

## भाग २ रा.


| पाठ | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| १ ला. | नामें आणि गुणविशेषणें | १ |
| २ रा. | लिंगांसंबंधीं | ३ |
| ३ रा. | लिंगरूपांतर–प्रकार १ ला. | ५ |
| ४ था. | विशेषणांचें स्थान | ६ |
| ५ वा. | ,, ,, | ८ |
| ६ वा. | लिंगरूपांतर–प्रकार २ रा. | ९ |
| ७ वा. | ,, ,, | १० |
| ८ वा. | ,, ,, | १२ |
| ९ वा. | लिंगरूपांतर–प्र २ रा. व विशेषणांचें स्थान | १३–१५ |
| १० वा. | लिंगरूपांतर–प्रकार ३ रा. | १६ |
| ११ वा. | उजळणी | १७ |
| १२ वा. | लिंगनिर्णय | १९ |
| १३ वा. | वचनांसंबंधीं—वचनरूपांतर | २०–२१ |
| १४ वा. | वचनरूपांतर | २२ |
| १५ वा. | ,, | २३ |
| १६ वा. | वचन रूपांतर व वचनांसंबंधीं कांहीं सूचना | २५–२६ |
| १७ वा. | संख्याविशेषणें | २७ |
| १८ वा. | ,, | २९ |
| १९ वा. | ,, | ३१ |
| २० वा. | ,, | ३२ |

| | | |
|---|---|---|
| २१ वा. | सर्वनामें | ३४ |
| २२ वा. | पुरुषवाचक व दर्शक सर्वनामें | ३५–३६ |
| २३ वा. | सामान्य सर्वनामें | ३८ |
| २४ वा. | उजळणी | ४१ |
| २५ वा. | उपपदें [ Artigos ] | ४३ |
| २६ वा. | नियामक उपपदांची योजना | ४६–४८ |
| २७ वा. | सत्तावाचक सर्वनामें व नियामक उ० योजना | ५०–५१ |
| २८ वा. | क्रियापद | ५३ |
| २९ वा. | अर्थ व काळ | ५६ |
| ३० वा. | नियमित क्रियापदें–प्रथमगण–वर्तमानकाळ | ५९ |
| ३१ वा. | अपूर्ण भूतकाळ | ६१ |
| ३२ वा. | भूतकाळ | ६२ |
| ३३ वा. | अपूर्ण भविष्यकाळ | ६४ |
| ३४ वा. | साधा भविष्यभूत | ६५ |
| ३५ वा. | प्रथम गणाच्या क्रियापदांच्या लेखनाविषयीं | ६७ |
| ३६ वा. | वाक्यरचना | ६९ |
| ३७ वा. | नियामक उपपदांची योजना (पुढें चालू) | ७२ |
| ३८ वा. | शब्दांच्या जाती | ७५ |
| ३९ वा. | क्रियाविशेषणें | ७७ |
| ४० वा. | क्रियाविशेषणांचें स्थान | ८१ |
| ४१ वा. | उजळणी | ८३ |
| ४२ वा. | नियमित क्रियापदें–द्वितिय व तृतिय गण–वर्तमानकाळ | ८५ |
| ४३ वा. | द्वि. व तृ. गणाच्या क्रियापदांच्या लेखनाविषयीं | ८९ |
| ४४ वा. | तृतिय गणाच्या क्रियापदांच्या लेखनाविषयीं | ९२ |
| ४५ वा, | ,, ,, ,, ,, | ९४ |
| ४६ वा. | अपूर्ण व पूर्ण भूतकाळ | ९६ |

| | | |
|---|---|---|
| ४७ वा. | अपूर्णभविष्य व भविष्यभूत | ९८ |
| ४८ वा. | शब्दयोगी अव्ययें | १०१ |
| ४९ वा. | शब्दयोगी अव्ययें व उपपदें | १०४ |
| ५० वा. | शब्दयोगी अ० व पुरुषवाचक सर्वनामें | १०६ |
| ५१ वा. | अनियमित क्रियापदें–प्रथम गण | १०९ |
| ५२ वा. | अनियमित क्रियापदें–द्वितिय गण–Ser | १११ |
| ५३ वा. | Ter | ११४ |
| ५४ वा. | „ | ११७ |
| ५५ वा. | „ | ११९ |
| ५६ वा. | „ | १२१ |
| ५७ वा. | Haver | १२३ |
| ५८ वा. | „ | १२५ |
| ५९ वा. | अनियमित क्रियापदें–द्वितिय गण (पुढें चालू) | १२६ |
| ६० वा. | „ „ | १२८ |
| ६१ वा. | „ „ | १३० |
| ६२ वा. | अनियमित क्रियापदें-- तृतिय गण | १३१ |

## भाग २ रा.

## शब्दकोशांची अनुक्रमणिका

१ अंकांसंबंधींचे पृष्टें १८, १९, ३०, ३२ व ३३.
२ आजारांसंबंधींचे पृष्ट ११९.
३ आहुतांसंबंधींचे पृष्टें १२१ व १२२.
४ इमारतींच्या नावांसंबंधींचे पृष्टें ४१ व ४२.
५ कालासंबंधीचे पृष्ट १२५.
६ घरांतील सामानासंबंधींचे पृष्टें ३७ व ४१.
७ घराचे भाग पृष्टें ११६ व ११७.
८ दिशा व उपदिशा यांच्यासंबंधींचे पृष्ट ४७.
९ धंद्यांच्या नावांसंबंधीचे पृष्ट ४०
१० नात्यासंबंधींचे पृष्टें ६ व १०५.
११ पशु व पक्षी यांच्यासंबंधींचे पृष्टें ५, ९ ११ व १६.
१२ फळें व फळझाडें यांच्यासंबंधीचे पृष्टें ३१ व ३२.
१३ रंगांसंबंधींचे पृष्टें १३ व १७.
१४ व्याकरण--शब्दसंग्रह पृष्टें २, ४, २०, २८, ३५, ५७, ७१ व ७६.
१५ शरिरावयवांसंबंधांचे पृष्टें २१ व २५.
१६ शारिरिक व्यंगांसंबंधीचे पृष्ट ११३.
१७ शाळेंतील सामानासंबंधींचे पृष्टें ४१ व ४२.
१८ स्थलवाचक (कांहीं) नामें व त्यांच्यावरून येणारीं विशेषणें पृष्टें १४, १५, ४७ व ४८.

भाववाचक नामें, विशेषणें, क्रियाविशेषणें वगैरे संबंधींची अनुक्रमणिका दिलेली नाहीं.

प्राज्ञ ग्रंथ संग्रहालय... दा. क. २३६३

# पुर्तुगीज-भाषा-प्रवेश

## भाग १ ला.

### धडा १ ला.

### सर्वसाधारण माहिती.

**कलम १**– यूरोप खंडाच्यां नैऋत्य दिशेस पुर्तुगाल नावांचा एक देश आहे. तेथील लोकांस पुर्तुगीज लोक व त्यांच्या भाषेस पुर्तुगीज भाषा असें नांव आहे. एखाद्या भाषेंतील वर्णांच्या समुच्चयाला ' लिपी ' अशी संज्ञा असते. पुर्तुगीज भाषेला आपली स्वतःची अशी अनन्यसामान्य लिपी नाहीं. यूरोपखंडांतच ' रोमन ' ह्मणून जे लोक होऊन गेले त्यांनीं फार प्राचीन काळीं तयार केलेल्या लिपींचाच पुर्तुगीज भाषेंत उपयोग केला जातो. या लिपी दोन जातींच्या असून त्यांस ' रोमन व ' इटालिक ' अशीं नावें आहेत. रोमन लिपीचा उपयोग छापण्याकरतां व इटालिक लिपीचा हातांनीं लिहिण्याकरितां केला जातो. वाचकांचें विशेष लक्ष लागावें ह्मणून छापील लेखांतही कोठें कोठें इटालिक लिपीचा उपयोग करतात. त्या प्रत्येक लिपींत ' मोठी ' आणि ' लहान ' असे दोन प्रकार असून प्रत्येक प्रकारांत २६ वर्ण आहेत.

**कलम २** कोणतेंही विशेषनाम, वाक्याच्या आरंभींचा शब्द; पूर्णविराम, कित्येक वेळीं प्रश्नचिन्ह आणि उद्गारचिन्ह यांच्या लागोपाठ येणारा शब्द, आणि कवितेंतील प्रत्येक चरणाचा पहिला शब्द, इतक्यांचा पहिला वर्ण लिहिण्याकडे मोठ्या, आणि इतर ठिकाणीं लहान लिपीच्या वर्णांची योजना करतात. त्या चारही प्रकारच्या लिपींतील वर्ण, त्यांचीं नांवें व उच्चार पुढें दिल्याप्रमाणें आहेतः–

## कोष्टक.

| | वर्णांचें नांव | रोमन. | | इटालिक | | वर्णांचे उच्चार |
|---|---|---|---|---|---|---|
| | | मोटी | लहान | मोठी | लहान | |
| १ | आ | A | a | *A* | *a* | आ अ |
| २ | बे | B | b | *B* | *b* | ब् |
| ३ | से | C | c | *C* | *c* | क् स् |
| ४ | दे | D | d | *D* | *d* | द् |
| ५ | यॅ१ | E | e | *E* | *e* | यॅ ए अ् इ एय् |
| ६ | यव्ह् | F | f | *F* | *f* | जोरानें उच्चारलेला 'व्ह्' |
| ७ | झे२ | G | g | *G* | *g* | ग् झ् |
| ८ | आगा। | H | h | *H* | *h* | स्वतंत्र नाहीं. |
| ९ | ई | I | i | *I* | *i* | ई ए |
| १० | इयोत | J | j | *J* | *j* | ज् |
| ११ | का३ | K | k | *K* | *k* | क् |
| १२ | यॅल् | L | l | *L* | *l* | ल् |
| १३ | यॅम् | M | m | *M* | *m* | म् |
| १४ | यॅन् | N | n | *N* | *n* | न् |
| १५ | ऑ | O | o | *O* | *o* | ऑ ओ ॾ |
| १६ | पे | P | p | *P* | *p* | प् |
| १७ | के | Q | q | *Q* | *q* | क् |
| १८ | यॅर् | R | r | *R* | *r* | र् |
| १९ | यॅस् | S | s | *S* | *s* | स् झ् श् ज् [श् मिश्रित] |
| २० | ते | T | t | *T* | *t* | त् |
| २१ | ऊ | U | u | *U* | *u* | ऊ |
| २२ | व्हे | V | v | *V* | *v* | व्ह् |
| २३ | डब्ल्यू३ | W | w | *W* | *w* | व् व्ह् |
| २४ | ईीज | X | x | *X* | *x* | श् ज् (श् मिश्रित) क्स् स् |
| २५ | इग्रेगु३ | Y | y | *Y* | *y* | इ ई य् |
| २६ | झे | Z | z | *Z* | *z* | झ् श् ज् (श् मिश्रित) |

१ मराठी अगर पुर्तुगीज शब्दांतील ज्या अक्षरांच्या वर ˇ अशी खूण आहे त्यांचा उच्चार लांब करून नंतरच्या अक्षरांचा फार आंखुड करावा.

२ याचा उच्चार झ् व्यंजनांत श् मिश्रित असल्यासारखा होतो. हे सर्व उच्चार पुर्तुगीज जाणणाऱ्याकडूनच समजून घेणें बरें.

३ k w व y हे वर्ण हल्लीं शुद्ध पुर्तुगीज शब्दांत येत नाहींत पुर्तुगीजींत जे शब्द परभाषेंतून आलेले असतात ते जशाचे तसे वापरतानां मात्र हे वर्ण कायम ठेवतात. सबब पुर्तुगिजींत मूळ वर्ण फक्त २३ आहेत असें म्हणावें.

४ i व y यांच्या उच्चारांत मुळींच फरक नाहीं. ग्रीक लोकांनीं प्रथम उपयोगांत आणली ह्मणून तिला 'इग्रेगु', ह्मणजे ग्रीकांची ई, असें नांव पडलें.

५ पुर्तुगीजींत, ऋ ॠ ऌ ॡ ख घ च छ ज टवर्गातील सर्व थ ध ष ह् ळ क्ष ज्ञ हे उच्चार नाहींत.

६ वर सांगितलेल्या वर्णांचे दोन भेद आहेत:— स्वर आणि व्यंजनें a e i o आणि u हे स्वर व बाकीचे सारे व्यंजनें होत. (क. ६८, ७० पहा).

७ m व n हीं व्यंजनें अनुनासिक आहेत. f हा वर्ण औष्ठ्य नाहीं हें लक्षांत ठेवावें (क. ७७ पहा.)

---

## वाचनपाठ १ ला.

B P M E V D T N E O S Z C

G X J R L A H K I Q U W Y

---

*M D F Z X L K U B E T O Y*

*J A I W P V N S G R H Q C*

## वाचनपाठ २ रा.

खालील पाठ वाचा व त्यांतील स्वर आणि व्यंजनें सांगा:—

F J U I d b Q P W N t Q o

s h m z k e c i v g t y M N

V w t r P Q Z d b

---

c t s z b y j r l q a h k i x w

y d p o m e v u n f d b u v p h

---

## वाचनपाठ ३ रा.

खालील पाठ वाचा व त्यांतील स्वरांचे सर्व उच्चार सांगा:—

*V T P N K H E B C F I L O*

*R X U S Y M G A J K O D E*

*C I P U M A*

---

## वाचनपाठ ४ था.

खालील पाठ वाचा व त्यांतील व्यंजनांचे सर्व उच्चार सांगा:—

*c q k b s z j g x a v w i y p*

*f e d h l a m o r t u b m l p*

*q z h i n*

## वाचनपाठ ५ वा.

खालील पाठ वाचा व प्रत्येक वर्ण कोणत्या लिपीच्या कोणत्या प्रकाराचा तें सांगा:

*A* m c D e i *u* N *b* *j* X *a* *B* C

T *d* *M* *K* b A *r* M *b* *D* K *t* G v

Z H *G* L *F* p T S R P J g e i

F E n w j l A *A* A *a* a C H *g*

*j* *f* i I L *H* *k* N *P* m *s* *p* r s *Q*

B n ₒj E q *h* *F* u G *W* t *j* U *y* I x Y

---

## धडा २ रा.

### अक्षरांसंबंधीं

क. ३ मराठींत असो, पुर्तुगिजींत असो अगर दुसऱ्या कोणत्याही भाषेंत असो स्वरांखेरीज दुसरें एखादें अक्षर तयार करावयाचें असलें तर व्यंजनाला स्वर मिळविला पाहिजे. मराठींत व्यंजनाला, स्वर मिळवून अक्षर करावयाचें झालें तर व्यंजनापुढें जशाचा तसा स्वर लिहित नाहींत;तर व्यंजनाचें हंसपद [ वर्णाखालीं ्‍ अशी खूण असते ती ] काढून टाकतात व स्वराप्रमाणें काना, मात्रा अगर टोपी देतात. उ० 'प्' व्यंजनाला 'अ' स्वर मिळवून अक्षर करावयाचें झालें तर प् चें हंसपद काढून टाकलें ह्मणजे झालें. ब् ला ओ मिळवून अक्षर करावयाचें असतां ब् चें हंसपद काढून टाकलें व एक काना आणि एक मात्रा दिली म्हणजे बो असें अक्षर तयार होतें. परंतु पुर्तुगिजींत अक्षरें तयार करावयाचीं असतां त्या त्या व्यंजनापुढें तो तो स्वर जशाचा तसा लिहावा लागतो. उ० b [ ब् ] ला a 'आ' मिळवून 'बा' अक्षर तयार करण्याला b पुढें a म्हणजे ba असें लिहावें

### वाचनपाठ २ रा.

खालील पाठ वाचा व त्यांतील स्वर आणि व्यंजनें सांगा:—

F J U I d b Q P W N t Q o

s h m z k e c i v g t y M N

V w t r P Q Z d b

---

c t s z b y j r l q a h k i x w

y d p o m e v u n f d b u v p h

---

### वाचनपाठ ३ रा.

खालील पाठ वाचा व त्यांतील स्वरांचे सर्व उच्चार सांगा:—

*V T P N K H E B C F I L O*

*R X U S Y M G A J K O D E*

*C I P U M A*

---

### वाचनपाठ ४ था.

खालील पाठ वाचा व त्यांतील व्यंजनांचे सर्व उच्चार सांगा:—

c q k b s z j g x a v w i y p

f e d h l a m o r t u b m l p

q z h i n

## वाचनपाठ ५ वा.

खालील पाठ वाचा व प्रत्येक वर्ण कोणत्या लिपीच्या कोणत्या प्रकाराचा तें सांगा:

*A* m c D e i *u* N *b* *j* X *a* *B* C

T *d* *M* *K* b A *r* M *b* *D* K *t* G v

Z H *G* L *F* p T S R P J g e i

F E n w j l A *A* A *a* a C H *g*

*j* *f* i I L *H* *k* N *P* m *s* *p* r s *Q*

B n j E q *h* *F* u G *W* t *j* U *y* I x Y

---

## धडा २ रा.

### अक्षरांसंबंधीं

क. ३ मराठींत असो , पुर्तुगिजींत असो अगर दुसऱ्या कोणत्याही भाषेंत असो स्वरांखेरीज दुसरें एखादें अक्षर तयार करावयाचें असलें तर व्यंजनाला स्वर मिळविला पाहिजे. मराठींत व्यंजनाला, स्वर मिळवून अक्षर करावयाचें झालें तर व्यंजनापुढें जशाचा तसा स्वर लिहित नाहींत;तर व्यंजनाचें हंसपद [ वर्णाखालीं ् अशी खूण असते ती ] काढून टाकतात व स्वराप्रमाणें काना, मात्रा अगर टोपी देतात. उ० 'प्' व्यंजनाला 'अ' स्वर मिळवून अक्षर करावयाचें झालें तर प् चें हंसपद काढून टाकलें ह्मणजे झालें. ब् ला ओ मिळवून अक्षर करावयाचें असतां ब् चें हंसपद काढून टाकलें व एक काना आणि एक मात्रा दिली म्हणजे बो असें अक्षर तयार होतें. परंतु पुर्तुगिजींत अक्षरें तयार करावयाचीं असतां त्या त्या व्यंजनापुढें तो तो स्वर जशाचा तसा लिहावा लागतो. उ० b [ ब् ] ला a 'आ' मिळवून 'बा' अक्षर तयार करण्याला b पुढें a म्हणजे ba असें लिहावें

लागतें. अर्थातच d पुढें e लिहिला म्हणजे दे [ de ], f पुढे i [ fi ] लिहिला म्हणजे फी, m पुढें u [ mu ] लिहिला म्हणजे मू इत्यादि अक्षरें तयार होतात.

☞ [ पोर्तुगीज भाषेंत कांहीं वर्णांचे अनेक उच्चार आहेत. ते मागें दिलेल्या कोष्टकावरून विद्यार्थ्यांस कळलेच आहेत.तथापि, त्यांच्या उच्चारासंबंधीं माहिती दिली जाईपर्यंत, प्रत्येक वर्णास सर्वांआधीं दिलेला एकच उच्चार आहे असें धरून पुढील सर्व पाठ वाचावे. ]

— o —

## वाचनपाठ ६ वा.

ba be bi bo bu ca co cu da de di do du fa fe fi fo fu ga go gu ha he hi ho hu ja je ji jo ju la le li lo lu ma me mi mo mu na ne ni no nu pa pe pi po pu ra re ri ro ru sa se si so su ta te ti to tu va ve vi vo vu xa xe xi xo xu za ze zi zo zu

---

## धडा ३ रा.
### खुणांसंबंधीं

४ वर्णांच्या उच्चारांतील फरक दाखवण्याकरतां पुर्तुगिजींत ६ खुणा वापरतात. त्या अशाः— ´ ` ^ ¨ ˜ , पहिल्या ३ कोणत्याही स्वरांच्या, ४ थी फक्त i आणि u या स्वरांच्या, ५ वी फक्त a आणि o या स्वरांच्या वर आणि सहावी फक्त c या व्यंजनाच्या खालीं घालतात. a, e

व o यांचा उच्चार आ ऍ आणि ऑ असा आहे हें दाखवायाचें असतां ´ य खुणेची योजना करतात. a e आणि o यांचा उच्चार ए आणि ओ असा आहे हें दाखवायाचें असतां ^ या खुणेची योजना करतात. वर ˜ ही खूण असणाऱ्या a अगर o चा उच्चार अनुनासिक आहे असें समजावें. a, o अगर u याच्यापूर्वी c चा उच्चार स् कराया हें दाखवायाचें असतां त्याच्याखालीं , ही खूण घालतात. सर्व खुणांचीं नांवें व इतरांचे उपयोग प्रसंगोपात सांगितले आहेत.

---

## वाचनपाठ ७ वा.

cá sè pó pâ dê bô rã õ ça ço çu

xe vo p ı ru vi lô lã sê do pá

re tu mi ca çu pu go ça xo jo ça

co ji zu fi há võ du ra nu zi gá

---

## धडा ४ था.

### जोडाक्षरांसंबंधीं

५ मराठींत, जोडाक्षरें जशीं एका विशिष्ट प्रकारें लिहावीं लागतात तशीं पुर्तुगिजींत लागत नाहींत. दोन किंवा अधिक व्यंजनांपुढें एखादा स्वर लिहिला म्हणजे जोडाक्षर तयार होतें, उ० क्रा हें जोडाक्षर तयार करावयाचें असतां c व r यांच्यापुढें a हा स्वर लिहिला म्हणजे cra हें जोडाक्षर तयार झालें.

६ पुर्तुगिजींतील, ch, nh व lh यांस स्वर मिळून होणारीं जोडाक्षरें विशेषें करून लक्षांत ठेवलीं पाहिजेत. ch चा उच्चार श्, lh चा उ-

च्चार 'ल्य' सारखा व nh चा उच्चार 'ञ' सारखा होतो. ch हें फक्त लिहिणाच्या बाबतींत जोडाक्षर आहे, उच्चारण्याच्या बाबतींत नाहीं. nh व lh हे उच्चार मराठींत नसल्यानें ते पुर्तुगीज जाणणाऱ्यांकडूनच समजून घ्यावे.

७ x हें व्यंजन उच्चाराच्या बाबतींत कांहीं ठिकाणीं संयुक्त असतें.

---

## वाचनपाठ ८ वा.

cha tra de lha cti dma flu glo tra nhă

bre cli chu dmo fra grê cho psi lhe

gma tru pru lhu che psu grô fri dra

lhi djá cru nho bru nni gri chi fre

lho nhe gla pnó cra chu pró nhu vra

sta cza stro scru spro sfri

---

## धडा ५ वा.

### वर्णांच्या उच्चारां संबंधीं.

### सामान्य माहिती

८ कोणत्या वर्णाचा उच्चार कोणत्या ठिकाणीं कसा करावा या संबंधीं नियम ठरवणें कठीण आहे. कदाचित् ठरवले गेले तरी ते लक्षांत ठेवणें फार कठीण जाईल. सर्वसाधारण असे कांहीं नियम पुढें दिले आहेत. पण ते पुरेसे नाहींत. शिवाय त्यांस अनेक अपवादही आहेत. सबब ते ऐकूनच समजून घेणें भाग आहे.

९ येथें, विद्यार्थ्यांनीं वर्ण, अक्षर व अवयव यांमधील भेद लक्ष्यांत घेणें इष्ट आहे. ज्यांचा उच्चार पूर्ण होत नाहीं त्यांस व्यंजनें म्हणतात. हीं व्यंजनें व स्वर हे वर्ण होत. उ० l ( ल् ), m ( म् ), a ( आ ) u (ऊ). ज्यांचा उच्चार पूर्ण होतो तीं अक्षरं होत. स्वर हे अक्षरेंही आहेत; कारण त्यांचा उच्चार पूर्ण होतो. उ० o ( ऑ ), cra ( क्रा ), la ( ला ]. एकदम उच्चारतां येणाऱ्या वर्णांच्या समुदायाला अवयव असें ह्मणतात. उ० mar [मार cal [ काल् ], स्वर व अक्षरें हेही अवयव आहेत. कारण त्यांचा उच्चार एकदम होतो-

---

## वाचनपाठ ९ वा.

mal pôr sol vil fel côr mil til dar dôr
cal flôr lã paz mal rol el vêr gil
lar bal vir ril chá tur mór côr rir sêr

---

## अ ) स्वरोच्चार

### A व E

१० A चे उच्चार दोन आहेतः– आ व अ.

I ( १ ) शब्दाच्या शेवटीं असून वर ´ ही खूण नसेल तेव्हां, [ २ ] शब्दाच्या मध्यें असून मागच्या एखाद्या अवयवावर जोर असेल तेव्हां, [३] स्वतंत्र असून वर ^ ही खूण असेल किंवा कोणतीही नसेल तेव्हां, a चा उच्चार अ असा होतो. उ० lima ( लिम ], chícara [ शीकर ], â a (अ

II इतर ठिकाणीं आ असा उच्चार होतो. उ० ıta ( पात ) à [आ]. amar ( आमार ].

११  E चे उच्चार ५ आहेतः– यॅ ए इ अ व एय्.

I [१] वर ´ ही खूण असेल तेव्हां, [२] अन्त्य l च्या मागें असून वर ^ ही खूण नसेल तेव्हां व [३] इतर कित्येक ठिकाणीं यॅ असा उच्चार होतो. उ० café, batel, selar.

II (१) वर ^ ही खूण असेल तेव्हां व (२) एकावयवी शब्दांत पुढें r अगर z असून वर ^ अशी खूण नसेल तेव्हां व (३) इतर कित्येक ठिकाणीं ए असा उच्चार होतो. उ० sêda, bardês, ser, dever.

III (१) शब्दाच्या सुरवातीस असून वर कोणतीही खूण अगर पुढें अनुनासिक व्यंजन नसेल तेव्हां, (२) स्वतंत्र असून वर कोणतीही खूण नसेल तेव्हां, (३) दुसऱ्या स्वराच्या मागें असेल तेव्हां, (४) अन्त्य s च्या मागें असून वर कोणतीही खूण नसेल तेव्हां व (५) इतर अनेक ठिकाणीं इ असा उच्चार होतो. उ० educar, e, leal, males ( मालिश् )

IV [१] शब्दाच्या शेवटीं असून वर कोणतीही खूण नसेल तेव्हां, व (२) इतर कित्येक ठिकाणीं अ असा उच्चार होतो. उ० me, arte, pessoa, lenha.

V j च्या पूर्वी असणाऱ्या e चा उच्चार नित्य एय् असा होतो. उ० — veja, beja.

---

## वाचनपाठ १० वा.

aba cama alvará parta rapé delta éter cega chega sêde as sê mercê deter crer estar êste está tear ranes sales me tenha seja bela se dama dar néctar pá chalé avel a parte entre chaves de lema teôr Abel galé

## I O व U

१२ I चे उच्चार २ आहेतः– ई (अगर इ) व ए.

I एकाच शब्दामधील दोन एकमेकांलगतच्या अवयवांच्या अन्तीं असणाऱ्या दोन i पैकीं पहिल्या i चा उच्चार ए असा होतो. उ० visita (व्हेझीत). परंतु पहिला अवयव जर फक्त i असला तर ई असाच उच्चार होतो. उ० imita (इमीत).

II इतर सर्व ठिकाणीं इ (ऱ्हस्व अगर दीर्घ) असा होतो. उ०— lima, dali.

१३ O चे उच्चार ३ आहेतः– ऑ ओ व उ (ऱ्हस्व)

I (१) वर ´ ही खूण असेल तेव्हां (२) अन्त्य l अगर z च्या मागें असून वर ^ ही खूण नसेल तेव्हां व (३) इतर किंत्येक ठिकाणीं ऑ असा उच्चार होतो, avó, farol, algoz, optar.

II (१) वर ^ ही खूण असेल तेव्हां व इतर किंत्येक ठिकाणीं ओ असा उच्चार होतो. avô, hoje.

III शब्दाच्या शेवटीं अगर स्वतंत्र असून वर कोणतीही खूण नसेल तेव्हां व इतर कांहीं ठिकाणीं उ असा उच्चार होतो. उ० apto, o, dobrar, os

१४ U ला फक्त उ (ऱ्हस्व अथवा दीर्घ) असा उच्चार आहे उ०--curto, tribu.

१५ I आणि U हे दुसऱ्या स्वरांच्या पुढें असून त्यांचा एकदम उच्चार होत असला तर i व u यांची अनुक्रमें य् आणि व् असा उच्चार होतो. त्या दोन्हीं स्वराचा उच्चार ऱ्हस्व अथवा दीर्घ होणें हें शब्दांच्या अवयवांवर कमी-अधीकजोर असण्यावर अवलंबून आहे.

६८२३

### वाचनपाठ ११ वा.

lida fruta logo fero citar mó fará aral e dos gôdo o maná sêde funil féla solfa goza dote ó mina fogo rêde é dedo domar forja sêde Mardol doze dono íman súper estar ecla bola sol Dinís cofre côbro já calé os

---

### आ ) संयुक्त स्वरोच्चार

१६ दोन स्वरांच्या एकदम होणाऱ्या उच्चारास संयुक्त स्वरोच्चार व त्या स्वरांस संयुक्त स्वर असें ह्मणतात. पुर्तुगीजींत संयुक्त स्वरोच्चार फक्त ११ आहेत ते असे:-- ai au êi éi êu éu íu ôi ói ôu ui उ०-doido, muito

१७ इतर प्रकारें एकापुढें एक येणाऱ्या दोन स्वरांचा उच्चार निरनिराळा करावा लागतो. उ०- doer [ दुयेर ] soar (सुआर्)

१८ ou ei ui इत्यादि संयुक्त उच्चार असणाऱ्या दोन्हीं स्वरांचा उच्चार निरनिराळा करावा हें दाखवायाचें असतां i अगर u वर ˊ ही अगर ˊ ही खूण घालतात. उ० saúdade ( सावदाद् ), saída, miúdo.

---

### वाचनपाठ १२ वा.

dai cauto beira papéis feudo véu viu boi

herói douto fui cuidar soado cloaca soer
criar tear duelo saúde saíu proibir viúva
diúrno argüir paira moiro souto pau caíu
cairo doida caía caia paulo paúl

---

## इ ) अनुनासिक स्वरोच्चार.

१९ एखाद्या स्वराचा उच्चार अनुनासिक आहे हें पुर्तुगीजींत दोन प्रकारांनीं दाखवतातः— एक त्या स्वरापुढें m अथवा n घालून; व दुसरा, त्याच्या माथ्यावर ˜ ही til नांवाची खूण घालून.

२० (१) शेवटच्या अवयवावर जोर असणाऱ्या शद्बाच्या अंतीं, अगर [२] दुसऱ्या स्वराच्या मागें असणाऱ्या a चा अनुनासिक उच्चार til घालून दाखवताता उ० romã [ रोमां ] cão ( कांव् )

२१ ã नें संपणाऱ्या शद्बांचें वचनामुळें अगर दुसऱ्या कशाहीमुळें रूप बदलून पुढें एखादें व्यंजन आलें तरी til कायम राहतो romãs [ रॉमांश ] cãosinho [ कांव्झीञ्जु ]

२२ स्वराच्या मागें असणाऱ्या o चा उच्चारही til घालून दाखवतात. उ० põe ( क. ४ पहा )

२३ a, o अगर दुसऱ्या कोणत्याही स्वरापुढें b व p हीं व्यंजनें आलीं असतां m, आणि इतर कोणतींही व्यंजनें आलीं असतां n घालून त्या स्वराचा अनुनासिक उच्चार दाखवतात उ० amplo, bombas, ninfa tenta, tenda, cancro.

२४ कलम २० (१) मध्यें सांगितलेला प्रकार वगळून कोणत्याही अन्त्य स्वराचा अनुनासिक उच्चार पुढें m घालून दाखवतात उ० amam deram, viagem, Caim, dom, atum.

ग्रंथालय

२५ ज्या संयुक्त स्वरांचा उच्चार अनुनासिक होतो त्यास ‘ अनुनासिक संयुक्त स्वर ’ असें ह्मणतात.

---

### वाचनपाठ १३ वा.

manhă barão membro hombro contra manga
setim crente sabão măo măcheia aprenda
canfra templo em manhăs măi acção contar
vêm formam betim secção anca vogam
porém tumbar assim tom põem pões päes
sempre densa lanternim saùdam caibam
roubem caíssem dente mentem mantêm

---

### ई ) व्यंजनोच्चार.
#### सामान्य माहिती.

२६ b d f j l m n p t आणि v या दहा व्यंजनांस, कोष्टकांत सांगितल्याप्रमाणें, फक्त एकेक उच्चार आहे. अर्थात् त्यांच्या उच्चारांविषयीं कांहीं सांगावयास नको.

२७ एकच उच्चार असणाऱ्या व्यंजनांपैकीं राहिलें जें q त्याच्या बाबतींत हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, त्याच्या पुढें जेव्हां a, e, अगर i हे स्वर येतात तेव्हां त्या दोन्हींमध्यें u हा स्वर लिहिला पाहिजे.. उ. qa, qe, qi, असें केव्हांही लिहितां येत नाहीं. तर qua, que, qui असें

लिहिलें पाहिजे. quo व quu अशीं अक्षरें हल्लीं पुर्तुगेजींत वापरीत नाहींत.

२८ qua चा उच्चार नित्य क्वा असा होतो; प्रश्नार्थक सर्वनाम असतां que चा ऊच्चार कि, व इतर ठिकाणीं क् असा होतो. qui चा ऊच्चार नित्य की असा होत असल्यानें, जेव्हां क्वी असा उच्चार दाखवावा लागतो तव्हां u वर ´ ही खूण घालतात.

---

## C चे उच्चार

२९ ० दोन आहेत. क् स्.

I पुढें a o u हे स्वर व c l r t हीं व्यंजनें आलीं असतां क् असा होतो.

उ० capa copa cuco acceder clamor cravo facto ( cच्या पुढें इतर व्यंजनें येत नाहींत )

अपवाद– c च्या पुढें f व t असतां कित्येक वेळीं त्या c चा उच्चार होत नाहीं. मात्र आदल्या स्वराचा उच्चार त्याच्या पहिल्या ( कोष्टकांत दिलेल्या] उच्चाराप्रमाणें होतो. उ० recto, acção.

II पुढें a o uहे स्वर असून खालीं , ही खूण असेल तेव्हां आणि पुढें e व i हे स्वर असतील तेव्हां स् असा उच्चार होतो. उ० fôrça, fórço, açude, face, cedo, cidra, fácil.

३० c च्या पुढें e व i असतां त्याचा उच्चार स् होत असल्यानें कें व की हे उच्चार q या वर्णानें दाखवावे लागतात. ( क० २७ व २८ पहा. )

---

### वाचनपाठ १४ वा.

carta clube acre loiça ácido queda corpo
cloaca acto aço qualidade esquecer curto
lácteo açúcar quaresma choque recta sêco
cêrco séqüito química lacrau adjectivo teor
querer aquilo quilate cidra Jacobe

---

### G चे उच्चार.

३१ दोन आहेत:— ग् व j सारखा.

I पुढें a o व u हे स्वर व l m n व r हीं व्यंजनें असतां ग् असा उच्चार होतो. उ॰ gato gola gula globo dogma digno grato ( g पुढें इतर व्यंजनें येत नाहींत. )

II पुढें e व i असतां j सारखा उच्चार होतो. उ॰ gelo, giro

३२ पुढें e व i हे स्वर असतां g चा उच्चार j सारखा होत असत्यानें गे, गॅ, किंवा गी हे उच्चार, g आणि e अगर i यांच्यामध्यें u हा स्वर लिहून दाखवलेले असतात. guela guia ( u चा उच्चार निराळा करावयाचा असतां त्यावर ' अशी खूण घातलेली असते )

### वाचनपाठ १५ वा.

gama dogma agrado giral magro gula
aguçar dignar margem alguem algema globar
grama gema ogiva girar guarda àgüa guela
guiar gengiva geito gerar acção argüir

## R व S

३३ R चे उच्चार दोन आहेतः– ऱ् व र्.

I शब्दाच्या सुरवातीस, l n r व s या व्यंजनांच्या लगेच पुढें असतां ऱ् असा उच्चार होतो. उ० ramo melro honra ferro Israel.

II इतर सर्व ठिकाणीं र् असा होतो. caro ferir garça.

३४ S चे उच्चार चार आहेतः– स्, झ्, श् व j सारखा.

I दोन स्वरांच्या मध्यें, अगर मागें trans असून पुढें एखादा स्वर असतां झ् असा ऊच्चार होतो उ० casa [ काझ ] trânsito [ त्रांझितु ]

II शद्बाच्या शेवटीं. आणि c f q t p या व्यंजनांच्या पूर्वीं असतां श् अशा उच्चार होतो. उ० datas, escravo, fosfato, bosque, costa, hospedar

III b d g j l m n r v z या व्यंजनांच्या मागें असतां j सारखा उच्चार होतो. उ० desbotar, desde, musgo, as janelas, desleal, pasmo, asno, desregrado, desviar, os zelos.

IV इतर सर्व ठिकाणीं स् असा उच्चार होतो उ० sabão, ensino, verso, assolar.

---

### वाचनपाठ १६ वा.

rato gemro caso transigir escrever quiosque

desligar as-zebras assalto raio rio hum...

asneira grisalha desgraça órfão poucas piscar

cofres esfilar jasmim dos testa ressurgir

vigéssimo destro imerso desfaça sapato funís

esboço riso falso transacção jarro transeúnte

## X व Z

३५ X चे उच्चार सहा आहेत.:— श्, j सारखा, क्स्, स्, झ्, व is सारखा.

I शब्दाच्या सुरवातीस, (२) जव्हां s चा उच्चार श् होतो तेव्हां व इतर कित्येक ठिकाणीं श् असा उच्चार होतो. उ० xarope, excepto, extra, luxo.

II जेव्हां s चा उच्चार j सारखा होतो त्या वेळीं x चा उच्चारही j सारखा होतो, उ० calix-verde. ( असे प्रयोग पुर्तुगीजींत बहुत्येक नाहींतच ह्मटलें तरी चालेल ]

III इतर प्रसंगीं, केव्हां क्स्, केव्हां स्, केव्हां झ् व केव्हां is सारखा उच्चार होतो, हें वाचतां वाचतां समजून घेणें बरें. उ० fixo ( क्स् ) auxilio ( स् ) exigir, ( झ् ) ex-ministro [ is सारखा ]

३६ Z चे उच्चार तीन आहेत. झ्, श् व j सारखा

I ज्या वेळीं s चा उच्चार श् होतो त्या वेळीं z चा उच्चारही श् होतो. उ० paz, voz-passiva.

II ज्या वेळीं s चा उच्चार j सारखा होतो त्या वेळीं z चा उच्चारही j सारखा होतो- उ० felizmente.

III इतर सर्व ठिकाणीं झ् असा उच्चार होतो. उ० zelo, azedo

---

### वाचनपाठ १७ वा.

(श्) xairel xadrez exclusivo expedir extremo luxo

[क्स्] fixo nexo sexo fluxo axioma óxido

(स) auxílio próximo trouxe esdrúxula sintaxe rouxinol

(झ) exigir, exame exîmio exacta exagero faz foz noz voz luzir natureza baptizar capazmente

---

## विशेष माहिती.

३७. h ला स्वतंत्र उच्चार नांहीं. c l व n यांच्या पुढें असतां त्या तिन्हीं व्यंजनांच्या उच्चारांत फरक पडतो ( क. ६ पहा. ) h पुढें व्यंजन केव्हांही येत नाहीं. hoje, hidra वगैरेसारख्या शब्दांचा उच्चार अगदीं h नसल्याप्रमाणें करावा. h नें सुरू होणारे जे ल्याटीन भाषेतील शब्द पुर्तुगीजींत आले त्यांतच मात्र हा वर्ण राहिलेला आहे.

३८ आधुनिक पुर्तुगिजींत b c d f g j p q t व v हीं व्यंजनें शब्दाच्या अन्तीं असत नाहींत. पदांतीं असूं शकणाऱ्या l r s x व z यांच्या-उच्चारांसंबंधीं मागें सांगितलेंच आहे. पदांतीं असणाऱ्या m चा उच्चार म् असा न करतां मागच्या स्वरांचा अनुनासिक उच्चार करावा. (क.२४ अनुनासिक स्वरोच्चार पहा. ) पदान्तीं असणाऱ्या n चा ऊच्चार न् असा होतो उ० íman [ ईमन् ]; âmen, abdômen, gérmen.

३९ Club Jacob वगैरे सारखे कांहीं शब्द अजूनही आढळतात व त्यांतील अंत्य व्यंजनाचा उच्चारही करतात, तथापि त्यांचीं शुद्ध पुर्तुगीज रूपें clube, Jacobe. अशीं असलीं पाहिजेत.

४० r व s या दोन व्यंजनांशिवाय इतर कोणत्याही व्यंजनांचें द्वित्व पुर्तुगीज शब्दांत असत नाहीं. [ह्मणजे approvar, bello वगैरे सारखे शब्द लेखनदृष्ट्या अशुद्ध होते ]

४१ c या व्यंजनाचें द्वित्व होतें, पण दुसऱ्या c चा उच्चार नित्य स् सारखा असावा लागतो. अर्थात् तें c [ क् ] चें खरं द्वित्व नव्हे.

---

## धडा ६ वा.

### शब्दांचे उच्चार

सामान्य माहिती

४२ पुर्तुगीजींत, अनेकावयवी शब्दांचे उच्चार करतांना त्यांच्या कोणत्या तरी एका अवयवावर विशेष जोर द्यावा लागतो शब्द एकावयवी असतां, एखाद्यावर जोर मुळींच नसतो तर एखाद्यावर तो द्यावा लागतो. शब्द अनेकावयवी असतां, त्याच्या अन्त्य, उपान्त्य अगर ग्रुपान्त्याद्य [ उपन्त्याच्या आदल्या ] अवयावावर विशेष जोर द्यावा लागतो. या जोराला acento असें नांव आहे. सिद्ध शब्दांत उपान्त्याच्या आदल्या अवयवावर acento केव्हांही असत नाहीं.

४३ एखादा शद्ब कोणकोणत्या अवयवांनीं व प्रत्येक अवयव कोण-कोणत्या वर्णांनीं बनला आहे हें सांगण्याच्या क्रियेस soletrar ( सुलेत्रार ) असें ह्मणतात. तसें करण्याची पुर्तुगिजींत एक विशिष्ट पद्धति आहे. ती अशी कीं, शद्बाच्या पहिल्या अवयवांतील सर्व वर्ण सांगून त्यांनीं बनणाऱ्या अवयवाचा उच्चार करावा, नंतर दुसऱ्या अवयवांतील वर्ण सांगून त्यांनीं बनणाऱ्या अवयवाचा उच्चार करावा, आणि पहिला व दुसरा अवयव एकदम सांगावा. मग तिसऱ्या अवयवांतील वर्ण सांगून त्यांनीं बनणाऱ्या अवयवाचा उच्चार करावा व मागचे दोन्हीं आणि शेवटचा असे सर्व अवयव एकदम सांगावे. उ० acento हा शद्ब खालील प्रमाणें soletrar करावा:– आ, से यॅ यॅन् सन्, आसॅन्, ते ऑ, तॉ आसेंतु.

---

## ४४ एकावयर्वी शब्द

I एकावयवी शब्द a e o स्वरान्त अगर as es os नें संपणारा असून वर कोणतेही खूण नसेल तर त्यावर जोर असत नाहीं उ० a, e, o, da, mo, lhe, dos.

II एकाववर्वी शब्द a e o स्वरान्त अगर as es os नें संपणारा असून वर एखादी खूण असेल तेव्हां आण, i अगर u स्वरान्त किंवा व्यंजनान्त असेल तेव्हां त्यावर जोर असतो. cá fé dó si nu cal mar c.io.

---

## वाचनपाठ १८ वा.

( खालील पाठ soletrar करून वाचा व त्यांतील कोणत्या शद्वावर जोर आहे व कोणत्या शद्वावर नाहीं तें सांगा )

a nos das um que pois com é quão por qual luz seus ó tom te e vós trás sim eis ir fez tais á com meu qni cão quem de vos fel o te eu nó sā rās do quer tão crer faz se dois flôr pôr sons sou til de já nos nós

---

## अनेकावयवी शब्द.

४५ खालील वेळीं, अनेकावयवी शब्दाच्या अन्त्य अवयवावर जोर असतोः—

I एखाद्या संयुक्त स्वरानें संपत असतो तेव्हां उ. refutai, libertou

II अन्त्यावयवांतील a अगर o वर til असून मागच्या एखाद्या अवयवांतील स्वरावर ′ ही अगर ^ ही खूण नसेल तेव्हां उ० ancião antepõe catalões.

III l r z ins अगर uns नें संपत असून मागच्या एखाद्या अवयवांतील स्वरावर ′ ही अगर ^ ही खुण नसेल तेव्हां उ० mangueiral perder robustez espadins atuns.

४६ इतर वेळीं अन्त्य अगर उपान्त्याद्य अवयवावर जोर असतां, त्या त्या अवयवांतील स्वरावर ′ अशी अगर ^ अशी खूण घालून तसें दाखविलेलें असतें. उ० farás, estúpido, incêndio, íntegro (कलम ४८ पहा.)

४७ वरील दोहीं कलमांत सांगितलेल्या वेळांखेरीज इतर वेळीं शब्दाच्या उपान्त्य अवयवावर जोर असतो. मग त्यांतील स्वरावर खुणा असोत किंवा नसोत. उ० fruta, esperto, valoroso, órfão sêde, séde.

---

## वाचनपाठ १९ वा.

(खालील पाठ soletrar करून वाचा व त्यांत किती अवयव व कोणत्यावर acento आहे तें सांगाः—)

estudas séde enciclopédia arrátel séria lições

rematai antemão incêndio amisade esquálido

fâmulo maná pântano José avô ambulância
zângão fígado oficial tríbus íntimo órfãos
albuns romã cartaz aparência trêmulo átono
lanternins habilidade filosofia teólogo secção
bactereologista uníssono baluarte porém hábil
gramática fonologia morfologia homem

---

## विशेष माहिती.

४८ अनेकावयवी शब्दाच्या उपान्त्याद्य अवयवावर जोर द्यावयाचा असतां त्यांतील स्वरावर ´ ही अगर ^ ही खूण घालावी लागते असें मागें सांगितलें आहे. [ कलम ४६ ]

या बाबतींत नियम आहे तो असाः-- [ हा नियम अनेकावयवी शब्दाच्या अन्त्य अवयवास लागू नाहीं. त्यांवर ^ हीच खूण असते. ]

I जोर द्यावयाच्या अवयवांतील स्वर अनुनासिक असेल तेव्हां ^ ही व अनुनासिक नसेल, तेव्हां ´ ही खूण घालतात उ० êmfasi estúpido.

II अपवाद--- पण तो अनुनासिक स्वर जर i असला तर ´ हीच खूण घालतात. उ.० ìmpeto

४९ पुर्तुगीजींत उपान्त्य अवयवावर जोर असणाऱ्या शब्दांचाच भरणा विशेष असल्यामुळें त्या शब्दांच्या अवयवांवर खुणा वापरीत नाहींत. अर्थात् ज्या शब्दाच्या कोणत्या अवयवावर जोर द्यावयाचा हें खुणांनीं दाखवलेलें नसतें त्या शब्दाच्या उपान्त्य अवयवावर जोर आहे असें समजावें. तथापि

कोणत्याही अवयवांतील स्वरावर खूण नसलेल्या शद्बांच्या, कलम ४३ मध्यें सांगितलेल्या वेळीं, अन्त्य अवयवावर जोर द्यावा लागत असल्यामुळें, अशा शद्बांच्या, अन्त्य अवयवावर जोर न देतां तो उपान्त्य अवयवावर द्यावा असें दाखवायाचें असतां ´ ह्या अगर ^ ह्या खुणेची योजना करावी लागते. उ० arrátel carácter zângão.

५० अन्त्य अगर उपान्त्य अवयवावर जोर असलेल्या कित्येक शद्बांतील स्वरावर कोणतीही खूण नसल्यामुळें त्यांच्या उच्चारासंबंधीं संशय उत्पन्न होऊं शकतो. अशा प्रसंगीं ´ही अगर ^ही खूण घालून तें स्पष्ट करणें बरें असल्या मुळें तसें करण्यांत येत असतें. उ० sêde séde, túnis, funís.

ही खूण केव्हांही जोर दाखवण्याकरितां योजित नाहींत, e व o वर असतां त्यांचा उच्चार ॅ व ऑ असा करावा असें समजावें. i व u वर तिचें कार्य काय आहे तें मागें सांगितलेंच आहे.

---

## वाचनपाठ २० वा.

alemão saùdavel argùente trovejante beira

vossemecê frequência linguagem mingua

erremessei prudência mamífero eqùiparação

circulas pensão pensam convém noitibó

ciùmento proìbir margens ínfero influiu

mulhér funís límpido convém jacaré asníno

acção pneumático viola secção psicologia

pègar alguns accessível freqüente ância quadragéssimo lápis omnívoro retem prègado setins refazer ananás còrado beijamão.

---

Ou pensa despensar despensável indespensável pensabilíssimo despensabilíssimo indespensabilíssimo despensabílissismamente indespensabilíssimamente.

---

## धडा ७ वा.

## व्याकरण.

### अ ] सामान्य माहिती.

५१ वर्ण ह्मणजे अगदीं साधे ध्वनी अगर उच्चार.

५२ वर्णांच्या समुच्चयाला लिपी असें ह्मणतात.

५३ ज्या एक अगर अनेक वर्णांचा उच्चार एकदम होतो त्यांस अक्षर अगर ‘ अवयव ’ असें ह्मणतात.

५४ ज्या एक अगर अनेक अक्षरांपासून कांहीं **अर्थ उत्पन्न** होतो त्यांस शब्द असें म्हणतात.

५५ ज्या एक अगर अनेक शब्दांनीं एखाद्या वस्तूविषयीं कांहीं तरी सांगतां येतें त्यांस वाक्य असें ह्मणतात. हीं वाक्यें एका माणसाचे विचार दुसऱ्यास कळवण्यास साधनीभूत होतात ह्मणजे उपयोगी असतात.

५६ **भाषा** ह्मणजे एकाचे विचार दुसऱ्यास कळवण्याचें साधन.

५७ **शास्त्र** ह्मणजे एखाद्या विषयाचें यथार्थ स्वरूप दाखवणाऱ्या नियमांचा समुच्चय.

५८ **व्याकरण** ह्मणजे भाषेचें शास्त्र अगर भाषेसंबंधींच्या नियमांचा समुच्चय.

५९ व्याकरणाचे मुख्य भाग ३ आहेतः— वर्णविचार, शद्बविचार आणि वाक्यविचार.

६० ज्या भागांत वर्णांच्या उच्चारांसंबंधीं व त्यांच्या लेखनासंबंधीं नियम सांगितलेले असतात त्या भागास **वर्णविचार** असें ह्मणतात.

६१ ज्या भागांत शब्दांच्या रूपांसंबंधीं विवेचन केलेलें असतें त्यास **शद्बविचार** असें ह्मणतात.

६२ ज्या भागांत वाक्यें कशीं तयार करावीं व तीं कशीं जुळवावीं हें सांगितलेलें असतें त्यास **वाक्यविचार** असें ह्मणतात

**व्याकरण—शद्बसंग्रह नं. १**

वर्ण– fonema, letra. शास्त्र– sciência
लिपी-- alfabeto व्याकरण-- gramática.
अवयव– sílaba वर्णविचार-- fonologia.
शब्द-- palavra,termo शद्बविचार-- morfologia.
वाक्य-- oração, proposição वाक्यविचार-- sintaxe
भाषा– lingua, idioma.

---

## आ ) वर्णविचार.

६३ वर्ण दोन प्रकारचे आहेतः— स्वर आणि व्यंजनें.

६४ दांत, ओंठ, जीभ, कंठ व तालु यांच्यापैकीं कोणाशींही संबंध न येतां ज्यांचा उच्चार होतो त्यांस स्वर ह्मणतात. ( पुर्तुगिजींत स्वर फक्त ५ आहेत. a e i o व u ).

६५ ज्यांचा उच्चार होतांना, दांत, ओंठ, जीभ कंठ अगर तालु यांपैकीं कोणातरी एकाशीं संबंध येतो त्यांस व्यंजनें ह्मणतात. ( पुर्तुगिजींत व्यंजनें १८ आहेत. तीं कोणतीं तें मागें सांगितलेंच आहे ).

६६ ज्या वर्णांचा उच्चार करतांना नाकाशीं संबंध येतो त्यांस अनुनासिक वर्ण ह्मणतात.

६७ ज्या दोन स्वरांचा उच्चार एकदम होतो त्यांस संयुक्त स्वर ह्मणतात.

६८ ज्या संयुक्त स्वरांचा उच्चार नाकांतून होतो त्यांस 'अनुनासिक संयुक्त स्वर' ह्मणतात.

६९ a चा आ, e चा ॲ आणि o चा ऑ असा जो उच्चार होतो त्यास aberto उच्चार असें ह्मणतात.

७० a चा अ, e चा ए आणि o चा ओ असा जो उच्चार होतो त्यास fechado उच्चार असें ह्मणतात.

७१ e चा अ्, आणि o चा उ असा जो उच्चार होतो त्यास mudo उच्चार असें ह्मणतात.

७२ व्यंजनांचा उच्चार करतांना मुखाच्या ज्या भागाशीं संबंध येतो त्या भागावरून व्यंजनांचे ५ वर्ग पडतात:—

I ज्यांचा संबंध ओंठांशीं येतो त्यांस औष्ठ्य असें म्हणतात: b, p व m
II ,, ,, दांतांशीं ,, ,, दंत्य ,, ,, d n t r s z
III ,, ,, कंठाशीं ,, ,, कंठ्य ,, ,, c आणि g
IV ,, ,, तालूशीं ,, ,, तालव्य ,, ,, x j nh lh
V ,, ,, दांतांशीं आणि ओठांशीं येतो त्यांस दंतौष्ठ्य: f आणि v

७३ m आणि n हीं व्यंजनें अनुनासिकही आहेत.

## व्याकरण-शब्दसंग्रह नं. २

| | |
|---|---|
| स्वर-- vogal | ओंठ-- lábio |
| व्यंजन-- consoante | औष्ठ्य-- labial |
| अनुनासिक-- nasal | दांत-- dente |
| संयुक्त स्वर-- ditongo | दंत्य-- dental |
| अनुनासिक संयुक्त स्वर-- ditongo nasal | |
| कंठ्य-- gutural | उच्चार-- som |
| तालु-- paladar | aberto-- उघडा |

तालव्य- palatal fechado- झांकलेला
दंतौष्ठ्य- dento-labial mudo- मूक

७४ एकच अवयव असणाऱ्या शब्दास monossílabo असें ह्मणतात.
७५ एकापेक्षां ज्यास्त ,, ,, polissílabo ,, ,,
७६ दोनीपेक्षां ,, ,, ,, dissílabo ,, ,,
७७ तिनीपेक्षां ,, ,, ,, trissílabo ,, ,,
७८ तिनीपेक्षां ज्यास्त अवयव असणाऱ्या शब्दास अमुक इतक्या अवयवांचा polissílabo असें ह्मणतात.

७९ ज्या एकावयवी शद्वावर जोर नसतो त्यास palavra átona असें ह्मणतात.

८० ज्या शद्वाच्या अंत्य अवयवावर जोर असतो त्यास palavra aguda असें म्हणतात.

८१ ज्या शद्वाच्या उपांत्य ,, ,, ,, ,, त्यास grave.
८२ ,, ,, उपान्त्याद्य ,, ,, ,, ,, त्यास esdrúxula
८३ ज्या अवयवावर जोर असतो त्या अवयवास sílaba tónica असें म्हणतात.

### व्याकरण-शद्वसंग्रह नं. ३

monossílabo- एकावयवी शद्व sílaba tónica- जोर अ. अवयव
dissílabo- द्व्यवयवी शब्द अन्त्य- último-a
trissílabo- त्र्यवयवी शद्व उपांत्य- penúltimo-a
polissílabo- अनेकावयवी शद्व — उपांत्याद्य antepenúltimo-a

— = —

### कांहीं शद्वांचे अर्थ.

é -- आहे किंवा होय de, do, da- चा ची चें
um किंवा uma- एक dois अगर duas- दोन
o, a, os, as.- हीं उपपदें आहेत, त्यांस अर्थ नाहीं três-तीन

chamam-se- ह्मणतात, ह्मणवून घेतात
Ramá- रामा
estudante- विद्यार्थी
que-जो-जी-जें
tem= आहे
há, têm - आहेत
quatro- चार
que tem- ज्याला आहे-आहेत
mais de uma-एकापेक्षां ज्यास्त
em, no, na- अंत, मध्यें, (स० प्र०) वर
e - आणि, व.
número - अंक

---

## वाचनपाठ २१ वा.

( खालील पाठांतील शद्बांचीं अवयवांच्या संखेवरून व जोराच्या स्थानावरून नांवें सांगा. )

Gramática é a sciência da lingua. A palavra que tem acento tónico na última sílaba chama-se aguda. A palavra que tem mais de uma sílaba chama-se polissílabo. Um polissílabo de duas sílabas é um dissílabo. Há três acentos em português:— agudo, grave, e circunflexo. "E" tem três sons: aberto, fechado e mudo. Dois é um número. Ramá é um estudante. As palavras em que não há acento tónico chamam-se palavras átonas.

---

## खुणा व त्यांचे उपयोग.

८४ वर्णांच्या उच्चारांतील फरक दाखवण्याकारितां पुर्तुगिजींत ´ ` ^ ˜ , ¨ ह्या सहा खुणा वापरतात हें मागें सांगितलेंच आहे. कित्येक व्याकरणकार h या वर्णाचाही खुणांतच अंतर्भाव करतात. आणि त्याला स्वतंत्र असा उच्चार नाहीं हें लक्षांत घेतलें असतां त्यांचें म्हणणें बरोबरही

वाटतें. खुणांच्या उपयोगासंबंधीं प्रसंगोपात माहिती येऊन गेलीच आहे. तथापि ती सर्व एकीकडे सांपडावी म्हणून येथें फिरून देण्यांत येत आहे.

८५ पहिल्या तीन खुणांस acentos असें म्हणतात, ´ हिला acento agudo, ` हिला acento grave व ^ हिला acento circunflexo अशीं नांवें आहेत. ( acento याचा अर्थ ' जोर ' असाही होत असतो. तेव्हां हे acentos व जोर acento यांमधील भेद लक्षांत ठेवावा. हे acentos दृष्टीस पडतात; तो acento ऐकूं येतो )

८६ ˜ हिला til, ¸ हिला cedilha व ¨ हिला trema अशा संज्ञा आहेत.

८७ Acento agudo—(१) a, e किंवा o चे उच्चार aberto असून, ते स्वर ज्या अवयवांतील आहेत त्या अवयवावर जोर आहे हें दाखवतो

(२) i अगर u वर असतां, त्यांच्या उच्चारांत कांहीं फरक पडत नाहीं, तर ते स्वर ज्या अवयवांचे आहेत त्या अवयवांवर जोर द्यावा इतकेंच तो दाखवतो.

८८ Acento grave [१] a, e अगर o यांचा उच्चार aberto आहे, पण ते स्वर ज्या अवयवांतील आहेत त्या अवयवावर जोर मात्र नाहीं. असें दाखवतो. उ० còrado [ कॉराडु ]

(२) que, qui व gue, gui यांतील u चा उच्चार निराळा करावयाचा असतां त्यावरही घालतात. उ० equìtativo ( एकितातीव्हु ) ( याच कार्याकरतां पूर्वी trema योजित असत )

(३) एकापुढें एक असून संयुक्त उच्चार होऊं शकणाऱ्या स्वराचा उच्चार संयुक्त नाहीं हें दाखवण्याकरतांही पूर्वी trema घालित असत, पण आतां अशा वेळींही ह्या acento चा उपयोग करतात. उ० saüdades-saùdades ( सावदादिश् ). Trema चा आणखी उपयोग नव्हता व आतां तर तो उपयोगांत आणितच नाहींत.

८९ Acento circunflexo -- (१) a, e अगर o हे स्वर ज्या अवयवांतील आहेत त्यावर जोर द्यावयाचा पण स्वरांचा उच्चार मात्र fechado

करावयाचा हें दाखवण्याकरितां या acento ची योजना करतात. उ० fôlha.

(२) अनेकावयवी शद्वाच्या अंतीं असणाऱ्या em वर बहुतकरून जोर असत नाहीं, तो त्यावर द्यावा हें दाखवण्याकरतां acento agudo ची योजना करतात. आणि तशा शद्वांचें अनेकवचनी रूपही em नेंच संपत असल्यास ( असे शद्व फक्त क्रियापदें असतात ) दोन्हीं रूपांमधील फरक दाखवण्याकारतां अनेकवचनी रूपांवर acento circunflexo घालतात उ०- contém [ एकवचन ] contêm ( अनेकवचन )

(३) em नें संपणारा शद्व एकावयवी असला तर त्यावर जोर आपोआप असतो अर्थात् त्यावर acento agudo घालण्याची गरज नांहीं. तरी, अनेकवचनी रूपावर मात्र acento circunflexo घालतात उ० tem(ए.व.) têm ( अ. व. )

(४) शद्वाच्या उपान्त्याद्य अवयवावर जोर असून त्या अवयवांतील a, e,.o अगर u स्वर अनुनासिक असला तर त्यावर acento circunflexo घालतात.

९० Til व cedilha यांचे कलम ४ मध्यें सांगितलेल्यांखेरीज आणखी उपयोग नाहींत.

## विरामचिन्हें.

९१ या खुणांशिवाय पुर्तुगिजींत इतर भाषांप्रमाणें अर्थात्च विरामचिन्हें वापरतात. तीं कोठें केव्हां वापरावीं हें या भागांत सांगतां येत नसल्यामुळें त्यांचीं फक्त नांवें येथें दिलीं आहेत; तीं पाठ करावीं.

| | |
|---|---|
| . पूर्णविराम-ponto | ! उद्गारचिन्ह-ponto de exclamação. |
| , स्वल्पविराम-vírgula | “ ” अवतरणचिन्ह-aspas. |
| ; अर्धविराम--ponto e vírgula | – अपसारणचिन्ह--entrelinha. |
| ? प्रश्नचिन्ह-ponto de interrogação | ( ) कंस-parêntesis. |
| : अपूर्णविराम—dois pontos | - संयोगचिन्ह—hífen |

## वाचनपाठ २२ वा.

Quem és tu? Eu sou um estudante. Impostos, fome, desgraça, são o nosso qinhão; oh! Santa República! "Não te arreceis", disse o capitão. Os poemas épicos o Ramaiana, Mahābharat, Ilíada etc. são as produções dos escritores que estudaram e conheceram, sob todos os pontos de vista, a alma humana. Quito cultivou tambem o teatro com aplauso, é o autor da tragédia "*Segunda Castro*" [que inspirou a *Nova Castro* de J. B. Gomes].

## शद्ब तोडण्यासंबंधीं

९२ वाक्यें लिहितांना त्यांतील एखाद्या शद्बाचा कांहीं भाग, एक ओळ संपल्यामुळें, दुसऱ्या ओळीवर लिहावा लागतो, म्हणजे तो शद्ब तोडावा लागतो. परंतु तो कसाही तोडतां कामा नये. तर अवयवांप्रमाणें तोडला पाहिजे. उदाहणार्थ 'marinheiro' हा शद्ब लिहावयाचा असतां mar एके ओळीवर व inheiro दुसऱ्या ओळीवर किंवा marin एके ओळीवर व heiro दुसऱ्या ओळीवर असें लिहितां येत नाहीं: तर mari एके ओळीवर व nheiro दुसऱ्या ओळीवर किंवा marinhei एका व ro दुसऱ्या ओळीवर लिहिला पाहिजे.

आणखी एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, ज्या शद्बांत दोन एकसारखीं अक्षरें असतील त्यांतील एक अक्षर एका ओळीवर व दुसरें दुसऱ्या ओळीवर लिहावें लागतें. उदाहरणार्थ "travessa" हा शब्द लिहितांना trave एका ओळीवर व ssa दुसऱ्या ओळीवर लिहूं नये. तर traves एका व sa दुसऱ्या ओळीवर लिहावा. कारण त्या शब्दांत जे तीन अवयव आहेत ते tra, ve व ssa असे नसून tra, ves व sa असे आहेत. शद्ब तोडला आहे असें दाखवण्याकरतां पहिल्या ओळीवरील अवयवापुढें संयोगचिन्ह घालावें.

## वाचनपाठ २३ वा.

As armas e os barões assinalados
Que de ocidental praia Lusitana
Por mares nunca dantes navegados
Passaram inda alêm da Taprobana...
E aqueles que por obras valerosas
Se văo da lei da morte libertando
Cantando espalharei por toda a parte
Se a tanto me ajudar o eńgenho e a arte.

---

## हातांनीं लिहावयाची इटालिक लिपी

१३ पृष्ठ २ वरील कोष्टकांत दिलेल्या इटालिक लिपी व प्रत्यक्ष व्यवहारांत हातांनीं लिहावयाच्या इटालिक लिपी यांत थोडा फरक आहे. सबब त्या पुढें दिल्या आहेत. विद्यार्थ्यांनीं त्यांबरहुकूम नक्कल करण्यास शिकावें.

**मोठी**

*A B C D E F G H*
*I J K L M N O P Q*
*R S T U V W X Y Z*

**लहान**

*a b c d e f g h i j k l m n*
*o p q r s t u v w x y z*

**भाग १ ला संपूर्ण.**

# पुर्तुगीज भाषा-प्रवेश

## भाग २ रा.

# पुर्तुगीज भाषा-प्रवेश.

## भाग २ रा.

2363

### पाठ १ ला

#### नामें आणि गुणविशेषणें

१ **नाम**– ह्मणजे एखाद्या प्राण्याचें, पदार्थाचें अगर मनाच्या विकाराचें नांव. उ. मनुष्य, घोडा, दगड, पुस्तक, आनंद, राग.

२ **विशेषण**– ह्मणजे नामाचा गुण अगर संख्या दाखवणारा शब्द. (क. १२'s पहा) उ. **चांगला** घोडा, **पांच** पुस्तकें.

३ विशेषण ज्या नामाचा गुण दाखवतें त्या नामास, त्या विशेषणाचें **विशेष्य** असें ह्मणतात. उ. 'चांगला घोडा' यांत 'घोडा' हें नाम, चांगला या विशेषणाचें विशेष्य होय.

४ नामांचे, दोन निरनिराळ्या दृष्टींनीं दोनदोन भेद करतात:– एक दृष्टी, तें नाम एकाच वस्तूस लागू पडतें कीं अनेक वस्तूंस लागू पडतें हें पहाण्याची; व दुसरी दृष्टी, त्या नामावरून दृश्य अगर स्पर्श्य वस्तूंचा बोध होतो, कीं निव्वळ मनानें जाणतां येणाऱ्या वस्तूंचा बोध होतो हें पाहण्याची.

५ पहिल्या दृष्टीनें नामांचे दोन भेद होतात:–विशेष नामें आणि सामान्य नामें.

६ जीं नामें एकाच वस्तूस लागू पडतात तीं **विशेष नामें**. उ. महादेव, गोमांतक, फोंडें.

७ जीं नामें एकाच जातीच्या अनेक वस्तूंस लागू पडतात तीं **सामान्य नामें**. उ. दगड, घोडा, पुस्तक.

८ दुसऱ्या दृष्टीनेंही नामांचे दोन भेद होतात:– मूर्त व अमूर्त (अगर भाववाचक) नामें.

९ नामानें बोधल्या जाणाऱ्या वस्तु पहातां अगर स्पर्शितां येण्यासारख्या असल्या तर त्या नामांस **मूर्त** नामें ह्मणतात. उ. डोंगर, घोडा.

१० नामानें बोधल्या जाणाऱ्या वस्तु पहातां अगर स्पर्शितां येण्यासारख्या नसून केवळ मनानें जाणतां येण्यासारख्या असल्या तर त्या नामांस अमूर्त (अगर 'भाववाचक') नामें ह्मणतात. उ. राग, दुःख.

**विशेष सूचना** १– 'घोडा' या शद्बानें बोधली जाणारी वस्तु आपण पाहूं शकतों ह्मणून तो शद्ब एक मूर्त नाम आहे. आणि तो शद्ब त्याचे जातीच्या अनेक वस्तूंस लागू पडतो ह्मणून सामान्य नामही आहे.

## ६७ नामात्मक सामान्य सर्वनामें:-

cada qual=कोणीही. quem quer=पाहिजे तो, कोणीही. tudo=सर्व, सगळें. nada=कांहींहीन ninguem=कोणीहीन. alguem=कोणी एक. (क. ६३ पहा.) cada um(=प्रत्येक) या एकाच नित्य-नामात्मक सामान्य सर्वनामाला स्त्रीलिंगी रूप (coda uma=प्रत्येक) आहे.

**वि. सू. १४**– Ninguem व alguem हीं फक्त मानवांस लागतात. Mais अगर demais (=दुसरे, दुसऱ्या) या क्रियाविशेषणांचाही पुष्कळ वेळीं विशेषणात्मक सर्वनामाप्रमाणें उपयोग करतात; क्रियाविशेषणें असतां

त्यांचा अर्थ 'अधिक, फार' असा अर्थ होतो. 'एखाद्–दुसरा' हे um e outro असें करतात.

———o———

profissão धंदा

| | | | |
|---|---|---|---|
| alfaiate | शिंपी | ladrilhador | गवंडी |
| barbeiro | न्हावी, हजाम | lavandeiro, mainato | धोबी |
| caldeireiro | कांसार | médico | वैद्य डॉक्टर |
| canteiro | पाथरवट | mercador, comerciante | व्यापरी |
| carpinteiro | थवई, सुतार | mestre, professor | शिक्षक, अध्यापक |
| cirurgião | शस्त्रक्रिया करणारा वैद्य | ourives (ए. व.) | सोनार |
| cosinheiro | सैंपाकी | pastor | गुराखी. |
| ferreiro | लोहार, घिसाडी | pintor | चित्रकार. रंगारी |
| gravador | नक्षी कामकरणारा | relogeiro | घडयाळें दुरुस्त करणारा |
| jardineiro | माळी | rendeiro | भंडारी |

———

खालील शद्बांचें भाषांतर करा व त्यांतील सर्वनामें कोठें नामात्मक व कोठें विशेषणात्मक आहेत तें सांगा:—

Muitos homens e poucas mulheres. Ele e muitos outros. Ela e tantas outras raparigas. Certos comerciantes e alguns professores. Um barbeiro e uma cosinheira. Um certo médico. Nós e alguns outros cirurgiões Tu e todos demais carpinteiros. Eu e mais alguns ferreiros. Cada rapaz e cada rapariga. Qualquer gravador ou qualquer caldeireiro. Este ourives e outro quemquer. Alguns burros e nenhum cavalo. Uma linda e alta casa. Quaisquer pintores. Eu e mais alguem. Ela, tu e mais ninguem. Isto e nada mais. Tudo isto e mais aquilo. Ela e cada uma. Muita agua e pouco leite=(दूध). Esta e mais algumas. Alguns animais e nenhuma ave. Aquele rapaz e cada um. Esta

canteiro e poucos outros. Ambos os irmãos e ambas as irmãs. Todos êstes e mais alguns. Ambos nós e cada rapaz. Ambas elas e cada uma. Uma e outra.

## पाठ २४ वा

| | | | |
|---|---|---|---|
| Fábrica, edifício | इमला, इमारत | Artigo | जिन्नस, पदार्थ |
| Adega | वखार | alparcas | जुतीं, वहाणा |
| asilo | धर्मशाळा | aparo | टांक, चोंच, आपार |
| aprisco | मेंढवाडा | ardósia | स्लेट, पाटी |
| biblioteca | वाचनालय, ग्रंथसंग्रहालय | burracha | रबर |
| capela | ख्रिस्ती लोकांचें छोटें देऊळ | botão | बटण, बुतांव |
| castelo | तटबंदी असलेला राजवाडा | caderno | वही, चोपडी |
| cemitério | प्रेतें पुरण्याची जागा, स्मशान | camisa | खमीस, शर्ट |
| crematório | प्रेतें जाळण्याची जागा, स्मशान | caneta | पेन, लेखणी |
| convento | मठ | canivete | चाकू |
| correio | टपाल | casaco | अंगरखा, कोट |
| drogaria | औषधी वनस्पती विकण्याचें दुकान | casaca | पायघोळ अंगरखा |
| enfermaria | रोग्यांची सुश्रुषा करण्याचें गृह | chuva | पाऊस |
| escola | पाठशाळा | coisa | वस्तु, पदार्थ |
| estrebaria | पाग, अश्वशाळा | espanador | धूळ झाडण्याचा फडका |
| farmacia | औषधविक्रींचें दुकान | | |
| feitoria, fábrica | कारखाना | estrada | रस्ता |
| | | estrado | प्लॅटफॉर्म, टेबल ठेवण्याची चवई |
| fortaleza | किल्ला | | |
| igreja | ख्रिस्ती लोकांचें मोठें देऊळ | giz | खडू |
| imprensa, tipografia | छापखाना | guarda-sol | उन्हाळ्यांत वापरावयाची छत्री |
| lavatório | स्नानगृह | guarda-chuva | पावसाळ्यांत वापरावयाची छत्री |
| livraria | पुस्तकविक्रीचें दुकान, ग्रंथसंग्रहालय | livro | पुस्तक, ग्रंथ, चोपडी |
| | | luvas | हातमोजे |
| loja | दुकान | meias | पायमोजे |

| | | | |
|---|---|---|---|
| mesquita | मशीद. मुसलमानांचें देऊळ | objecto | पदार्थ, विषय |
| monumento | स्मारक, थडगें, छत्री, कबर | papel | कागद |
| museu | पदार्थसंग्रहालय | pena | लेखणी |
| oficina | कचेरी, कार्यालय | quadro preto | लिहिण्याचा फळा, बोर्ड |
| pagode | धर्मलंड लोकांचें देऊळ, ख्रिस्तीतरांचें दे० | régua | आंखणी |
| palácio | राजवाडा, सुंदर इमारत | sacola | पिशवी, जुगदान |
| poleiro | कोंबडया ठेवण्याची जागा | sapato | बूट |
| taverna | दारूचें दुकान, गुत्ता | sombra | छाया, सावली |
| tecelania | कापड विणण्याचे गृह | sombreiro | छत्री |
| telegrafia | तार ऑफिस | tinta | शाई |
| templo | देऊळ | tinteiro | दौत |
| tribunal | न्यायकचेरी | vara | काठी, दंड |

---

पुष्कळ इमारती पण थोडया शाळा. इतकीं पदार्थ-संग्रहालयें व इतकीं वाचनालयें! पुष्कळ पाणी आणि थोडें दूध. पुष्कळ दारू आणि थोडें पाणी. इतकी शाई आणि इतकें पाणी. थोडे राजवाडे व पुष्कळ ख्रिस्ती देवळें. प्रत्येक दौत आणि प्रत्येक लेखणी. कोणतीही वखार आणि कोणतींही दुकानें. कांहीं खुर्च्या व एक प्लॅटफॉर्म. कांहीं रुंद रस्ते व कांहीं मोठ्या इमारती. एक पुस्तक व कांहीं वह्या. एक विवक्षित फ्रेंच नागरिक व कोणी एक आफ्रिकनबाई. कोणी एक जर्मन विद्यार्थि व दुसरे कांहीं फ्रेंच विद्यार्थि. तो व प्रत्येक. हे उभय. त्या दोघ्यांही. हें सर्व. हा सगळा. कोणतीही वस्तु. आम्ही व इतर सर्व. तें व दुसरें. पुष्कळ चाकू व कांहीं पेनें. ही तांबडी शाई व तो पांढरा कागद. हें व दुसरीं पुष्कळ मोठीं रुग्णालयें. ते व दुसरे थोडे बेल्जियन व्यापारी. आम्ही दोघेही व प्रत्येक. त्या उभय व प्रत्येक मुलगी. ती व कित्येक दुसऱ्या पुर्तुगीज नटी. एखादी-दुसरी विद्यार्थिनी. हें व दुसरें सुंदर आणि उंच देऊळ. कांहीं पांढरे कागद व थोडे इतर जिन्नस. दोन रुंद हातमोजे व एक लांब पायमोजा.

---

## पाठ २५ वा.

### उपपदें (=artigos)

६८ दर्शक सर्वनामांतील o, a, os, as आणि सामान्य सर्वनामांतील um, uma, uns, umas यांस 'उपपदें' अशी विशिष्ट संज्ञा आहे. अर्थात, **उपपद** ह्मणजे एकाच जातीच्या अनेक व्यक्तींतून, एका किंवा अधिक विशिष्ट व्यक्तींविषयीं **विशिष्टत्वें** करून सांगितलें आहे कीं **सामान्यत्वें** करून सांगितलें आहे तें दाखवणारा शब्द.

६९ उपपदें, अर्थात्च दोन प्रकारचीं आहेत:— नियामक आणि अनियामक

I जें कांहीं सांगितलें आहे तें विशिष्ट व्यक्तीस अगर व्यक्तींसच लागू आहे असें दाखवणारीं तीं **नियामक** उपपदें (=artigos definidos) होत:— o, a, os व as

II जें काय सांगितलें आहे तें ठराविक व्यक्तीसच लागू नाहीं तर सर्वसाधारणपणें कोणाही अनिश्चित व्यक्तीस लागू पडूं शकेल असें दाखवणारीं तीं अनियामक (=artigos indefinidos) होत:— um, uma, uns व umas. उ० o livro आणि um livro. O livro याचा अर्थ, अमुकच एक पुस्तक, किंवा ज्याच्या संबंधीं आपणास अगोदर कांहीं माहित आहे असें पुस्तक. आणि Um livro याचा अर्थ एकादें किंवा कोणतें तरी एक पुस्तक.

**वि. सू. १५**— मराठींत उपपदें नसल्यानें पुर्तुगिजींतील उपपदांचें भाषांतर करणें अर्थात्च अशक्य आहे. मराठीची मांडणीच अशी आहे कीं, विशिष्टत्वें करून सांगितलें आहे कीं सामान्यत्वें करून सांगितलें आहे हें अर्थावरून आपोआपच समजतें. परंतु भाषांतर करतांना अर्थहानी होण्याचा संभव असला तर अनियामक उपपदाचें एक वचनांत 'एक' व अनेक वचनांत 'कांहीं' या शब्दानें आणि नियामक उपपदांचें "तो, ती, तें, ते, त्या तीं" या शब्दांनीं भाषांतर करतां येईल. मराठींत अशी सवलत आहे पण पुर्तुगिजींत ती बिलकुल नसल्यानें उपपदांच्या योजनेसंबंधींचे सर्व पाठ विद्यार्थ्यांनीं काळजीपूर्वक शिकावे.

**वि. सू. १६**– विशिष्टत्वें करून बोलावयाचें असतां नियामक व सामान्यत्वें करून बोलावयाचें असतां अनियामक उपपदें योजावीं असा जरी सर्वसाधारण नियम आहे तरी त्यावरून उपपदांच्या योजनेचा निश्चित बोध होत नाहीं. ह्मणून त्यासंबंधीचे कांहीं नियम पुढें दिले आहेत.

७० नियामक असोत अगर अनियामक असोत, दोन्हीं प्रकारचीं उपपदें नामांमुळें किंवा नामांकरतां येतात मग तीं नामांच्या मागोमाग असोत किंवा त्यांच्यामध्यें दुसरा किंवा दुसरे शब्द असोत उपपदांचीं रूपें, तीं ज्या नामांमुळें येतात त्यांच्या लिंगवचनानुसार बदलतात हें निराळें सांगण्याची गरज नाहींच.

---

## ७१ अ) नियामक उपपदांची योजना.

**नि. १** नियामक उपपदांची उत्पत्ति लक्षांत घेतां दर्शक किंवा सामान्य सर्वनाम मागें असणाऱ्या नामांबरोबर तें येऊं नये हें साहजिक आहे. तथापि, दोन दर्शक व दोन सामान्य सर्वनामांबरोबर नियामक उपपद योजावें लागतें. तीं वगळल्यास असें ह्मणतां येईल कीं दर्शक व सामान्य सर्वनाम मागें असणाऱ्या नामाबरोबर उपपद योजूं नये.

**नि. २** Mesmo व त्याचीं रूपें यांच्यामागें नियामक उपपद घातलें पाहिजे. उ० O mesmo livro e as mesmas lições= तोच ग्रंथ व तेच धडे.

**नि. ३** Outro किंवा त्याचीं रूपें हीं नामात्मक असतां मागें नियामक उपपद घालावें लागतें; विशेषणात्मक असतां लागत नाहीं. उ० 'हें पुस्तक व दुसरीं' असें ह्मणावयाचें असतां 'êste livro e os outros असें ह्मणावें लागेल, कारण येथें outros हें नामात्मक ह्मणजे livro या नामाच्या ऐवजीं आलेलें आहे. ( कांहीं व्याकरणकार या उपपदास पुरुषवाचक सर्वनाम ह्मणतात. ) परंतु, 'हें व दुसरीं पुस्तकें' असें ह्मणावयाचें असतां 'êste e outros livros' असें ह्मणावें लागेल. ह्मणजे यांतील outros हें livros याचें विशेषण अ-

सल्यानें उपपद घालण्याची गरज नाहीं.

नि. ४ Ambos अगर ambas या सामान्य सर्वनामापुढें नाम आलें असतां नियामक उपपद घातलेंच पाहिजे. मात्र तें नित्य, ambos अगर ambas च्या नंतर असावें लागतें, उ० ambos os hospitais e ambas as farmácias= दोन्हीं रुग्णालयें व दोन्ही औषधालयें.

नि. ५ Todo अगर त्याचीं रूपें नामाबरोबर आलीं असतां नि० उपपद घालावेंच लागतें. Todo आधीं व नाम त्याच्या नंतर योजावयाचें असतां, उपपद, सर्वनामाच्या नंतर घालावें लागतें. उ० Todo o homem. Todas as drogarias. Todos os grandes homens. परंतु todo नामांच्या नंतर असतां उपपद नामांच्या मागें येतें. उ० o dia todo, a fortaleza toda. ( थोडक्यांत असें ह्मणतां येईल कीं, todo बरोबर एखादें नाम आलें असतां उपपद घातलेंच पाहिजे व तें नामाच्या मागें असलें पाहिजे. )

---

खालील पाठांत जेथें उपपदें आहेत. तीं कोणत्या नियमान्वयें व जेथें नाहींत तेथें का नाहींत तें सांगा:—

A mesma caneta e o mesmo aparo. Os mesmos quadros pretos e as mesmas varas. Todas aquelas estrebarias e ambos êstes poleiros. Todas as grandes livrarias. Este sombreiro e os outros. Esta e outras casacas. Esta e ambas outras casas. Ambcs os lindos conventos. Os mesmos conventos e as mesmas freiras cristãs. Ela e ambas outras. Ambos os irmãos e ambas as irmãs. Todo o bom rapaz. Este e outros dois livros. Aquela camisa e as outras. Todos os lindos cavalos árabes. O correio todo.

तेच अंगरखे आणि तींच बटणें. तीच जोडी व तोच रस्ता. ह्या व इतर वस्तु. त्या छत्र्या व दुसऱ्या. या सर्व भ०य न्यायकचेऱ्या व सर्व तारऑफिसें. सर्व कागद व सर्व काळी शाई. तें देऊळ व दोन्हीं गुत्तं. दोन्हीं पिशव्या व दोन्हीं छत्र्या. दोन्हीं हंसतमुख मुलें. सर्व खोटे साक्षीदार.

तूं व ते दोघेही. हे विद्यार्थि व दुसरे. त्या व इतर सर्व मोठीं माणसें. हे फ्रेंच गृहस्थ व इतर सर्व. हा व दुसरा ग्रंथ. हे बूट व दुसरे. सर्व आंब्यांचीं झाडें व दोन्हीं केळीं. प्रत्येक चांगला विद्यार्थी व सर्व वाईट विद्यार्थिनी. ही बायको कीं दुसरी ?

---

## पाठ २६ वा.

| | | | |
|---|---|---|---|
| alcunha | उपनाम | Mahatmá, magnánimo | महात्मा |
| conquistador | राज्यसंस्थापक | matemático | गणितज्ञ |
| doutor | पंडित (वैद्याला व वकिलाला ही पदवी लावतात) | orador | वक्ता |
| | | pacífico | शांत |
| diplomata(g.) | मुत्सद्दी, राजकारणी | povoador | वसविणारा |
| eloquènte | मधुरभाषणी, चांगलें बोलणारा | sábio | ज्ञानवंत, विद्वान |
| erudito | विद्वान, बहुश्रुत | título | पदवी, उपनाम |
| escritor | लेखक | vencedor | विजयी |
| literato | वाङ्मयज्ञानी, विद्वान् | vice-rei | राजप्रतिनिधि, व्हाइस रॉय. |
| Lókmánia | लोकमान्य | | |
| aldeia | गांव | geografia | भूगोलवर्णन |
| areia | रेती, वाळू | monte | डोंगर, पर्वत |
| bairro | वाडा, पेठ | mundo | जग |
| barro | माती, चिकण माती | oceano | महासागर |
| capital | राजधानी (स्त्री.) | país | देश |
| cidade | शहर | província | प्रांत |
| concelho | तालुका | reino | राजसत्ताक राज्य |
| continente | खंड | rio | नदी, नद |
| distrito | जिल्हा | terra | पृथ्वी, जमीन, माती |
| estado | राज्य | | |
| terramoto | भूकंप | vento | वारा, वायु |
| império | साम्राज्य | vulcão | ज्वालामुखी पर्वत. |
| ponto cardeal | दिशा | ponto colateral | उपदिशा |

| | | | |
|---|---|---|---|
| पूर्व | Oriente, nascente, éste, levante | आग्नेय | Sueste |
| पाश्चिम | Occidente, poente, oeste, ocaso | नैऋत्य | Sudoeste |
| दक्षिण | Sul, meridião | वायव्य | Noroeste |
| उतर | Norte, septentrião | ईशान्य | Nordeste |
| स्वर्ग, आकाश | céu | यमपुरी, नरक | inferno |

## महासागर

| | |
|---|---|
| Árctico | आर्क्टिक |
| Antártico | अँटार्टिक |
| Atlântico | अॅटलांटिक |
| Pacífico | प्यासिफिक |
| I'ndico | हिंदी |

## समुद्र

| | |
|---|---|
| Mediterráneo | भूमध्य |
| Arábico | आरबी |
| Branco | पांढरा |
| Negro | काळा |

## नद्या

| | | |
|---|---|---|
| Ganges | गंगा | हिंदुस्थानांत |
| Bramaputra | ब्रह्मपुत्रा | |
| Saraswati | सरस्वती | |
| Mandovi | मांडवी | गोव्यांत |
| Zuari | झुवारी | |
| Cuxavati | कुशावती | |
| Nilo | नाइल (आफ्रिकेंत) | |
| Mississipi | मिसिसिपी | अमेरिकेंत |
| Amazonas | आमाझोन | |
| Volga | व्होलगा | युरोपांत |
| Danúbio | डानुबी | |
| Tejo | तेजु | |
| Douro | दौरु | |

## शहरें

| | | |
|---|---|---|
| Washington | वाशिंग्टन | अमेरिका |
| Nova-Yorca | न्यूयॉर्क | |
| Londres | लंडन | युरोप |
| París | प्यारिस | |
| Berlim | बर्लिन | |
| Lisboa | लिस्बोअ | |
| Cairo | केरो (आफ्रिकेंत) | |
| Bombaim | मुंबई | हिंदुस्थान |
| Calcutá | कलकता | |
| Dili | दिल्ली | |
| Nova-Goa | नवीन गोवें | |

## डोंगर

| | |
|---|---|
| Himalaia | हिमालय (हिंदुस्थान) |
| Alpes | आल्पस (युरोप) |
| Chendranata | चंद्रनाथ (गोवें) |
| Estrela | इश्त्रेल (पुर्तुगाल) |
| Orizaba | ओरिझाब (अमेरिका) |

## बेटें

| | |
|---|---|
| Madagascar | मादागास्कार |
| Nova-zelandia | न्यूझीलंड |
| Andamana | अंदमान |
| Angediva | आंजेदिव्ह |
| Groelandia | ग्रीनलंड |

| तळाव व सरोवरें | |
|---|---|
| Aral | आराल (आशिया) |
| Victória | व्हिक्टोरिया (अफ्रिका) |
| Veneza | व्हेनेझ (युरोप) |
| Superior | सुपिरियर (अमेरिका) |

| दुयम प्रतीचीं शहरें व गांव | |
|---|---|
| Margão | मडगांव |
| Mapuçá | म्हापसें |
| Raia | राय |
| Loutolim | लोटली |
| Pondá | फोंडें |

### व्यक्तिवाचक नामें

| | |
|---|---|
| Cícero | सिसरो (रोमन वक्ता) |
| Sócrates | सॉक्रेटीस (ग्रीस तत्ववेत्ता) |
| Demóstenes | डिमोस्थेनिस (ग्रीकवक्ता) |
| Shakespeare | सेक्सपीयर (इंग्लीश नाटककार) |
| Viassa | व्यास (हिंदी कवि व तत्वज्ञ) |
| Calidassa | कालिदास (संस्कृत नाटककार) |
| Napoleão | नेपोलियन (फ्रेंच वीर) |
| Guilherme | विलियम |
| Alfredo | आल्फ्रेड |
| Diniz | दिनिझ |
| Pedro | पेद्रु |

---

## ७२ आ) नियामक उपपदांची योजना (पुढें चालू)

**नि ६ वा**— सामान्यतः व्यक्तिवाचक विशेषनामांबरोबर उपपद घालित नाहींत तथापि खालील ४ प्रसंगीं व्यक्तिवाचक नामाबरोबर नियामक उपपद घातलेंच पाहिजे:—

I व्यक्तिवाचक नामामागें एखादें गुणविशेषण असतें तेंव्हां: उ० O eloqüente Cícero. O valente Napoleão. (अशा वेळीं उपपद विशेषणांच्या मागें येतें हें लक्षांत ठेवावें)

II व्यक्तिवाचक नामाच्या मागें अगर पुढें त्या व्यक्तीची पदवी असते तेंव्हां त्या पदवीच्या मागें. उ० O Doutor Bhandarcar, O

Mahatmá Gandhi, D. Diniz o Lavrador, Alfredo o Grande.

III व्यक्ति फार परिचयाची आहे असें दाखवायाचें असतें तेव्हां. उ० o Rama, a Aurora.

IV व्यक्तिवाचक विशेषनामांचें अनेक वचन होतें तेव्हां. ( क. ४३ V पहा ) उ० Os Gandhis nascem sempre raros=गांधी केव्हांही झाले तरी थोडेच निपजावयाचे, Leio o Gadcari=मी गडकरी ( गडकऱ्यांचा ग्रंथ ) वाचित आहें.

नि. ७ वा– लिपींतील अक्षरें, खंडें. बेटें, डोंगर, महासागर, समुद्र, नद किंवा नद्या, साम्राज्यें, व तलाव किंवा सरोवरें यांच्या विशेषनामांच्या मागें नियामक उपपद घालावें लागतें. उ० A Ásia, A Groelândia, O Himalaia, O Atlântico, O mar Arábico, O Ganges, A China, O Aral.

नि. ८ वा– राष्ट्रें, राज्यें व प्रांत यांच्या विशेषनामांच्या मागेंही उपपद घातलें जातें. उ० O Japão, A India, os Estados Unidos. परंतु या नियमास बरेच अपवादही दिसून येतात. उ० Portugal, Marrocos, Guatemala, Gôa.

नि. ९ वा– शहरें किंवा गांव यांच्या विशेषनामांच्या मागें उपपद बहुधा घालित नाहींत. उ० Paris, Lisbôa, Bombaim, Nova-Gôa, Margão इ० तथापि जीं स्थलवाचक विशेषनामें सामान्य नामांवरून आलीं असतील त्यांच्यामागें उपपद घालावें लागतें उ० o Pôrto, a Raia, o Rio de Janeiro इत्यादि.

नि. १० वा– दिशा व उपदिशांपैकीं खालील दिशांच्या नावांमागें उपपद घालावें लागतें. o Oriente, o Nascente, o Levante; o Occidente, o Poente; o Norte, o Septentrião; o Sul, o Meridião.

---

खालील पाठांत असलेलीं उपपदें कोणत्या नियमान्वयें आलीं आहेत तें सांगा:–

O grande poeta Calidassa; Alfredo o Grande; D. Afon-

### तलाव व सरोवरें

| | |
|---|---|
| Aral | आराल (आशिया) |
| Victória | व्हिक्टोरिया (आफ्रिका) |
| Veneza | व्हेनेझ (युरोप) |
| Superior | सुपिरियर (अमेरिका) |

### दुयम प्रतीचीं शहरें व गांवें

| | |
|---|---|
| Margão | मडगांव |
| Mapuçá | म्हापसें |
| Raia | राय |
| Loutolim | लोटली |
| Pondá | फोंडें |

### व्यक्तिवाचक नामें

| | |
|---|---|
| Cícero | सिसरो (रोमन वक्ता) |
| Sócrates | सॉक्रेटीस (ग्रीस तत्ववेत्ता) |
| Demóstenes | डिमोस्थेनिस (ग्रीकवक्ता) |
| Shakespeare | सेक्सपीयर (इंग्लीश नाटककार) |
| Viassa | व्यास (हिंदी कवि व तत्वज्ञ) |
| Calidassa | कालिदास (संस्कृत नाटककार) |
| Napoleão | नेपोलियन (फ्रेंच वीर) |
| Guilherme | विलियम |
| Alfredo | आल्फ्रेड |
| Diniz | दिनिझ |
| Pedro | पेद्रु |

---

### ७२ आ) नियामक उपपदांची योजना (पुढें चालू)

**नि. ६ वा**– सामान्यतः व्यक्तिवाचक विशेषनामांबरोबर उपपद घालित नाहींत तथापि खालील ४ प्रसंगीं व्यक्तिवाचक नामाबरोबर नियामक उपपद घातलेंच पाहिजे:—

I व्यक्तिवाचक नामामागें एखादें गुणविशेषण असतें तेव्हां: उ० O eloqüente Cícero. O valente Napoleão. (अशा वेळीं उपपद विशेषणांच्या मागें येतें हें लक्षांत ठेवावें)

II व्यक्तिवाचक नामाच्या मागें अगर पुढें त्या व्यक्तीची पदवी असते तेव्हां त्या पदवीच्या मागें. उ० O Doutor Bhandarcar, O

Mahatmá Gandhi, D. Diniz o Lavrador, Alfredo o Grande.

III व्यक्ति फार परिचयाची आहे असें दाखवायाचें असतें तेंव्हां. उ० o Rama, a Aurora.

IV व्यक्तिवाचक विशेषनामांचें अनेक वचन होतें तेंव्हां. ( क. ४३ V पहा ) उ० Os Gandhis nascem sempre raros=गांधी केंव्हांही झाले तरी थोडेच निपजावयाचे, Leio o Gadcari=मी गडकरी ( गडकऱ्यांचा ग्रंथ ) वाचित आहें.

नि. ७ वा– लिपींतील अक्षरें, खंडें. बेटें, डोंगर, महासागर, समुद्र, नद किंवा नद्या, साम्राज्यें, व तलाव किंवा सरोवरें यांच्या विशेषनामांच्या मागें नियामक उपपद घालावें लागतें. उ० A Ásia, A Groelândia, O Himalaia, O Atlântico, O mar Arábico, O Ganges, A China, O Aral.

नि. ८ वा– राष्ट्रें, राज्यें व प्रांत यांच्या विशेषनामांच्या मागेंही उपपद घातलें जातें. उ० O Japão, A India, os Estados Unidos. परंतु या नियमास बरेच अपवादही दिसून येतात. उ० Portugal, Marrocos, Guatemala, Gôa.

नि. ९ वा– शहरें किंवा गांव यांच्या विशेषनामांच्या मागें उपपद बहुधा घालित नाहींत. उ० Paris, Lisbôa, Bombaim, Nova-Gôa, Margão इ० तथापि जीं स्थलवाचक विशेषनामें सामान्य नामांवरून आलीं असतील त्यांच्यामागें उपपद घालावें लागतें उ० o Pôrto, a Raia, o Rio de Janeiro इत्यादि.

नि. १० वा– दिशा व उपदिशांपैकीं खालील दिशांच्या नावांमागें उपपद घालावें लागतें. o Oriente, o Nascente, o Levante; o Occidente, o Poente; o Norte, o Septentrião; o Sul, o Meridião.

---

खालील पाठांत असलेलीं उपपदें कोणत्या नियमान्वयें आलीं आहेत तें सांगा:–

O grande poeta Calidassa; Alfredo o Grande; D. Afon-

so, o Conquistador. O Sábio grego Sócrates. Calidas. Shakespeare. o Naná e a Mani. Os Napoleões nascem sempre raros. O oceano Paccífico e o mar Branco. O diplomata Naná Fadnis. F, O grande escritor português. O Império Indiano.

महाकवी शेक्सपीयर. ग्रीक महापंडित सोक्रेटीस. रोमन वक्ता सिसेरो. हिंदी मुत्सदी टिळक. पंडिता रमाबाई. दक्षिण कीं उत्तर. हिंदी महासागर. चंद्रनाथ पर्वत. गंगा नदी. रामा आणि रमा. फोंडें व मडगांव. ब्रिटिश साम्राज्य. विद्वान हिंदी वक्ता बानर्जी.

---

## पाठ २७ वा.

७३ **सत्तावाचक सर्वनामें**

ए. व.

| | | पु. | | स्त्री. | |
|---|---|---|---|---|---|
| ए. व. | प्र. पु. | meu | माझा | minha | माझी |
| | द्वि. पु. | teu | तुझा | tua | तुझी |
| | तृ. पु. | seu | त्याचा, तिचा, आपला | sua | त्याची, तिची... |
| अ. व. | प्र. पु. | nosso | आमचा | nossa | आमची |
| | द्वि. पु. | vosso | तुमचा | vossa | तुमची |
| | तृ. पु. | seu | त्यांचा, आपला. | sua | त्यांची, आपली. |

अ. व.

| | | पु. | | स्त्री. | |
|---|---|---|---|---|---|
| ए. व. | प्र. पु. | meus | माझे | minhas | माझ्या |
| | द्वि. पु. | teus | तुझे | tuas | तुझ्या |
| | तृ. पु. | seus | त्याचे, तिचे, आपले | suas | त्याच्या, तिच्या... |
| अ. व. | प्र. पु. | nossos | आमचे | nossas | आमच्या |
| | द्वि. पु. | vossos | तुमचे | vossas | तुमच्या |
| | तृ. पु. | seus | त्यांचे, आपले | suas | त्यांच्या, आपल्या. |

2343

७४ सर्व सत्तावाचक सर्वनामें विशेषणात्मक आहेत. सत्तावाचक सर्वनामांचीं रूपें, ज्या वस्तूंवर सत्ता दाखवायाची असते त्यांच्या लिंगवचनानुसार बदलतात व तीं नामांच्या बहुधा मागें घालतात.

---

| | | | |
|---|---|---|---|
| osso | हाड | dedo polegar | आंगठा |
| sobrancelha | भिंवई | dedo demonstrador | तर्जनी |
| pestanas | पापणीचे केश | dedo de meio | मध्यम |
| pálpebra | पापणी | dedo anelar | अनामिका |
| pupila | बुबूळ | dedo mínimo | कनिष्ट, करंगुळी |
| nariz (पु.) | नाक | braço | दंड, बाहू |
| narina | नाकपुडी | | |
| artéria | धमनी, शीर | antebraço | कोंपरापासून मनगटापर्यंत, हात |
| barriga | पोट | | |
| embigo | बेंबी | espádua | भुजा |
| bexiga | मुत्राचा कोठा, मुत्राशय | hombro | खांदा |
| campaínha / bocal | पडजीभ | mão | हात |
| | | palma | तळहात |
| carne (स्त्री.) | मांस | punho | मणगट |
| cérebro | मेंदु | pulso | नाडी |
| cintura | कंबर, कटी | peito | छाती |
| coração (पु.) | काळीज, रक्ताशय, हृदयकमल | estômago | कोठा, जठर, अन्नकोश |
| costa | पाठ | sangue (पु.) | रक्त |
| costela | बरगडी | sovaco | कांखा |
| cotovelo | कोंपर | veia | रक्तवाहिनी, शीर, नस |
| dedo | बोट | unha | नख |

७५ इ) नियामक उपपदांची योजना (पुढें चालू)

नि. ११ वा— सत्तावाचक सर्वनामांमागें खालील वेळीं नियामक उपपद घालावें लागतें:—

I सत्तावाचक सर्वनामानें ज्या वस्तुवर सत्ता दाखवायाची त्या वस्तूसंबंधीं

अगोदर कांहीं बोललेलें असतें तेव्हां, किंवा नुसत्या सर्वनामावरून वस्तूचा निश्चित बोध होऊं शकत नसतो तेव्हां. उ० Dá-me o meu livro=माझें (ठराविक, निश्चित) पुस्तक मला दे. O meu irmão Rama=माझा भाऊ रामा

II सत्तावाचक सर्वनाम नामात्मक असतें तेव्हां. उ० Este livro é o meu, aquele é o teu किंवा êste é meu livro, aquele é o teu हें पुस्तक माझें आहे, तें तुझें आहे.

III सत्तावाचक सर्वनाम एखाद्या संवईच्या आजारावर, गुणावर अगर वस्तूवर सत्ता दाखवतें तेव्हां. उ० Estou já com a minha dôr de cabeça= माझें डोक्याचें दुखणें सुरू झालें.

वि. सू. १७- संबोधनात्मक नामाच्या मागें असणाऱ्या सत्तावाचक सर्वनामामागें उपपद येत नाहीं. उ० Meus alunos,=विद्यार्थी हो, Meus senhores=सभ्य गृहस्थ हो.

नि. १२ वा- नामांच्या मागें असणाऱ्या क्रमवाचक संख्याविशेषणाच्या मागें नियामक उपपद घातलें पाहिजे. उ० o primeiro aluno, as segundas raparigas. परंतु क्रमवाचक विशेषण विशेष नामाच्या नंतर आलें तर त्याच्यामागें उपपद घालूं नये. उ० D. Afonso primeiro. D. Manuel segundo.

नि. १३ वा- सार्थ संख्यावाचक विशेषणांस व नामांस, मराठींत, जेव्हां 'ही' हें शुद्ध शब्दयोगी अव्यय लावावयाचें असतें तेव्हां, पोर्तुगिजींत नियामक उपपद घालावें लागतें. उ० पांचही मुली= as cinco raparigas. दोन्हीं शत्रु सैनें= os dois exércitos inimigos.

माझा बाप व माझी आई. पांचवे विद्यार्थि. तिघेही मित्र. पांचवे कार्लुश. तुझीं बोटें व तुझीं नखें. पंचविसावें आंब्यांचें—झाड. माझे कान व तुमची जीभ. नववी डाळिंब. तुमच्या बरगडया व तुमचे दांत. नव्वदावी घेर. पाचही बोटें. ती व तिचे दोन भाऊ. हजारावा वांटा. तो व त्याच्या दोन बहिणी. ते, त्याचे पुत्र व त्याच्या कन्या. माझें रक्त व तुझें मांस.

चोथा दों. आफोंसु. अलेक्झांडर (=Alexandre) धी ग्रेट (=Magno) सातशावें योरूचें झाड. पाहिली व शेवटची विद्यार्थिनी. आमच्या सशक्त भुजा. आमची छाती व आमचें हृदय. Ambas as minhas mãos. Todos os nossos amigos leais. तुमच्या सर्व प्रेमळ बहिणी.

## पाठ २८ वा

## क्रियापद

७६ ज्या शब्दानें एखाद्या वस्तूच्या क्रियेसंबंधीं अगर स्थितीसंबंधीं, कांहीं तरी सांगतां येतें त्या शब्दास क्रियापद असें ह्मणतात. उ० मी **लिहि-तों**. गाडी **धांवते**.

७७ क्रियापदांचे, भिरनिराळ्या दृष्टींनीं, निरनिराळे वर्ग पडतात:—

I कांहीं क्रियापदें अशीं असतात, कीं त्यांच्यामुळें बोधित झालेली क्रिया एखाद्या वस्तूवर प्रत्यक्षपणें पडते. अर्थात् क्रिया सांगितली ह्मणजे ति-च्याबरोबरच, क्रिया ज्या वस्तूवर पडते ती, संदिग्ध अगर असंदिग्धप-णें, सांगितलीच पाहिजे. उ० 'रामा पेरू' खातो या वाक्यांत 'खातो' या क्रियापदानें ज्या क्रियेचा बोध होतो ती क्रिया 'पेरू' या वस्तूवर पडते. अर्थात् खातो ह्मटल्याबरोबर काय खातो हें सांगावें लागतें; मग तें स्पष्टपणें सांगितलेलें असो किंवा अस्पष्टपणें सांगितलेलें असो. अशा क्रियापदास **सकर्मक क्रियापदें** व त्यांचें कार्य ज्या वस्तूंवर प्रत्यक्षपणे पडतें त्या वस्तूंस त्या क्रियापदाचें **कर्म** असें ह्मणतात. वरील वाक्यांत 'पेरू' हा शब्द अर्थात्‌च, 'खातो' या सकर्मक क्रियापदाचें कर्म होय

II कांहीं क्रियापदांबरोबर, तद्दर्शक क्रिया कोणत्या पदार्थावर पडते हें सांगण्याची मुळींच गरज पडत नाहीं. तर केवळ क्रियापदावरूनच क्रियेचा निश्चित बोध होऊं शकतो. उ० तो गरीब **आहे** रामा **चालतो** इ०

७८ क्रियापद, ज्या वस्तुसंबंधीं कांहीं तरी सांगतें, किंवा, क्रियापदामुळें बोधित झालेली क्रिया ज्या वस्तूस लागू पडते त्या वस्तूस त्या क्रियाप-दाचा **कर्ता** असें ह्मणतात. उ० 'रामा' पेरू खातो' या वाक्यांत खा-ण्याची क्रिया रामाकडून घडते किंवा खाण्याचें कार्य रामाला लागू

पडतें सबब 'रामा' हा त्या क्रियापदाचा कर्ता होय.

७९ पुर्तुगिजींत क्रियापदांस, पुरुष, वचन, प्रयोग अर्थ आणि काळ हीं असतात. (लिंग, रूप आणि भेद यांच्या संबंधीं पुढें प्रसंगोपात सांगण्यांत येईल.)

८० क्रियापदाच्या ज्या रूपावरून क्रिया एका अगर एकापेक्षां अधिक पुरुषांस लागू पडते हें समजतें तें त्याचें **वचन** होय. उ० मी जातों (ए. व.), रामा आणि सदु **जातात** (अ. व.). (क. ४०, ४१, व ९९ I पहा).

८१ क्रियापदाच्या ज्या रूपावरून, क्रिया कर्त्याकडून घडते, कीं घडलेली क्रिया कर्त्यावर पडते, हें समजतें त्यास **प्रयोग** असें ह्मणतात.

८२ पुर्तुगिजींत प्रयोग दोनच मानतात:— कर्तरी आणि कर्मणी. जेव्हां कार्य कर्त्याकडून घडतें असा बोध होतो तेव्हां **कर्तरी** आणि जेव्हां घडलेलें कार्य कर्त्यावर पडतें असा बोध होतो तेव्हां **कर्मणी** प्रयोग समजावा. (कर्मणी प्रयोगांत कर्त्याच्या जागीं कर्म येतें ह्मणूनच त्यास कर्मणीप्रयोग ह्मणतात. अर्थात्च हा प्रयोग क्रियापद सकर्मक असलें तरच शक्य होतो हें उघड आहे.) उ० रामा पेरू खातो (कर्त. प्र.) पेरू रामाकडून खाला जातो (कर्मणी प्र.)

८३ क्रिया करण्याविषयींचा कर्त्याच्या मनांतला भाव कोणता आहे, ह्मणजे, क्रिया नुसती घडते, घडलीच पाहिजे कदाचित् घडेल वगैरेचा बोध होतो त्यास **अर्थ** असें ह्मणतात.

८४ पुर्तुगिजींत अर्थ चार आहेत:— स्वार्थ, आज्ञार्थ, विध्यर्थ आणि केवळ—क्रियार्थ अगर धात्वर्थ.

८५ क्रियापदाच्या रूपावरून क्रिया नुसती घडते, घडली किंवा घडणार इतकाच बोध होतो तेव्हां **स्वार्थ** समजावा. उ० मी जातों, रामा गेला, हरी जाईल.

८६ जेव्हां बोलणारा आज्ञा ह्मणजे हुकूम करतो तेव्हां **आज्ञार्थ.** उ० जा. बस. करा.

८७ क्रियापदाच्या रूपावरून जेव्हां धर्म, कर्तव्य शक्यता इत्यादीचा बोध होतो तेव्हां विध्यर्थ उ० मी जावें, त्यानें करावें, असें व्हावयाचेंच.

८८ क्रियापदाच्या रूपावरून फक्त क्रियेचा बोध होत असतो तेव्हां भावार्थ किंवा केवळ–क्रियार्थ समजावा. उ० करणें, त्यानें बोलणें.

८९ क्रियापदाच्या रूपावरून, क्रिया आतां घडते, मागें घडली किंवा पुढें घडणार हें समजतें त्यास **काळ** असें ह्मणतात.

९० काळांचे दोन भेद आहेत: मुख्य काळ आणि दुय्यय काळ.

९१ मुख्य काळ तीन आहेत:– वर्तमान, भूत व भविष्य.

I **वर्तमान काळ**– ह्मणजे चालू असलेला काळ. उ० मी जातों.

II **भूत काळ**– ह्मणजे मागें गेलेला काळ. उ० मी गेलों.

III **भविष्य काळ**– ह्मणजे पुढें येणारा काळ. उ० मी जाईन किंवा जाणार.

९२ पुर्तुगिजींत वर्तमान काळाचे पोट भेद नाहींत. पुर्तुगिजींतील, वर्तमान काळाच्या रूपांवरून मराठींतील रीति वर्तमान काळाचाही बोध होतो.

९३ भूत काळाचे पांच पोटभेद आहेत:– अपूर्ण भूत (उ० मीं करीत होतों), पूर्ण भूत (उ० मीं केलें.), वर्तमानभूत (उ० मीं केलें आहे), भूतभूत (उ० मीं केलें होतें) व भविष्यभूत (उ० मीं करणार होतों, मीं केलें असतें किंवा मीं करतों).

९४ भविष्य काळाचे दोन भेद आहेत:– अपूर्ण भविष्य (उ० मीं जाईन) व पूर्ण भविष्य किंवा भूत भविष (उ० मीं गेलों असेन).

९५ काळांचे आणखी एका दृष्टीनेंही दोन भेद होतात:– साधा आणि मिश्र.

I एकाच क्रियापदानें कार्य दाखवलेलें असतें तो **साधा काळ**. उ० मीं जातों.

II दोन किंवा अधिक क्रियापदांच्या रूपांनीं कार्य दाखवलेलें असतें तो **मिश्र काळ** उ० मीं जात आहें.

९६ 'मीं जात आहें' या वाक्यांत जाणें हा मुख्य अर्थ आहे, असणें हा नव्हे. क्रिया दोन क्रियापदांच्या रूपांनीं सांगितलेली असतां मुख्यार्थ सांगणाऱ्या क्रियापदास **मुख्य** व त्याच्या बरोबर आलेल्यास **सहाय्य** क्रियापद ह्मणतात. 'मीं जात आहें' या वाक्यांत जाणें हें मुख्य व असणें हें सहाय्य क्रियापद होय. (एकच क्रियापद अर्थाप्रमाणें मुख्यही होऊं शकतें व सहाय्यही होऊं शकतें).

## पाठ २९ वा

## अर्थ व काळ

स्वार्थीत, मुख्य, दुय्यम, साधे व मिश्र मिळून एकंदर १० काळ आहेत:— वर्तमान, अपूर्ण भूत, पूर्ण भूत, साधा भूतभूत, भविष्य आणि साधा भविष्य भूत, हे सहा साधे आणि, वर्तमान भूत, मिश्र भूतभूत, पूर्ण भविष्य व मिश्र भविष्यभूत हे चार मिश्र.

९७ आज्ञार्थीत फक्त एकच—वर्तमान—काळ आहे.

९८ विध्यर्थीत सहा काळ आहेत:— वर्तमान, साधा भूतभूत व भविष्य, हे तीन साधे आणि, वर्तमान भूत, मिश्र भूतभूत व पूर्ण भविष्य हे तीन मिश्र.

९९ धात्वर्थीत दोन काळ आहेत:— वर्तमान ( हा साधा ) व पूर्ण भूत ( हा मिश्र ).

१०० धात्वर्थाचे ( किंवा केवळ क्रियार्थाचे ) दोन प्रकार आहेत:— **व्यक्तिवाचक** केवळ—क्रियार्थ व अव्यक्तिवाचक केवळ—क्रियार्थ. उ० मीं करणें, त्वां करणें इ० ( व्य. के. क्रि. ) व नुसतें ‘ करणें ’ हा केवळ—क्रियार्थ.

१०१ एखाद्या क्रियापदांचीं, सर्व काळीं, सर्व अर्थी, तिन्हीं पुरुषीं, दोन्हीं वचनीं, दोन्हीं प्रयोगीं रूपें सांगण्याच्या क्रियेस **क्रियापद चालवणें** असें नांव देतात.

१०२ क्रियापदांचे आणखी एका दृष्टीनेंही दोन वर्ग पडतात:— नियमित आणि अनियमित.

I जीं क्रियापदें ठराविक नियमाबरहुकूम चालतात तीं **नियमित** व ( II ) जीं तशीं चालत नाहींत तीं **अनियमित क्रियापदें** होत.

१०३ आणखीही एका दृष्टीनें क्रियापदांचे दोन भेद होतात:— पूर्ण आणि अपूर्ण.

I ज्या क्रियापदांस, काळ, वचन, पुरुष वगैरेपैकीं एखादें कांहीं तरी असत नाहीं तीं अपूर्ण व (II) ज्यांस (प्रयोगांशिवाय) सर्व कांही असतें तीं पूर्ण क्रियापदें..

१०४ जीं अपूर्ण क्रियापदें फक्त तृतिय पुरुषीं मात्र चालवतां येणें शक्य आहे अशांस **एकपुरुषी** क्रियापदें ह्मणतात. उ० उजाडतें, सकाळलें, वगैरे.

१०५ क्रियापदांच्या ज्या रूपांचा उपयोग नामांप्रमाणें करतां येतो त्या रूपांस **धातुसाधित नामें** व ज्यांचा विशेषणांप्रमाणें करतां येतो त्यांस **कृदंतें** ह्मणतात. उ० करून, केलेला.

१०६ पुर्तुगिजींतील सर्व क्रियापदें अव्यक्तवाचक–केवळ–क्रियार्थीत (यालाच क्रियापदाचें मूळरूप ह्मणावें) r या व्यंजनानें संपतात व या r च्या मागें a, e किंवा i यांपैकीं कोणतातरी एक स्वर असतो.

१०७ या r ला क्रियापदान्त्याक्षर, a, e किंवा i ला क्रियापदलक्षण, ar, er किंवा ir यांस क्रियापदप्रत्यय व अन्त्यावयव काढून राहणाऱ्या भागास धातु अशा संज्ञा आहेत. उ० शिकणें=estudar या क्रियापदांत r हें अन्त्याक्षर, a हें क्रियापदलक्षण, ar हा अन्त्यावयव व estud हा धातु आहे.

१०८ क्रियापदें चालवण्याच्या नियमांवरून त्यांचे जे वर्ग पडतात त्या वर्गास **'गण'** असें ह्मणतात. पुर्तुगिजींत हे गण ३ आहेत. जीं क्रियापदें ar नें संपतात तीं पहिल्या, er नें संपतात तीं दुसऱ्या व ir नें संपतात तीं तिसऱ्या गणाचीं समजलीं गेलीं आहेत.

१०९ Pôr(=घालणें) हें एकच क्रियापद or नें संपतें, तथापि त्याची उत्पत्ति 'poer' या क्रियापदावरून, e चा लोप होऊन, झाली असल्यामुळें तें दुसऱ्या गणाचेंच समजलें जातें.

## व्याकरण–शब्द–संग्रह नं. ६

| | |
|---|---|
| क्रियापद | verbo |
| कर्म | complemento directo किंवा objectivo |
| कर्ता | sujeito |
| सकर्मक क्रि. | verbo transitivo |
| अकर्मक क्रि. | verbo intransitivo |
| नियमित क्रियापद | verbo regular |

| | |
|---|---|
| अनियामित क्रियापद | verbo irregular |
| पूर्ण क्रियापद | verbo completo |
| अपूर्ण क्रियापद | verbo defectivo |
| एकपुरुषी क्रियापद | verbo unipessoal |
| काळ | tempo |
| मुख्य काळ | tempo primário |
| दुय्यम काळ | tempo secundário |
| साधा काळ | tempo simples |
| मिश्र काळ | tempo composto |
| वर्तमान काळ | tempo presente |
| भूत काळ | tempo pretérito, passado |
| भविष्य काळ | tempo futuro (imperfeito) |
| अपूर्ण भूत | pretérito imperfeito |
| वर्तमान भूत | pret. perfeito indefinido |
| साधा भूत भूत | pret. maisque perf. simples |
| मिश्र भूत भूत | pret. maisque perf. composto |
| पूर्ण भविष्य | futuro perfeito |
| (साधा) भविष्य भूत | condicional |
| पूर्ण भविष्य भूत (मिश्र) | condicional perfeito |
| प्रयोग | voz |
| कर्तरी प्र. | voz activa |
| कर्मणी प्र. | voz passiva |
| अर्थ | modo |
| स्वार्थ | modo indicativo |
| आज्ञार्थ | modo imperativo |
| विध्यर्थ | m. conjunctivo किंवा subjunctivo |
| धात्वर्थ | modo infinitivo किंवा aoristo |
| व्यक्तिवाचक केवळ-क्रियार्थ | infinito pessoal |
| अव्यक्तिवाचक के०-क्रि० | infinito impessoal |
| धातुसाधित-नाम | gerûndio, particípio presente |
| कृदंत, धातुसाधित विशे० | perticípio passado |
| क्रियापदान्त्याक्षर | desinência verbal |

| | |
|---|---|
| क्रियापदलक्षण | figurativa verbal |
| क्रियापदप्रत्यय | terminação verbal |
| धातु | tema, base, radical verbal |
| गण | conjugação |
| क्रियापद चालवणें | conjugar verbo |
| १ ला, २ रा, ३ रा गण | 1a, 2a, 3a conjugação |

## पाठ ३० वा

## नियमित क्रियापदें चालवणें

### कर्तरी प्रयोग—स्वार्थ—साधे काळ

### प्रथम गण

### वर्तमान काळ

११० प्रथम गणांतील क्रियापदें धात्वर्थी ar या प्रत्ययानें संपतात व हा ar प्रत्यय काढून टाकल्यावर राहणाऱ्या अक्षरसमुच्चयास 'धातु' ह्मणतात हें मागें सांगितलेंच आहे. धातूंस o, as, a, amos, ais व ão हे प्रत्यय जोडले ह्मणजे स्वार्थाच्या वर्तमान काळाचीं दोन्हीं वचनीं तीनही पुरुषांचीं रूपें अनुक्रमें सिद्ध होतात. उदाहरणार्थ estudar= (शिकणें, अभ्यास करणें). हें क्रियापद चालवून दाखवलें आहे:—

### एक वचन

| | | |
|---|---|---|
| प्र० पु० | मी शिकतों-त्यें-तें | eu estudo |
| द्वि० पु० | तूं शिकतोस-त्येस-तेंस | tu estudas |
| तृ० पु० | तो शिकतो<br>ती शिकत्ये<br>तें शिकतें | êle / ela } estuda |

### अनेक वचन

| | |
|---|---|
| आह्मीं शिकतों | nós estudamos |
| तुह्मीं शिकतां | vós estudais |

| | |
|---|---|
| ते, त्या, तीं-शिकतात. | êles / elas estudam |

**वि. सू. १८**– मराठींत क्रियापदाचीं रूपें लिंगानुसार बदलतात पण पुर्तुगिजींत कर्तरी प्रयोगाच्या कोणत्याही अर्थी, काळीं, वचनीं किंवा कोणत्याही पुरुषीं बदलत नाहींत. पुरुष असला तर eu estudo ह्मणतो व बायको असली तरीही eu estudo असेंच ह्मणते.

| | | | |
|---|---|---|---|
| ममता करणें | amar | बोलणें | falar |
| चालणें, फिरणें | andar | झाकणें | fechar |
| गांठदेणे, बांधणें | atar | मिळविणें | ganhar |
| वाढविणें | aumentar | आवडणें, चव घेणे | gostar |
| पोंचणें | chegar | धुणें | lavar |
| वास घेणें, हुंगणें | cheirar | नेणें | levar |
| जाहीर करणें | declarar | उभारणें, उंचलणें | levantar |
| ठेवणें, सोडणें | deixar | पाठवणें, हुकुम करणें | mandar |
| पढविणें, शिकविणें | ensinar | शोधणें | procurar |
| प्रवेश करणें, शिरणें | entrar | सिद्ध करणें, चव घेणें | provar |
| अनुभव घेणें | experimentar | मोडणे | quebrar |
| पाठविणें | enviar | वल्हवणें | remar |

---

मी ममता करतों. तूं चालतेस. तो बांधतो. ती वाढविते. आह्मीं पोंचतों. तुह्मीं हुंगतां. तीं जाहीर करतात. ते शिकवतात. आह्मीं शिकतों. तूं ठेवतोस. मी सोडतें. ती प्रवेश करते. मी अनुभवतों. ती पाठवते. आह्मी बोलतों. तुह्मीं झांकतां. त्या मिळवतात. तूं चव घेतोस. मी सिद्ध करतों. मी धुतों. रामा नेतो. मनी चालते. तूं हुकुम करतोस. मी शोधतों. ती मोडते. त्या वल्हवतात. तीं बोलतात. तो झांकतो. ती उचलते. आह्मीं ममता करतों. तुह्मीं सिद्ध करतां. त्या चव घेतात. तूं मोडतोस. ते धुतात. तुह्मीं वल्हवतां. मी मिळवतों तूं जाहीर करतोस. तुह्मीं ठेवता. ती पाठवते. तुह्मीं शिकवतां आणि मी शिकतों.

---

# पाठ ३१ वा

## अपूर्ण भूत काळ

१११ प्रथम गणांतील धातूंस ava, avas, ava, ávamos, áveis, avam हे प्रत्यय जोडले ह्मणजे स्वार्थाच्या अपूर्ण भूत काळाचीं रूपें दोन्हीं वचनीं आणि तिन्हीं पुरुषीं अनुक्रमें सिद्ध होतात. (वि. सू. १८ लक्ष्यात ठवावी.)

ए. व.

| | | |
|---|---|---|
| प्र. पु. | मी शिकत होतो | eu estudava |
| द्वि. पु. | तूं शिकत होतास | tu estudavas |
| तृ. पु. | तो शिकत होता | êle estudava |

अ. व.

| | |
|---|---|
| आह्मी शिकत होतों | nós estudávamos |
| तुह्मी शिकत होतां | vós estudáveis |
| ते शिकत होते | êles estudavam |

---

| | |
|---|---|
| संपवणें | acabar |
| जागें होणें, निजून उठणें | acordar |
| धीर देणें | animar |
| पसंत करणें, पास करणें | aprovar |
| खेळणें | brincar |
| गाणें | cantar |
| विकत घेणें | comprar |
| मोजणें, निरूपणें, कथनकरणें | contar |
| आमंत्रण करणें | convidar |
| कापणें, तोडणें | cortar |
| इच्छिणें | desejar |
| लक्ष्यपूर्वक ऐकणें | escutar |
| शिंकणें | espirrar |
| चढविणें | elevar |
| हातीं देणें, स्वाधीन करणें | entregar |
| सुकविणें, वाळविणें | euxugar |
| चुकणें | errar |
| टाळणें, चुकविणें | evitar |
| मरणें, श्वास सोडणें | expirar |
| उपभोगणें | gozar |
| पाहुणचार देणें | hospedar |
| श्वास घेणें | inspirar |
| भोजन करणें, जेवणें | jantar |
| खेळणें | jogar |
| स्वच्छ करणें | limpar |
| श्वासोच्छवास करणें | respirar |
| नापसंत करणें | reprovar |

---

मी गात होतों. तूं विकत-घेत होतास. तो सांगत होता आह्मीं आमंत्रण-करतों. तीं तोडित होतीं. मी इच्छितों. तुह्मीं लक्ष्यपूर्वक ऐकतां? ती शिकते. मी श्वास सोडित होतों. ती उपभोगित होती. ती पाहुणचार देते. तुह्मीं श्वासोच्छ्वास करतां. ती भोजन करते. आह्मीं जेवतों. तुह्मी खेळतां. ते स्वच्छ करित होते. आह्मी धुत होतों. त्या बोलत होत्या. मी चढवित होतों. तूं चुकत होतास. मी टाळित होतों. तुह्मी पसंत करतां पण मी नापसंत करतों. तुह्मी बोलत होतां आणि आह्मीं लक्ष्यपूर्वक ऐकत होतों. मी संपवतों. ती निजून उठत होती. तो धीर देत होता. मी स्वाधीन करीत होतों. त्या बोलत होत्या. तीं खेळत होतीं. ते नेत होते. आह्मीं सांगत होतों. तुह्मीं बोलतां. तें उचलतें. त्या चढवितात.

---

## पाठ ३२ वा

### भूत काळ

११२ प्रथम गणांतील धातूंस ei, aste, ou, ámos, astes, aram हे प्रत्यय जोडले ह्मणजे स्वार्थाच्या भूतकाळाचीं, दोन्हीं वचनीं तीनही पुरुषांची रूपें अनुक्रमें सिद्ध होतात. उ०

ए. व.

| | |
|---|---|
| मीं शिकलों-ली-लें | eu estudei |
| तूं शिकलास-लीस-लेंस | tu estudaste |
| तो-ती-तें शिकला-ली-लें | êle किंवा ela estúdou |

अ. व.

| | |
|---|---|
| आह्मीं शिकलों | nós estudámos |
| तुह्मीं शिकलां | vós estudastes |
| ते-त्या-तीं शिकले-ल्या-लीं | êles किंवा elas estudaram |

११३ ज्या धातु c व g नें संपतात त्यांना ei हा प्रत्यय जोडतांना, उच्चारांत फरक पडूं नये ह्मणून, c च्या जागीं qu व g च्या जागीं

gu अशीं अक्षरें येतात. उ० chegar (=पोंचणें) याचा धातु cheg हा आहे. त्याला ei जोडला असतां g चा उच्चार ग् असा होणार नाहीं, सबब cheguei असा लिहितात. (पाठ ३९ पहा)

११४ मराठींत, स्वार्थाच्या भूत काळीं, कांहीं सकर्मक क्रियापदांचीं रूपें कर्माच्या लिंगवचनानुसार बदलतात व कर्ता तृतियान्त असतो उ० त्यानें आंबा घेतला, त्यानें पाट्या घेतल्या, पण पुर्तुगिजींत क्रियापदाचीं रूपें नित्य, कर्त्याच्या पुरुष आणि वचनाप्रमाणेंच असतात मग कर्माचें लिंग व वचन कोणतेंही असो. वरील दोन्ही वाक्यांचें भाषांतर पुर्तुगिजींत êle tomou manga व êle tomou ardósias असें होईल. अर्थात् tomou याचा अर्थ 'घेतला—ली—लें—ले—ल्या—लीं' असा होईल

| | | | |
|---|---|---|---|
| भाड्यानें देणें किंवा घेणें | alugar | स्वदेशीं आणणें | importar |
| डसवणें, चिकटविणें, लावणें | colar | योजून किंवा शोधून काढणें | inventar |
| सुरू करणें, आरंभिणें | començar | हांजी हांजी करणें | lisonjear |
| राखणें, नासूं न देणें | conservar | भाग पाडणें, आभारी असणें | obrigar |
| संभाषण करणें | conversar | | |
| नाचणें | dansar | अडखळवणें, अडवणें | obstar |
| ठरविणें | determinar | हुकूम करणें, फर्मावणें, व्यवस्था लावणें | ordenar |
| दुमडणें, घडी घालणें | dobrar | | |
| माणसाळवणें, सत्ता चालवणें | domar | थांबणें | parar |
| योजना करणे, कामावर लावणें | empregar | चिंतणें, विचार करणें | pensar |
| | | सांभाळणें, ठेवणें | segurar |
| उसनवट देणें. | emprestar | बसवणें | sentar |
| परदेशीं पाठवणें | exportar | काढणें | tirar |
| राहणें बनणें | ficar | वाजवणें, लागणें, बिलगणें | tocar |
| राखणें, सांभाळणें | guardar | घेणें | tomar |
| कल्पना करणें, कल्पिणें | imaginar | वापरणें | usar |
| | | वांकणें | vergar |

तूं वांकतोस. ती वांकली. त्यां घेतली. त्यानें काढल्या, तो थांबला. त्यानें आरंभिलें. आह्मीं सांभाळतों. आह्मीं संभाषण–केलें. तुह्मीं राखल्या. त्यांनीं पडद्या घातल्या. त्या दुमडतात. ते परदेशीं पाठवतात. आह्मा स्वदेशीं आणतों. आह्मीं भाग पाडलें. त्यांनी फर्मावलें. तुह्मीं नाचलां. तिनें ठरवलें. तुह्मीं बसवल्या. तुह्मीं योजल्या. ते विचार करतात. आह्मीं चिकटविलेत होतों. ते हांजी हांजी करित होते. तुह्मीं वापारित होतां. त्यानें अडविलें. ते चिंतितात. आह्मीं राहतों. तुह्मीं सत्ता चालवितां. मी भाड्यानें दिलें. मीं राहिल्यें. मीं बनलों. मीं बिलगलों. मी पोंचलों.

## पाठ ३३ वा

## अपूर्ण भविष्य काळ

११५ प्रथम गणांतील धातूंस arei, arás, ará, aremos, areis, arão हे प्रत्यय जोडले ह्मणजे स्वार्थाच्या अपूर्ण भविष्य काळाचीं, दोनही वचनांच्या तीनही पुरुषांचीं रूपें अनुक्रमें सिद्ध होतात. उ०

| ए. व. | | अ. व. | |
|---|---|---|---|
| मीं शिकेन | eu estudarei | nós estudaremos | आह्मीं शिकूं |
| तूं शिकशील | tu estudará | vós estudareis | तुह्मीं शिकाल |
| तो–ती–तें शिकेल | êle estudará | êles estudarão | ते–त्या–तीं शिकतील |

---

| | | | |
|---|---|---|---|
| मालवणें, विझवणें | apagar | विचारणें, प्रश्नकरणें | prèguntar |
| फुंकणें | assoprar | लांबविणें, वाढविणें | prolongar |
| तयार करणें | aprontar | फाडणें | rasgar |
| बोलावणें, ह्मणणें (नांव देणें) | chamar | राज्यकरणें | reinar |
| रडणें | chorar | उत्तरकरणें, उत्तरार्थ सांगणें | replicar |
| चालू ठेवणें | continuar | वाहणें | soprar |
| चूक दुरुस्त करणें | emendar | मागणें | suplicar |
| आशाकरणें, राहणें | esperar | संशय येणें | suspeitar |
| फिरणें (भोंवतीं) | girar | वागणें, काळजी घेणें | tratar |

| | | | |
|---|---|---|---|
| बुडविणें | mergulhar | ओकणें | vomitar |
| नाकारणें, नाहीं ह्मणणें | negar | मत देणें, टाकणें | votar |
| पहाणें, नजर लावणें | olhar | थट्टा करणें | zombar |
| सहलकरणें, फिरणें | passear | प्राण्यांचें वर्णन करणें | zoografar |

---

ते बोलावतील. तुह्मीं रडाल. मी नाकारीन. तूं ओकशील. तो मत देईल. त्या विचारतील. आह्मीं उत्तर देऊं. त्या मागतील. तूं फाडशील. ते थट्टा करतील. मी बुडवीन. तुह्मीं तयार कराल. मी दुरुस्त करीन. ते आशा करतात. तो प्राण्याचें वर्णन करतो. तो वाहतो. ती फुंकते. मी मालवतों. आह्मीं फिरतों. तुह्मी चालू ठेवाल. तो लांबवीत होता. ते सहल करीत होते. तूं वागवशील. मी संशय घेतों (किंवा मला संशय येतो.) त्यांनीं मालवल्या. तुह्मी दुरुस्त केलें. त्यांनीं उत्तरें दिलीं. त्यानें राज्य केलें.

---

## पाठ ३४ वा

### भविष्यभूत (साधा)

११६ प्रथम गणांतील धातूंस aria, arias, aria aríamos, aríeis, ariam हे प्रत्यय जोडले ह्मणजे त्यार्थाच्या भविष्यभूत काळाचीं दोनही वचनांच्या तीनही पुरुषाचीं रूपें अनुक्रमें सिद्ध होतात. उ० (वि. सू. १८ लक्ष्यांत ठेवावी)

ए. व.

| | |
|---|---|
| मी शिकतों–ते | eu estudaria |
| तूं शिकतास–तीस | tu estudarias |
| तो–ती शिकता–ती | êle estudaria |

अ. व.

| | |
|---|---|
| आह्मीं शिकतों | nós estudaríamos |
| तुह्मीं शिकतां | vós estudaríeis |
| ते शिकते, त्या शिकत्या | êles estudariam |

---

**वि. सू. १९**– भविष्यभूत काळाचीं, प्रथम पुरुषाच्या दोन्हीं वचनांचीं व द्वितिय पुरुषाच्या अनेकवचनाचीं रूपें, मराठींत, वर्तमान काळाच्या रूपांसारखीं आहेत. सबब या पाठांतील शब्दांचे भाषांतर पुर्तुगिजींतील वर्तमान काळाच्या रूपांनीं न करतां भविष्यभूत काळाच्या रूपांनींच करावें. उ० मीं शिकतों=eu estudaria.

---

| | | | |
|---|---|---|---|
| acusar | आरोप करणें | puxar | ओढणें |
| afastar | दूर सारणें | resulta | उत्पन्न होणें, उगम पावणें |
| agarrar | पंज्यांनीं किंवा हातांनीं धरणें, पकडणें | retira | बाजूस करणें, दूर सारणें |
| almoçar | न्याहारी करणें | risca | आंखणें, खोडणें |
| aliviar | उणें करणें, शांत करणें | rouba | हिरावून घेणें, लुटणें |
| amarrar | दोरीनें बांधणें | salta | उडया मारणें |
| apanhar | धरणें, सांपडावणें मिळवणें, | separa | वेगळें करणें, निराळें करणें |
| atonar | होडींत बसून जाणें | trabalha | मेहनत करणें, काम करणें |
| assaltar | छापा घालणें, चढाई करणें | transform | रूपांतर करणें |
| aviar | विल्हेवाट लावणें, कामाला लावणें | vir | उलटणें |
| avivar | ताजाकरणें, जोम आणणें. | engan | फसवणें |
| baloiçar | झोंके घेणें, हेलकावे खाणें. | desembarc | होडींतून उतरणें |
| beijar | मुका घेणें | empurr | ढकलणें, हिसकादेणें |
| caçar | शिकार करणें, मारणें | fabric | बांधणें (वाडे, घरें) |
| cançar | श्रम देणें | furt | चोरणें. |
| comparar | तुलना करणें | louv | स्तुती करणें |
| comentar | चर्चा करणें | lut | भांडणें, झगडणें |
| consolar | समाधान करणें, सांतवन करणें | march | कूच करणें, चालून जाणें |
| criticar | टीका करणें | ma | ठार मारणें |
| culpar | अन्यायी धरणें | murmu | हळू बोलणें, पुटपुटणें |
| cuidar | काळजी घेणें, चिंतणें | | |
| deitar | पाडणें, टांकणें | | |
| difamar | अपकिर्ती करणें, निंदा करणें | | |

| | | | |
|---|---|---|---|
| desculpar | क्षमा करणें | nadar | पोहणें |
| edificar | (इमारती) बांधणें, रचणें | opinar | अभिप्राय किंवा मत देणें |
| embarcar | होडींत बसून बाहेर पडणें | passar | गुजरणें, ओलांडणें, जाणें |
| perdoar | क्षमा करणें, माफ करणें | | |
| peitar | लांच देणें | provocar | चिथावणें |

मी मत देतों (=दिलें असतें) तूं कूच करतोस. तूं बोलता. तो फळाहार करता. तो होडींतून उतरला. तो ओकतो. मी बांधतों. तो चोरतो. आह्मीं स्तुती करतों. तुह्मीं भांडतां. ते कूच करते. त्या ठार मारत्या. तीं पुटपुटत होतीं. मीं पोहत होतों. तूं मत देता. तो गुजरला. ती माफ करती. आह्मीं लांच देतों. तुह्मीं चिथावलें असतें (किंवा तुह्मीं चिथावतां). ते झोंके घेतात. ते शिकार करते. मीं अन्यायी धरतों (धरलें असतें). तो होडींतून निघता. मी दोरीनें बांधतों. मीं रूपांतर करतों. मी क्षमा करतों. त्यानें लुटलें. तुह्मीं उड्या मारित होतां. ती निराळें करती. ते मेहनत करते. तो उलटता. त्यानें फसवलें. मीं पकडतों. तुह्मीं बांधतां. ती धरती. तूं विल्हेवाट लावता. तुह्मीं श्रम देतां. ते आंखते. त्या खोडत्या.

---

## पाठ ३९ वा

## प्र० गणांतील क्रियापदांच्या लेखनाविषयीं सूचना.

११७ धात्वर्थी çar नें संपणाऱ्या क्रियापदांच्या धातूपुढें, e नें सुरूहोणारा प्रत्यय आला असतां cedilha लिहावें लागत नाहीं. उ० Almoçar–almocei

११८ धात्वर्थी car नें संपणाऱ्या क्रियापदांच्या धातूपुढें, स्वार्थी वर्तमानकाळाच्या एकवचनाचे तीनही व अनेक वचनाचा तृतिय पुरुषी प्रत्यय आला असतां, धातु व प्रत्यय यांच्या मध्यें i येत असतो. उ० passear–passeio, passeias, passeia व passeiam. त्याचप्रमाणें, विध्यर्थाच्या वर्तमान काळाचे सहाही प्रत्यय आले असतां i चा आगम होत असतो.

११९ धात्वर्थी ciar नें संपणाऱ्या क्रियापदांच्या धातूंस स्वार्थाच्या वर्तमान काळाच्या एकवचनी तीनही पुरुषांचे, अनेक वचनाच्या तृतिय पुरुषाचा व विध्यर्थाच्या वर्तमानकाळाचे सर्व प्रत्यय जोडताना, धातूंतील c व i याच्यामध्यें e चा आगम होतो. उ० Negociar=व्यापार करणें—eu negoceio, tu negoceias, êle negoceia, êles negoceiam (इतर सर्व पुरुष नियमाप्रमाणें.) परंतु हल्लीं अशा जातींचीं क्रियापदें नियमाप्रमाणेंच चालवण्याकडे, ह्मणजे negocio, negocias, negocia असें लिहिण्याबोलण्याकडेच, भाषाशास्त्रज्ञांचा कल आहे. तेव्हां खालील क्रियापदें नियमाप्रमाणेंच चालवावीं.

---

| | |
|---|---|
| acariciar | कुरवाळणें, लडिवाळपणा करणें |
| adiar | तहकुब करणे, पुढें ढकलणें |
| afiar | पाजळणें |
| enfiar | सुतानें गुंतणें, गुंफणें |
| aliar | मैत्री करणें |
| alumiar | प्रकाशित करणें |
| ampliar | वाढवणें, मोठा आकार देणे. |
| desconfiar | विश्वास न ठेवणें, संशय धरणें |
| enfastiar | श्रम देणें, कटकट करणें |
| espiar | गुप्त पहारा करणें, हेरणें |
| evidenciar | स्पष्ट करणें, उघड करणें |
| fiar | सूत कांतणें |
| fantasiar | कल्पनेनें रचणे |
| noticiar | बातमी देणे |
| anunciar | जाहिर करणें, जाहिरात देणें |
| apreciar | किंमत करणें, महत्व देणें |
| assobiar | शिटी वाजविणें, शीळ घालणें |
| associar | जमवणें, एकत्र करणें |
| confiar | विश्वास किंवा श्रद्धा ठेवणे |
| contrariar | विरुद्ध जाणें |

| | |
|---|---|
| copiar | नक्कल करणें |
| desafiar | पैज लावणें, स्पर्धा करणें |
| odiar | हेवा करणें, द्वेष असणें |
| penitenciar | प्रायश्चित्त देणें |
| premiar | इनाम किंवा बक्षीस देणें |
| principiar | आरंभणें, सुरू करणे |
| pronunciar | उच्चारणें, बोलणें |
| saciar | शमविणें, निवविणें, भागविणें |
| tosquiar | केंश अगर लोंकर कापणें |
| variar | बदलणें, फिरवणें, फरक करणें |

---

Ambos nós copiaríamos. Todos êles pronunciavam. Todos os meus amigos fiam. Nós todos apreciaremos. Todos vós eufastiais. Falaram Todas elas. Os dois amigos meus anunciariam. ती कुरवाळते. मी विश्वास ठेवित नव्हतों. तूं तहकूब केलें, आह्मीं बातमी देतों. ते जाहिरात देते. तुह्मी कटकट करते. ते सर्व बोलतात. तुह्मीं उभय बोलावते. आह्मीं दोघे शमवूं. रामा बदलील. आह्मीं पैज लावूं. तुह्मी स्पष्ट कराल. त्यांनीं कल्पनेनें रचलें.

## पाठ ३६ वा

## वाक्यरचना

१२० ज्या एक किंवा अधिक शब्दांच्या योगानें एखादें विधान करतां येतें त्यास **वाक्य** असें ह्मणतात.

१२१ वाक्याचे मुख्य भाग दोन आहेतः उद्देश्य आणि विधेय.

I ज्याच्याविषयीं विधान केलेलें असतें त्यास **उद्देश्य** किंवा **कर्ता** असें ह्मणतात.

II ज्या शब्दांनीं कर्त्याविषयीं कांहीं तरी सांगितलेलें असतें त्यास **विधेय** ह्मणतात. उ० 'रामा आंबा खातो.' हें एक वाक्य आहे. त्यांत 'रामा' विषयीं विधान केलें आहे ह्मणून तो शब्द त्या वाक्याचा कर्ता होय,

आणि 'खातो' या शब्दानें 'रामा' या कर्त्याच्या क्रियेविषयीं सांगि-तलें आहे ह्मणून तो शब्द 'विधेय' होय.

१२२ वाक्याच्या कर्तृस्थानीं असणारा शब्द नाम, सर्वनाम किंवा नामा-प्रमाणें योजलेला शब्द असावा लागतो. वाक्याच्या कर्तृस्थानीं एका-पेक्षां अधिक शब्दही असूं शकतात. उ० रामा व हरी बोलत नाहींत.

१२३ वाक्याचें विधेय नुसतें क्रियापद असूं शकेल किंवा, एखादें क्रिया-पद आणि एखादें नाम अगर विशेषण अगर त्यांच्याप्रमाणें योजलेला शब्द, यांहीं मिळून झालेलें असेल. उ० रामा चोर आहे. या वाक्यांत 'चोर आहे' हें विधेय होय, नुसतें 'आहे' हें नव्हे.

१२४ वाक्याच्या कर्तृस्थानीं एकच शब्द असतां, विधेयांतील क्रियापदाचें रूप, कर्त्याच्या पुरुष आणि वचन यांच्या रूपांप्रमाणें असावें लागतें. (क. ९९ कंस पहा) उ० eu estudo, tódas as raparigas cantaram. Eles estudarão.

**वि. सू. २०–** अ) एखाद्या क्रियापदाच्या कर्तृस्थानीं पुरुषवाचक सर्वनाम असतां पुष्कळ वेळीं तें अध्याहृत ठेवतात. कारण प्रत्येक पुरुषाचें क्रियापदाचें रूप निराळें असल्यानें नुसत्या क्रियापदाच्या रूपावरून पुरुषाचा बोध सहज होतो. उ० Estudei a lição.

ब)–मराठींत, कर्ता प्रथमान्त किंवा तृतियान्त असतो. उ० रामा कापतो; रामानें आंबा कापला. पण पुर्तुगिजींत कर्ता नित्य प्रथमान्त असावा लागतो. उ० Ramá corta, Ramá cortou manga. त्याचप्रमाणें मराठींत कर्माची नित्य द्वितिया विभक्ति असते व पुष्कळ वेळां ती सप्रत्यय असते. उ० कृष्णानें कंसास मारलें. पण पुर्तुगिजींत कर्म (सर्वनाम नसतां) नित्य प्रथमेच्याच रूपांत असावें लागतें ह्मणजे त्याला कोणताही प्रत्यय वगैरे लागत नाहीं किंवा त्याच्यामागें बहुधा कोणतेंही शद्बयोगी अव्यय येत नाहीं. उ० Crisna matou Caunsa. ( क. ११४ पहा. ).

१२५ मराठींत, एखाद्या वाक्यांत फक्त कर्ता आणि क्रियापद असलें तर आधीं कर्ता (व त्याच्याशीं संबंध असणारे शद्ब) आणी नंतर ह्मणजे वाक्याच्या शेवटीं क्रियापद असतें; क्रियापद सकर्मक असतां, आधीं

कर्ता ( व त्याच्याशीं संबंध असणारे शब्द ), नंतर कर्म ( व त्याच्याशीं संबंध असणारे शब्द ) व नंतर ह्मणजे वाक्याच्या शेवटीं क्रियापद असा क्रम असतो, उ० खरा दानशूर गृहस्थ गुप्त दानें देतो. तथापि, पुर्तुगिजींत क्रियापद वाक्याच्या अमुकच ठिकाणीं असलें पाहिजे असा नियम नाहीं. सर्वसाधारणपणें असें ह्मणतां येईल कीं, आधीं कर्ता ( व त्याच्याशीं संबंध असणारे शब्द ) नंतर क्रियापद व नंतर, असलें तर, कर्म ( व त्याच्याशीं संबंध असणारे शब्द ) असा क्रम असतो. उ० Todas elas cantam. Cantam todas elas. Ele comprou mangas.

## व्याकरण-शब्द-संग्रह नं. ७

| | | | |
|---|---|---|---|
| वाक्य | oração, proposição | विधेय | predicado |
| कर्ता, उद्देश्य | sujeito | कर्म | complemento directo, objecivo propriamente dito |

———o———

| | | | |
|---|---|---|---|
| arroz | भात, तांदुळ | pano, fazenda | वस्त्र, कपडा |
| erro | चुक, अन्याय | prémio | बक्षीस, इनाम |
| fome | भूक | retrato | तसबीर |
| hino | गीत | rebanho | हिंड |
| nacional | राष्ट्रीय | sêde | तहान |
| nome | नाम, नांव | trabalho | काम, कष्ट, कार्य |

## खालील वाक्यांचें भाषांतर कराः—

O primeiro rei português conquistou muitas terras. D. Dinís, o Lavrador, fundou muitas escolas. Um comerciante comprou uma fazenda verde. Ambos os pastores guardavam o mesmo rebanho. Todos os alunos cantam o hino nacional. Eu acabaria o meu trabalho. Tu evitaste um grande erro. Nós cortamos duas mangas. Nós cortamos as duas mangas. Ela tosquiou dois carneiros. Eu saciei a sêde. Elas enfiarão todas as flôres. Vós saciarleis a

vossa fome. O rapaz alarga o retrato. Os bons alunos estudam as suas lições. Eu apaguei o candieiro.

Este homem compra casas! Ele riscou o meu nome e os vossos. Todos apanhariam bons prémios. João rasgou o meu caderno. Todo o sábio louva o doutor Bhandarcar. Cada homem deseja conquistar os outros. Eu jantei peixe (मासळी)

आह्मी भात जेवित होतों. ते आंबे कापित होते. तूं सर्व विद्यार्थ्यांस चिथावता. त्यानें दोन्हीं वह्या फाडल्या. हें मांजर त्या उंदराला पकडील. मी ही तसवीर वाढवली. मी तुमची दौत घेतों. तिनें उभय ग्रंथांची नक्कल केली असती. तिनें आपल्या बालकाचा मुका घेतला. तो आपल्या मुलीला कुरवाळीत होता. त्या आपल्या मुलांचे लाड करित होत्या. मी तुमचें नांव खोडीन. तीं घरें हा बांधतो व हीं मी बांधतों. कृष्णानें पुस्तक विकत घेतलें. ह्या काड्या व दौती आह्मी उचलतों.

---

## पाठ ३७ वा.

### १२६ ई ) नियामक उपपदांची योजना (पुढें चालू. क. ६८.६९ व ७० पहा ):–

**नियम १४ वा:–** एखाद्या जातीच्या एकंदर व्यक्तींचें कर्तव्य अगर धंदा सांगावयाचा असतां, जातिदर्शक सामान्य नामाच्या मागें लिंगवचनानुसार नियामक उपपद घालावें लागतें. उ० ‘ शिक्षक शिकवित असतात, विद्यार्थी शिकत असतात ’ या वाक्यांत शिक्षकाचें आणि विद्यार्थ्यांचें कर्तव्य, किंवा, जो जो ह्मणून शिक्षक असतो तो तो शिकवित असतो आणि जो जो ह्मणून विद्यार्थी असतो तो तो शिकत असतो असें सांगावयाचें आहे. सबब शिक्षक व विद्यार्थी या दोन्हीं नामांमागें नियामक उपपद घालावें लागेल व वरील वाक्यांचें भाषांतर “ os professores ensinam, os alunos estudam ” असें करावें लागेल.

**वि. सू. २१**—उपपदें हीं जरी नामांकरतां येत असतात (क. ७० पहा) तरी तीं नामांच्या मागोमागच असतात असें नाहीं. तर उपपद आणि नाम यांच्यामध्यें एखादें विशेषण अगर सत्तावाचक सर्वनाम असूं शकतें. इतकेंच नव्हे तर विशेषण व उपपद अशीं दोन्ही **नामांच्या मागें** यावयाचीं असतां, उपपद विशेषणाच्या मागेंच घातलें पाहिजे. उ० os bons livros, o erudito e elegante homem.

**नि. १५ वा**— ज्या पदार्थास अगर पदार्थांस, एखादें विशेषण अगर संबंधी वाक्य योजून, निश्चित स्वरूप द्यावयाचें असतें अगर वाक्याच्या अनुरोधामुळें जे पदार्थ निश्चित स्वरूपाचे आहेत असें समजावें लागतें त्या पदार्थांच्या नामांमागें नियामक उपपद लिंगवचनानुसार घालावें. उ० 'मीं हात धुतले' या वाक्यांत 'मी **माझे** हात धुतले' असें सांगण्याचा हेतु असतां हात या शब्दाच्यामागें उपपद घालावें लागेल व वरील वाक्याचें भाषांतर "eu lavei as mãos" असें होईल. 'जग चाललें आहे' (किंवा दुनिया झुकती है) असें सांगावयाचें असल्यास व जगाचें स्वरूप अमुक एक प्रकारचें असतें असें गृहित असल्यास, 'जग, शब्दाच्यामागें उपपद घालावें लागून त्या वाक्याचें भाषांतर "O mundo marcha" असें करावें लागेल.

**नि. १६ वा**— एकाच विशेष्याचीं दोन विशेषणें असून तीं निरनिराळ्या व्यक्ति दाखवित असलीं तर त्या दोहोंच्या मागें नियामक उपपद लिंगवचनानुसार घालावें लागतें. उ० 'श्रीमंत आणि गरिब माणसें' यांत 'श्रीमंत' आणि 'गरीब' हीं दोन 'माणसें' या एकाच विशेष्याचीं विशेषणें असून त्यांच्यामुळें दोन निरनिराळ्या स्थितींच्या व्यक्तींचा बोध होतो सबब त्या दोन्हीं विशेषणांच्या मागें नियामक उपपद घालावें लागून, त्यांचें भाषांतर os homens ricos e os pobres असें करावें लागेल. (नियमाप्रमाणें पाहूं जातां पहिल्या os, 'homens' या शब्दाच्या मागें न येतां 'ricos' या शब्दाच्या मागें यावयास पाहिजे होता. पण अशा वेळीं उपपद नामाच्या मागें घालण्याचाच प्रघात असतो हें लक्षांत ठेवावें)

परंतु, एकाच विशेष्याचीं दोन विशेषणें असून तीं एकच व्यक्ति अगर एकाच जातीच्या व्यक्ति दाखवित असलीं तर फक्त पहिल्या विशेषणाच्यामागें मात्र नियामक उपपद घालावें. उ० "o prudente e inteligente rapaz" यांतील prudente व inteligente हीं विशेषणें निरनिराळ्या व्यक्तींचे गुण दाखवित नाहींत तर rapaz या एकाच व्यक्तीचा गुण दाखवतात. सबब फक्त पहिल्या ह्मणजे prudente या विशेषणामागें उपपद आलें आहे.

---

| | | | |
|---|---|---|---|
| alimpar | स्वच्छ करणें | preparar | तयार करणें |
| bicho | कीड, कीटक | riqueza | श्रीमंती संपत्ति |
| brilhar | प्रकाशणें, चकाकणें | roupa | कपडे, वस्त्राभरणें |
| candieiro | दिवा | scintilar | चकाकणें (नक्षत्रांचें) |
| concertar | दुरुस्त करणें | soldado | शिपाई |
| cultivar | रोंवणें, पेरणें | sujo | मळकट, घाणेरडा |
| despresar | तुच्छमानणें, कमीलेखणें | talhar | वेतणें, कापणें |
| estrela | नक्षत्र, तारा | velho | जुना, ह्मातारा |
| moço | तरुण | verme | कृमी |
| pássaro | पक्षी | vedar | अडखळावणें, अडचण उपस्थित करणें |

## खालील वाक्यांचें भाषांतर करतांना नियामक उपपदांकडे विशेष लक्ष्य पुरवावें:-

O lavrador cultiva a terra. Os lavandeiros lavam a roupa suja. O relogeiro concertà os relógios. Os pássaros matam os vermes e os bichos. Eu alimparei o nariz. Ela lavava o rosto. A pobre rapariga andou o mundo. A Terra gira. O sol brilha. As estrelas scintilam. O médico vedaria o sangue. Dansam os homens bons e os maus. Chegaram os soldados velhos e os moços. Compramos todos os livros novos e os velhos. Os rapazes inteligentes e diligentes apanharão prémios. Os filósofos despresam as riquesas.

Falou o prudente e eloquente orador, o doutor Bhandarcar. O meu irmão comprou quatro pães e dois grandes canivetes.

मांजर उंदिर धरतें. माणसें बोलतात. शिंपी कपडे बेततात. चोर लुटतात. सिंह हत्तीला मारतो. लांडगे बकऱ्या मारतात. पक्षी किडे खातो. त्यानें पाय धुतले. तिनें आपलें पुस्तक फाडलें. तूं डोळे झांकशील. आह्मी हात उचलतों. तुह्मी अंथरुण तयार करतां. त्यांनीं स्मशानयात्रा संपवली. त्या जिन्हा पाजळल्या. सशक्त आणि अशक्त माणसें चालत होतीं. सुखी आणि दुःखी बायका रडत होत्या. आळशी आणि हुशार मुली शिकत असतात. सर्व जुन्या आणि नव्या शिपायांनीं कूच केलें. सभ्य आणि हुशार विद्यार्थि रामा, तें बक्षीस मिळवील. सशक्त आणि बुद्धिमान् माणसें इतरांना जिंकतात. माझ्या बहिणीनें कांहीं गाया व दोन्ही बैल विकत घेतले. गोविंदा एक मोठें स्मारक उभारील. कांहीं मुलगे सूत काढतील. शिपाई आपल्या तरवारी पाजळतील. प्रत्येक मनुष्य दुसऱ्यांनां फसवूं इच्छितो. त्यानें या मतिभ्रष्टाला लांच घातला. ते दोघेही सर्व जमिनी विकत घेतील. मी दिवा मालवला.

---

## पाठ ३८ वा

## शब्दांच्या जाती.

१२७ ज्या एक किंवा अधिक अक्षरांपासून कांहीं तरी अर्थ उत्पन्न होतो त्यांस **शब्द** असें ह्मणतात. 'दांत' हा एक शब्द आहे, कारण त्याला अर्थ आहे. 'तांद, हा शब्द नव्हे, कां कीं, त्याला अर्थ नाहीं.

१२८ शब्दांचे, निरनिराळ्या दृष्टींनीं निरनिराळे वर्ग पडतात:-

अ) अर्थभिन्नत्व दाखवण्याकरतां ज्या शब्दांचीं रूपें बदलतात त्यांस **चल शब्द** ह्मणतात; ज्यांचीं रूपें बदलत नाहींत त्यांस **अचल शब्द** किंवा अव्ययें ह्मणतात. (पुर्तुगिजींत सविभक्तिक व अविभक्तिक असे वर्ग पाडतां येत नाहींत. कारण तींत विभक्ति नाहींत.)

आ) जे शब्द, त्याच भाषेंतील दुसऱ्या शब्दांपासून उत्पन्न झालेले नसतात ह्मणजे जे स्वयंसिद्ध असतात त्यांस **सिद्ध**, व जे शब्द, त्याच भाषेंतील दुसऱ्या शब्दांपासून उत्पन्न झालेले असतात त्यांस **साधित** शब्द असें ह्मणतात. (पुर्तुगिजींत समास नाहींत.)

इ) गुणधर्मावरून एकंदर शब्दांच्या **आठ जाति** मानलेल्या आहेत:– नामें, विशेषणें, सर्वनामें क्रियापदें, क्रियाविशेषण अव्ययें, उभयान्वयी अव्ययें, शब्दयोगी अव्ययें व केवलप्रयोगी अव्ययें. यांतील पहिल्या चार 'चल' असून शेवटच्या चार 'अचल' आहेत. (कांहीं व्याकरणकार केवलप्रयोगी अव्ययांस शब्द समजत नाहींत.)

१२९ ज्या शब्दावरून क्रियेचा अगर स्थितीचा गुण समजतो त्यांस **क्रियाविशेषणें** ह्मणतात. अर्थात्च, क्रियाविशेषण अव्यय हें, एखाद्या क्रियापदाचा, विशेषणाचा अगर दुसऱ्या एखाद्या क्रियाविशेषणाचा गुण दाखवूं शकेल. उ० तो **जलद** चालतो; तो **फार** वाईट आहे; तो **फार** जलद बोलतो.

१३० जे शब्द दोन वस्तूंमधील अगर एकाच वाक्याच्या दोन भागामधील संबंध दाखवतात त्यांस **शब्दयोगी** अव्ययें ह्मणतात. उ० पाटी मेजा**वर** ठेव; बागे**मधील** फुलझाडें. दिव्या**खालीं** अंधेर. (क. १९७ प.)

१३१ जे शब्द, दोन इतर शब्द अगर एकमेकांवर अवलंबून असणारीं दोन वाक्यें जोडतात त्यांस **उभयान्वयी** अव्ययें ह्मणतात. उ० तूं **आणि** मी जाऊं. तो ह्मणाला **कीं** प्रत्येकानें आपापलें कर्तव्य करावें.

१३२ जे शब्द केवळ मनाचे उद्गार दर्शवण्याकरतां योजलेले असतात त्यांस **केवलप्रयोगी** अव्ययें ह्मणतात. उ० **वः**, हें तर फार छान झालें. **छेः**, त्यांत कांहीं अर्थ नाहीं.

## व्याकरण–शब्द–संग्रह नं. ८

| | |
|---|---|
| शब्द | palavra, termo |
| शब्दांच्या जाति | partes do descurso |
| चल शब्द | palavra variável, flexivel |
| अचल शब्द | pal. invariável, inflexível |

| | |
|---|---|
| सिद्ध शब्द | pal. primitiva. |
| साधित शब्द | pal. derivada |
| क्रियाविशेषण | advérbio |
| शब्दयोगी अव्यय | preposição |
| उभयान्वयी अव्यय | conjuncção |
| केवलप्रयोगी अव्यय | interjeição. |

## पाठ ३९ वा

## क्रियाविशेषणें

१३३ क्रियाविशेषणें ८ प्रकारचीं आहेत:—

### १ स्थलवाचक

| | | | |
|---|---|---|---|
| येथें | aqui, cá | जवळ | perto |
| तेथें | até, ai, lá | दूर | longe |
| जेथें, कोठे | onde | वर | acima |
| कोठें | aonde | खालीं | abaixo |
| जेथेंतेथें | ocolá | पुढें | diante, defronte |
| कोठेंतरी | algures | मागें | atrás |
| आंत | dentro | अलीकडे | aquém |
| बाहेर | fóra | पलीकडे | alêm |

### २ कालवाचक

| | | | |
|---|---|---|---|
| काल | ontem | (पहांटेस) लवकर | cedo |
| आज | hoje | उशिरां | tarde |
| उद्यां | amanhã | आतां | agora, ora |
| सदोदित, नित्य | sempre | आधीं, पूर्वीं | antes |
| केव्हांही न | nunca, jamais | नंतर, मग | depois |
| | | लगेच | logo |
| जेव्हां | quando | लवकर, इतक्यांत | já |
| अजून | ainda | तव्हा, तेव्हां | então |

### ३ प्रमाण व संख्यावाचक

| | | | |
|---|---|---|---|
| फार, पुष्कळ | muito, assás | थोडें, कमी, किंचित् | pouco, um pouco |
| अधिक | mais | उणें, कमी | menos |
| इतका, तितका | tanto | जितका | quanto |
| एवढा, तेवढा | tão | जेवढा | quão |
| बहुतेक, जवळजवळ | quasi | केवळ | apenas |
| पुष्कळ, भरपूर | bastante | कांहींहीं न | nada |

### ४ होकारार्थी

होय, आहे sim

### ५ नकारार्थी

नाहीं, नव्हे não

### ६ संशयार्थी

कदाचित् talvês, acaso, quiçá

### ७ नुसता दर्शक

तो पहा eis

### ८ प्रकारदर्शक

| | | | |
|---|---|---|---|
| चांगलें | bem | वाईट | mal |
| अधिक चांगलें | melhor | अधिक वाईट | piór |
| या प्रकारें, असें | assim | फक्त, एकच,...च | só, sómente. |
| कसें | como | नपेक्षां, नाहींतर | aliás |
| हीं, सुद्धां | tambem | आनंदानें | alegremente |

३४ यांच्याशिवाय सर्व गुणविशेषणांचीं व अनुक्रमवाचक संख्याविशेषणांचीं, 'mente' हा प्रत्यय जोडून प्रकारदर्शक क्रियाविशेषणें करतां येतात; तीं अशीं:—

१ विशेषण एकरूपी (क. २३, २४ व २७ पहा) असलें तर, 'mente' हा प्रत्यय त्याच्या नुसत्या मूळरूपाला जोडावा. उ० prudente-prudentemente= शहाणपणानें, fácil-fácilmente= सुलभपणें; amavel-amavelmente=प्रेमळपणें

२ विशेषण द्विरूपी असलें तर 'mente' हा प्रत्यय त्याच्या स्त्रीलिंगी रूपाला जोडावा. उ० bom स्त्री. boa–क्रियावि. boamente; digno स्त्री. digna–क्रि. वि.– dignamente (योग्यप्रकारें), primeiro स्त्री. primeira–क्रि. वि–primeiramente=पहिल्यांदां

**अपवाद**– ês नें संपणारीं विशेषणें द्विरूपी असूनही त्यांचीं क्रियाविशेषणें, 'mente' हा प्रत्यय स्त्रीलिंगी रूपाला न जोडतां, पुल्लिंगी रूपालाच जोडून करतात. उ० português, portuguêsmente; soês–soêsmente=हलकटपणानें.

१३९ जेव्हां दोन विशेषणांना mente हा प्रत्यय जोडावयाचा असतो तेव्हां, तो फक्त शेवटच्या एकासच जोडण्याचा प्रघात आहे. उ० prudente e inteligentemente, digna e justamente=योग्य आणि बरोबर रीतीनें.

**वि. सू. २२**– muito, pouco, tanto व quanto हे शब्द, सर्वनामें आणि क्रियाविशेषणें होऊं शकतात; सबब, ते ओळखतांना व योजतांना काळजी घ्यावी लागते. हे शब्द सर्वनामें (विशेषणाप्रमाणें योजलेले) असतां नामाबरोबर येतात व नामाप्रमाणें त्यांचें लिंगवचन बदलत असतें; क्रियाविशेषणें असतां त्यांचा संबंध, एखाद्या क्रियापदाकडे, विशेषणाकडे अगर दुसऱ्या विशेषणाकडे असतो व त्यांचें रूप बदलत नाहीं. उ० 'comprei muito leite' यांतील muito विशेषणात्मक सर्वनाम आहे; leite शब्दाच्या जागीं जर 'penas' हा शब्द घातला तर muito याचें रूप muitas असें करावें लागेल. 'Andei muito' यांतील muito क्रियाविशेषण होय.

**वि. सू. २३**– bom व bem, mau व mal यांतील फरकही लक्ष्यांत असों द्यावा. bom व mau हे शब्द विशेषणें आहेत आणि bem व mal हे क्रियाविशेषणें आहेत. हे दोन्ही शब्द नामेंही होऊं शकतात, आणि त्यांचा तसा उपयोग करावयाचा असतां मागें नियामक उपपद घा-

लावें लागतें. उ० o bem=मालमत्ता, चांगलें; o mal=संकट, आजार, वाईट.

**वि. सू. २४**– 'आतांच, कालच, आजच' इत्यादि वाक्यें 'agora mesmo, mesmo ontem किंवा ontem mesmo, hoje mesmo किंवा mesmo hoje' अशीं करतात.

## खालील विशेषणांचीं क्रियाविशेषणें कराः–

| | | | |
|---|---|---|---|
| alto | उंच, उच्च | baixo | सखल, नीच |
| antigo | जुना, प्राचीन | actual, novo | नवा, आजचा |
| completo | पूर्ण, सगळा, पुरता | incompleto | अपूर्ण, अपुरता |
| corajoso | धैर्यवान्, धाडशी | cobarde | भिजुड, भित्रा |
| geral | सार्वत्रिक | particular, especial | खाजगी, खास |
| grato | कृतज्ञ | ingrato | कृतघ्न |
| humilde | गरिब, नम्र | arrogante, soberbo | गर्विष्ट, ताठेखोर |
| obediente | अज्ञाधारक | desobediente | आज्ञा मोडणारा |
| paciente | सहनशील, शांत | impaciente | चिडखोर |
| perfeito | पूर्ण | imperfeito | अपूर्ण |
| pródigo | उधळा | avarento | कृपण |
| puro | शुद्ध, पूर्ण | impuro | अशुद्ध, अपूर्ण |
| santo | साधु | hipócrita (पु.) | ढोंगी |
| sincero | सरळ, निष्कपट | malicioso | कपटी, दंशी |
| sossegado, tranquilo | शांत, थंड | precipitado | उतावळ, गडबड्या |
| tímido | भित्रा | destemido | निर्भय |
| verdadeiro | खरा; सच्चा | falso | खोटा |

**वि. सू. २५**– मागील ४ ते १६ पाठांत आलेल्या विशेषणांचीं क्रियाविशेषणें करा.

## पाठ ४० वा

## वाक्यांत क्रियाविशेषणांचें स्थान

१६६ क्रियाविशेषणें, क्रियापदें, विशेषणें किंवा दुसरीं क्रियाविशेषणें यांचा गुण दाखवतात हे मागें (क. १२९) सांगितलेंच आहे. आतां त्यांच्या वाक्यातील स्थानासंबंधीं सांगावयाचें आहे. पुर्तुगिजींत, क्रियाविशेषणें वाक्याच्या अमुकच भागीं घातलीं पाहिजेत असा नियम नाहीं. तरी, सर्वसाधारणपणें असें ह्मणतां येतें कीं, onde, aonde, quanto, quando, como, nunca, não व jamais हीं, क्रियापदाचा गुण दाखवित असतां त्याच्या आधीं व इतर त्याच्या बहुधा नंतर घालण्याचा प्रघात आहे. Muito व pouco हीं तर क्रियापदांच्या नंतर घालण्याचाच प्रघात विशेष आहे. उ०

| | |
|---|---|
| Ele chega onde eu chego | जेथें मी पोंचतों तेथें तो पोंचतो. |
| Aonde chegaste ontem? | तूं काल कोठें पोंचलास ? |
| Quanto andou êle? | तो किती चालला ? |
| Quando começa a sua escola? | आपली शाळा केव्हां सुरू होते ? |
| O professor como ensina ? | (तो) शिक्षक कसा शिकवतो ? |
| Eu nunca chegaria aqui | मी येथें कधींही पोंचलों नसतों. |
| Ele não estudou a lição | तो धडा शिकला नाहीं. |
| Jamais falarás tanto! | इतकें केव्हांही बोलणार नाहींस! |
| O irmão falou muito mas mal | भाऊ पुष्कळ पण वाईट बोलला |
| A irmã falou pouco mas bem | बहिण थोडें पण चांगलें बोलली |
| D. Diniz reinou prudentemente | दों. दिनिझानें शहाणपणानें राज्य केलें |

१६७ क्रियाविशेषणें, जेव्हां विशेषणाचा अगर दुसऱ्या क्रियाविशेषणाचा गुण दाखवतात तेव्हां तीं विशेषणाच्या व या दुसऱ्या क्रियाविशेषणाच्या पुढें घालावीं लागतात. उ० Os rapazes muito inteligentes estudam muito pouco= फार बुद्धिमान् मुलगे फार थोडें शिकत असतात. Ele preguntou muito humildemente= त्यानें फार नम्रपणें विचारलें .

कावें लागतें. उ० o bem=मालमत्ता, चांगलें; o mal=संकट, आजार, वाईट.

वि. सू. २४– 'आतांच, कालच, आजच' इत्यादि वाक्यें 'agora mesmo, mesmo ontem किंवा ontem mesmo, hoje mesmo किंवा mesmo hoje' अशीं करतात.

## खालील विशेषणांचीं क्रियाविशेषणें कराः–

| | | | |
|---|---|---|---|
| alto | उंच, उच्च | baixo | सखल, नीच |
| antigo | जुना, प्राचीन | actual, novo | नवा, आजचा |
| completo | पूर्ण, सगळा, पुरता | incompleto | अपूर्ण, अपुरता |
| corajoso | धैर्यवान्, धाडशी | cobarde | भिजूड, भित्रा |
| geral | सार्वत्रिक | particular, especial | खाजगी, खास |
| grato | कृतज्ञ | ingrato | कृतघ्न |
| humilde | गरिब, नम्र | arrogante, soberbo | गर्विष्ठ, ताठेखोर |
| obediente | अज्ञाधारक | desobediente | आज्ञा मोडणारा |
| paciente | सहनशील, शांत | impaciente | चिडखोर |
| perfeito | पूर्ण | imperfeito | अपूर्ण |
| pródigo | उधळा | avarento | कृपण |
| puro | शुद्ध, पूर्ण | impuro | अशुद्ध, अपूर्ण |
| santo | साधु | hipócrita (पु.) | ढोंगी |
| sincero | सरळ, निष्कपट | malicioso | कपटी, दंशी |
| sossegado, tranquilo | शांत, थंड | precipitado | उतावळ, गडबड्या |
| tímido | भित्रा | destemido | निर्भय |
| verdadeiro | खरा; सच्चा | falso | खोटा |

वि. सू. २५– मागील ४ ते १६ पाठांत आलेल्या विशेषणांचीं क्रियाविशेषणें करा.

## पाठ ४० वा

## वाक्यांत क्रियाविशेषणांचें स्थान

१३६ क्रियाविशेषणें, क्रियापदें, विशेषणें किंवा दुसरीं क्रियाविशेषणें यांचा गुण दाखवतात हें मागें (क. १२९) सांगितलेंच आहे. आतां त्यांच्या वाक्यातील स्थानासंबंधीं सांगावयाचें आहे. पुर्तुगिजींत, क्रियाविशेषणें वाक्याच्या अमुकच भागीं घातलीं पाहिजेत असा नियम नाहीं. तरी, सर्वसाधारणपणें असें ह्मणतां येतें कीं,
onde, aonde, quanto, quando, como, nunca, não व jamais हीं, क्रियापदाचा गुण दाखवित असतां त्यांच्या आधीं व इतर त्याच्या बहुधा नंतर घालण्याचा प्रघात आहे. Muito व pouco हीं तर क्रियापदांच्या नंतर घालण्याचाच प्रघात विशेष आहे. उ०

| | |
|---|---|
| Ele chega onde eu chego | जेथें मी पोंचतों तेथें तो पोंचतो. |
| Aonde chegaste ontem? | तूं काल कोठें पोंचलास ? |
| Quanto andou êle? | तो किती चालला ? |
| Quando começa a sua escola? | आपली शाळा केव्हां सुरू होते ? |
| O professor como ensina? | (तो) शिक्षक कसा शिकवतो ? |
| Eu nunca chegaria aqui | मी येथें कधींही पोंचलों नसतों. |
| Ele não estudou a lição | तो धडा शिकला नाहीं. |
| Jamais falarás tanto! | इतकें केव्हांही बोलणार नाहींस! |
| O irmão falou muito mas mal | भाऊ पुष्कळ पण वाईट बोलला |
| A irmã falou pouco mas bem | बहिण थोडें पण चांगलें बोलली |
| D. Diniz reinou prudentemente | दों. दिनिझानें शहाणपणानें राज्य केलें |

१३७ क्रियाविशेषणें, जेव्हां विशेषणाचा अगर दुसऱ्या क्रियाविशेषणाचा गुण दाखवतात तेव्हां तीं विशेषणाच्या व या दुसऱ्या क्रियाविशेषणाच्यापुढें घालावीं लागतात. उ० Os rapazes muito inteligentes estudam muito pouco= फार बुद्धिमान् मुलगे फार थोडें शिकत असतात. Ele preguntou muito humildemente= त्यानें फार नम्रपणें विचारलें.

**वि. सू.** २६– "जेथें मी शिकतों तेथें तो शिकतो, जेव्हां मी जेवतों तेव्हां तो जेवतो, जितका मी फिरतों तितका तो फिरतो, जसा मी बोलतों तसा तो बोलतो" वगैरेसारखीं वाक्यें पुर्तुगिजींत मराठीहून भिन्न पद्धतीनें रचितात. तीं अशीं:– मराठींत जें वाक्य, 'तेथें, तेव्हां' इत्यादि शब्दांनंतर येतें तें पुर्तुगिजींत आधीं घ्यावें, तदनंतर, 'onde, quando, quanto, como' इत्यादि शब्द घ्यावे व तदनंतर मराठींत जें वाक्य 'जेथें, तेव्हां' इत्यादि नंतर येतें तें घ्यावें. पुर्तुगिजींतील, 'onde, quando व como' या फक्त एकेका शब्दांत "जेथें....तेथें, जेव्हां....तेव्हां, जसा....तसा" या दर जोडीचा अंतर्भाव होतो. वरील वाक्यांचें भाषांतर, अर्थात्च, खालील प्रमाणें करावें लागेल:– Ele estuda onde eu estudo, êle janta quando eu janto, êle anda tanto quanto eu ando. Ele fala como eu falo.

१३८ कोणतेंही **क्रियापद** 'होय' किंवा 'नाहीं' या अर्थानें चालवलें असतां जो फरफार होतो त्यास क्रियापदाचें **रूप** असें ह्मणतात. 'होय' अशा अर्थानें चालवलें तर **करणरूप** आणि 'नाहीं' अशा अर्थानें चालवलें तर **अकरणरूप** असें ह्मणतात. पुर्तुगिजींत, क्रियापदाचें **अकरणरूप**, अर्थात्च, त्याच्या आधीं 'não' हें क्रियाविशेषण अव्यय घालून करतात. उ० 'Eu estudei" चें अकरणरूप 'Eu **não** estudei'.

## खालील वाक्यांचें भाषांतर करतांना क्रियाविशेषणांच्या स्थानाकडे लक्ष्य द्या:—

Ele amava muito a sua filha. Eu andei quasi todo o mundo. O homem não entrou dentro. A rapariga deitou fóra os seus livros. Nós nunca chegámos alí. O professor ensinou bem o seu aluno. Onde deixaste o tinteiro? Deixei lá fóra. Lavaste jà o resto? Não o lavei ainda. Quando chegará aqui o seu irmão? Ele chega amanhã. Quando acabastes vós o vosso trabalho? Acabamos onteín o nos-

so tabalho. O carpinteiro leva hoje á mobília. Hoje nós acordámos muito cedo. Estas mulheres chegam sempre tarde. Antes dansou o homem mas depois chorou. O relogeiro ainda não concertou o relogio. Mando logo os livros. O hospital fica muito longe. Ainda não tomaste chá? Anda sim, mas pára constantemente (= फिरून फिरून). Estudastes a lição? sim senhor, estudámos um pouco. Eis os soldados, marcham todos. A época (= ठरावीककाळ) chegou perto. Aqui dansam os rapazes, acolá as raparigas. Eu passeava aquêm, ela além. Atrás marchava o general (सेनाधिपति) adiante os soldados. Apanhei nada. Tu estudaste todas as lições, eu apenas uma. O caçador caçou só um coelho. Ninguêm gosta caçar porcos caseiros (पाळीव). Esta estuda bem, aquele melhór. Esta canta mal, ela piór. A avó contou um conto (= कहाणी) assás longo (= लांब) Felizmente emprestei uma só rupia. Ela comprou sòmente cinco folhas. O outro tambem ensina bem. O orador falou eloqüentemente. Como estuda o meu filho? Não muito mal. Elas não pronunciam assim. Ele janta tanto quanto êste. O primeiro ensina como o segundo. Este anda onde ela anda. Quando um contraria, outros tambem contrariam. Ela copiou lindamente o livro. Ele nunca penitenciaria. Ele critica sempre assim mesmo.

---

## पाठ ४१ वा

| | |
|---|---|
| घाईघाईने, जलद | apressadamente |
| तिकीट (गाडी, बोट वै. ची), पोस्टकार्ड | bilhete |
| भांडें, हंडा | caldeira, vaso |
| दोरा | corda |
| किंमत पडणें | custar |
| काळजीनें, दक्षतेनें | cuidadosamente |
| द्रव्य, पैसा | dinheiro |

| | |
|---|---|
| पोस्टाची तिकीट | estampilha |
| परिक्षा घेणें, पारखणें | examinar |
| शेवटीं | finalmente |
| घट्ट, बळकटपणें | fortemente |
| खर्च करणें, संपवणें | gastar |
| लढणें, लढाई करणें | guerrear |
| फळबाग | horta |
| दर्शविणें, दाखवून देणें | indicar |
| फुलबाग, बागीचा | jardim |
| कसून, सूक्ष्मपणें | minuciosamente |
| राहणें, वास्तव्य करणें | morar |
| दाखवणें | mostrar, apresentar |
| मजुर | operário |
| सावकाश, हळु हळु | pausadamente |
| पाव आणा, पैसा | poiçá |
| शिंपणें, पाणी घालणें | regar |
| बाकीचा, राहिलेला | restante |
| खरोखर | realmente |
| (सरकारी) तिकिटा | sêlo |
| संथपणें, सावकाश | sossegadamente |
| परतणें, फिरून येणें | voltar |

वक्ता सावकाश बोलत होता. जशी ती सूत कांतते तशी ही कांतते. मीं काल कांहीं खुर्च्या विकत घेतल्या. तो येथें चाळीस दिवस राहिला. आह्मीं तेथें कालच पोंचलों. मी आज न्याहारी करित नाहीं. आंत बायका नाचत होत्या, बाहेर पुरुष खेळत होते. तुह्मीं कोठें शिकता? आह्मीं येथेंच शिकतों. कासारानें भांडीं फार काळजीनें दुरुस्त केलीं. ती नंतर जेवील. तो केव्हांही परतणार नाहीं. तिनें दोनही दोऱ्या घट्ट बांधल्या. त्यांनीं बॅ. दासांची फार स्तुति केली. ती जितकी शिकते तितकी ही शिकते. तो चांगलें गातो. पण ही अधिक चांगलें गाते. घोडे जलद चालत होते. ढोंगी साधूंची नित्य निंदा करतात. तिनें दोन्ही चित्रकाराची, सूक्ष्मपणें तु-

लना केली. राहिलेल्यांची परिक्षा उद्यां घेईन (=राहिलेल्या उद्यां परिक्षीन) माळ्यानें बगिच्याची पुष्कळ काळजी घेतली पण बागेची तितकी घेतली नाहीं. जेव्हा आह्मीं विश्वास ठेवतों तेव्हा तुह्मीं ठेवतां. लीला फुलें गुंफते व कमलाही गुंफते. शिक्षक सहनशीलपणें शिकवित होता. हे मजुर उशिरा पोंचतात पण ते लवकर पोंचतात. ती अलीकडे सहल करते व मी पलीकडे सहल करतों. जेथें मीं हेरतों तेथें ती हेरते. तूं पाटी केव्हां फोडलीस? आतांच. तो चांगलें बोलतो आणि हा वाईट बोलत नाहीं. होय, मी तेथेंच शिकवतों. तो लगेच दाखवता. प्रत्येक पोष्टकार्डाला फक्त एकच पैसा किंमत पडते. तो आधीं पोंचता. तुह्मीं हें द्रव्य कोठें नेतां? वर नेतों. रामानें खालीं तिकिटा ठेवल्या व वर दौत ठेवली. हा थोडें बोलतो पण पुष्कळ कथन करतो आणि तो फार बोलतो पण कांहींच कथन करित नाहीं. हा गवई वाईट गातो तर (=व) तो अधिक वाईट गातो. कोणी तरी विरूद्ध जाता (=गेला असता). तो शिपाई धैर्यानें लढता. तो शिक्षक खरोखरच चांगलें शिकवित होता. आह्मीं दूर राहत होतों पण ती जवळ रहात होती. तो केव्हांही हांजी हांजी करताना. तो नित्य अशीच चर्चा करतो.

---

## पाठ ४२ वा

## नियमित क्रियापदें

द्वितिय व तृतियगण

## कर्तरी प्रयोग—स्वार्थ—साधे काळ

## वर्तमान काळ

१३९ द्वितिय व तृतिय गणांचीं क्रियापदें धात्वर्थीं अनुक्रमें er व ir नें संपतात आणि हे प्रत्यय काढून टाकले ह्मणजे जो अक्षरसमुच्चय राहतो त्यास 'धातु' ह्मणतात हें मागें सांगितलेंच आहे. द्वितिय

गणाच्या धातूंस o, es, e, emos, eis, em आणि तृतिय गणाच्या धातूंस o, es, e, imos, is, em हे प्रत्यय जोडले असतां, स्वार्थाच्या वर्तमान काळाचीं दोन्ही वचनाच्या तीनही पुरुषांचीं रूपें अनुक्रमें सिद्ध होतात. उदाहरणार्थ 'escrever (= लिहिणें) व unir (= जोडणें, एकत्रकरणें) हीं क्रियापदें चालवून दाखवलीं आहेत तीं पाठ करावीं.

**वि. सू. २७** — द्वितिय व तृतिय गणाच्या धातूंचे, स्वार्थाच्या वर्तमान काळाचे, द्वितिय व तृतिय पुरुषाचे अनेक वचनीं प्रत्ययच काय ते भिन्न असून बाकी सर्व सारखे आहेत. विशेषसूचना १८ फिरून एकदां वाचावी.

**द्वितिय गण,** escrever

| | | | |
|---|---|---|---|
| ए. व. | प्र. पु. | मी लिहितों | eu escrevo |
| | द्वि. पु. | तूं लिहितोस | tu escreves |
| | तृ. पु. | तो लिहितो | êle escreve |
| अ. व. | प्र. पु. | आह्मीं लिहितों | nós escrevemos |
| | द्वि. पु. | तुह्मीं लिहितां | vós escreveis |
| | तृ. पु. | ते लिहितात | êles escrevem |

**तृतिय गण,** unir

| | | | |
|---|---|---|---|
| ए. व. | प्र. पु. | मी जोडतों | eu uno |
| | द्वि. पु. | तूं जोडतोस | tu unes |
| | तृ. पु. | तो जोडतो | êle une |
| अ. व. | प्र. पु. | आह्मीं जोडतों | nós unimos |
| | द्वि. पु. | तुह्मीं जोडतां | vós unis |
| | तृ. पु. | ते जोडतात | êles unem |

| | |
|---|---|
| शिकणें. पढणें | aprender |
| ठोठावणें. ठोकणें. मारणें | bater |
| पिणें | beber |
| स्वाधीन करणें. देणें | ceder |
| भक्षण करणें, खाणें | comer |
| पळणें, धावणें | correr |
| बचाव करणें, संरक्षण करणें | defender |
| अवलंबून असणें | depender |
| कर्तव्य असणें, देणें लागणें | dever |
| परत करणें | devolver |
| कळणें, समजणें | entender |
| घुसडणें आंत घालणें | meter |
| चावणें | morder |
| मरणें | morrer |
| कळणें, समजणें | perceber |
| वचन देणें | prometer |
| घेणें | receber |
| निश्चय करणें, सोडवणें | resolver |
| सोडविणें | solver |
| विकणें | vender |
| जिवंत रहाणें, वांचणें | viver |
| करपवणें, दग्ध करणें | aduzir |
| उघडणें | abrir |
| काढणें, मिळवणें. सांपडविणें | adquirir |
| वाहणें, वाहून येणें | afluir |
| बुडविणें | afundir |
| लढाईची सवय करणें | aguerrir |
| कळवून देणें, उद्देशून बोलणें | aludir |
| मान्य करणें, रुकीर देणें | anuir |
| काढून टाकणें. हद्दपार करणें | banir |
| ( इमारत ) बांधणें, रचणें | construir |
| बजावणें, पाळणें | cumprir |

| | |
|---|---|
| विभक्त करणें | desunir |
| वजाकरणें. कमी करणें | diminuir |
| वास्तव्य करणें, असणें | existir |
| कढविणें, वितळविणें | fundir |
| हमी देणें, मदत देणें | garantir |
| सार काढणें, थोडक्यांत करणें | resumir |
| काढून टाकणें, लोप करणें | suprimir |
| भरून काढणें | suprir |
| रचणें, दोऱ्या पसरणें, युक्ती योजणें | urdir |
| भूं भूं आवाज करणें | zunir |

मी शिकतों. तूं मऊ करतोस. ती उघडते. तें पितें. आह्मीं मिळवतों. तुह्मी स्वाधीन करतां. ते सांपडवितात. त्या खातात. तीं वाहून येतात. मी धावतों. तूं बुडवितोस. तो संरक्षण करतो. ती लढाईची सवय करते. आह्मीं घेतों. तुह्मीं उद्देशून बोलतां. त्या हुकार देतात. तुह्मीं काढून टाकतां. तो चमकवितो. ती अवलंबून असते. आह्मीं देणें लागतों. मी परत करतों. तुह्मीं समजतां? तुला कळते? तो सहज (facilmente) वचन देतो पण केव्हांही पाळित नाहीं. तो चुळबळतो. ती घुसडते. तीं चावतात. मी वजा करतों. तूं वितळवितोस. मी हमी देतें. ती लोप करते. त्या भरून काढतात. आह्मीं दोऱ्या (किंवा जाळें) पसरतों. वारा सूं सूं करतो. मी निश्चय करतें. तूं सोडवितेस. ती झाडते. त्या विकतात. मी एक उदाहरण सांडवितों. व्यापारी विकित असतात, गिऱ्हाईक (= os freguezes) विकत घेत असतें. मला हें समजत नाहीं. घोडे धावतात. शिपाई तरवारी (as espadas) परजतात.

---

## पाठ ४३ वा.

### द्वितिय व तृतिय गणांच्या क्रियापदांच्या लेखनाविषयीं सूचना.

[ क्रियापदांच्या लेखनांत होणारे खालील फेरफार, धात्वर्थीं, त्यांच्या शेवटच्या अवयवाचा जो उच्चार असतो तो कायम राहण्याकरतां करावे लागतात हें लक्ष्यांत घेतलें ह्मणजे त्यांची सहज आठवण राहते. ]

१४० Cer व cir नें संपणाऱ्या क्रियापदांच्या धातूंपुढें o किंवा a आला असतां c ला cedilha द्यावें लागतें. उ० ( ओळखणें, जाणणें=) conhecer या क्रियापदाचा धातु conhece असा आहे. त्याच्यापुढें एकवचनी प्रथम पुरुषाचा o हा प्रत्यय आला तर conheco असा उच्चार होईल. तो तसा न व्हावा ह्मणून c खालीं cedilha द्यावें लागून conheço असें लिहावें लागतें. त्याचप्रमाणें ( मोबदला देणें, नुकसानभरपाई करणें= ) ressarcir चें eu ressarço असें (एकवचनाच्या प्रथम पुरुषाचें रूप) लिहावें लागतें.

१४१ Ger व gir नें संपणाऱ्या क्रियापदांच्या धातूंपुढें o किंवा a आला असतां g च्या जागीं j येतो. उ० (निवडणें, निवडून देणें=) eleger चें eu elejo, (रंग देणें=) tingir चें eu tinjo अशीं रूपें होतात.

१४२ Guer व guir नें संपणाऱ्या क्रियापदांच्या धातूंपुढें o अगर a आला असतां धातूंतील अंत्य u चा लोप होतो. उ० (उचलणें, उभारणें=) erguer चें eu ergo, (भेद पहाणें, निरनिराळें दाखवणें, प्रतिष्ठा करणें=) distinguir चें eu distingo अशीं रूपें होतात.

**अपवाद**– (प्रश्न विचारणें=) argüir सारख्या ज्या क्रियापदांत u चा उच्चार स्वतंत्र होतो त्यांच्या धातूंतील u चा लोप होत नाहीं. उ० eu argúo.

---

| | |
|---|---|
| वाढणें, उंच होणें | crescer |
| खालावणें, कमी होणें | decrescer |
| उतरणें, खालीं येणें | descer |
| विसरणें | esquecer |
| जन्मणें | nascer |
| विणणें | tecer |
| पिळ देणें किंवा घालणें | torcer (सक. क्रि.) |
| मऊ करणें | aduzir |
| आंवळून आणणें, संकोच करणें | adstringir |
| भिणें, खेद करणें, कष्ट पावणें | afligir |
| आंखूड करणें, अडखळावणें, अडविणें | constringir |
| हांकणें, चालवणें, मार्ग दाखवणें | dirigir |
| काढून टाकणें, नाहींसा करणें | extinguir |
| कारभार चालवणें | reger |
| प्रकाशमान होणें, चकाकणें | resplandecer |
| आकुंचित करणें | restringir |
| उत्तर करणें | redarguir, responder |
| फार हळू बोलणें | tugir |

---

| | | | |
|---|---|---|---|
| भीति घालणें, भिवविणें, भेवडावणें | amedrontar | चिलटें, मूम | mosca |
| फेकणें | atirar | दाखवणें | mostrar |
| वाट, मार्ग | caminho | (पक्षांचें) घरटें | ninho |
| नकाशा, पत्र | carta | पक्षी | pássaro |
| कमावलेलें कातडें | coiro | दरवाजा, दार | porta |
| पसरविणें | estender | नोकर, चाकर | servente, criado |
| लपवणें | esconder | भिणें | temer (सक. क्रि.) |
| फळ | fruta | खरें, सत्य | verdade |
| वेडा, खुळा | louco, tolo | आयुष्य, जीवन, जिणें | vida |
| मृत्यु, मरण | morte | उडणें | voar |

## खालील वाक्यांचें भाषांतर करा:-

Os pássaros fabricam ninhos. Os homens fabricam casas. Os homens edificam tambem, templos, pilares, hospitais. Os elefantes temem o leão. As aves voam. Os animais morrem. As árvores nascem, crescem e morrem. Os serventes fecham as portas. Ela esconde a roupa. Ela mostrou a lingua. Eu fechei os olhos. Aquele rapaz tolo come frutas amargas (= कडू). Os caçadores amedrontaram os leões. Os homens corajosos não temem a morte. Ela comprara os botões verdes. Alguns homens levam uma vida agradável. Aquele mercador vende coiro. Os ladrões escondem as caixas roubadas (= चोरलेल्या). Eu conheço o homem. Os professores castigam os alunos maus.

कांहीं माणसें अंडीं खातात. मी त्या माणसाला ओळखतों. मी उतरतों. मी विसरतों. मी मऊ करतों. माणसें गायांना भीत नाहींत. तो मूर्ख माणूस त्या गरिब मुलांना भेवडावतो. आज मी कारभार करतों. तो विचारतो आणि मी उत्तर करतों. तो नित्य हळूच बोलतो. तो नवरा आपल्या बायकोला मारतो. मी काढून टाकतों. तो माझ्या मुलांना शिकवित होता. ती चांगलें गाईल. ती सत्य बोलती आणि मी खोटें बोलतोंना. मी चालवतों. मी खेद करतों. चांगले शिक्षक आपल्या शिष्यांना केव्हांही मारित नाहींत. मी आकुंचित करतों. ती सदोदित पत्रें लिहित असते. तूं वाट दाखवशील? पक्षी घरटीं बांधतात आणि माणसें घरें बांधतात. माणसें मरतात. पक्षी चिलटें खातात. तो विणतो. झाडें सदोदित उंच होत जातात, कधींही खालावत नाहींत. ती कपडें विणते. ही दोरीला पीळ घालते. तो आनंदानें जीवन घालवतो. माणसें वाघांनासुद्धां भीति घालतात. ते पसंरावतात. आम्हीं निवडून देतों. मी भेद पहातों. त्या उभारतात. तुम्ही भरपाई करता.

## पाठ ४४ वा.

### तृतिय गणांतील क्रियापदांच्या लेखनांत होणारे फेरफार.

१४३ धात्वर्थी air नें संपणाऱ्या क्रियापदांच्या धातूस, स्वार्थी वर्तमान काळाच्या प्रथम पुरुषाचा एकवचनी 'o' हा प्रत्यय व विध्यर्थी वर्तमान काळाचे सर्व प्रत्यय जोडतांना धातूंतील अन्त्य a व ते प्रत्यय यांच्या मध्यें 'i' चा आगम होत असतो. उ० sair(=बाहेर पडणें, निघणें) चें प्र. पु. रूप— eu saio. (विध्यर्थाचा वर्तमानकाळ:— eu saia, tu saias, êle saia, nós saiamos, vós saiais, êles saiam.)

१४४ धात्वर्थी uzir नें संपणाऱ्या क्रियापदांच्या, स्वार्थाच्या वर्तमानकाळांत एकवचनी तृतिय पुरुषाच्या 'e' या प्रत्ययाचा लोप होत असतो. उ० 'conduzir' या क्रियापदाच्या स्वार्थी वर्तमानकाळाचें तृतिय पुरुषाचें रूप नियमाप्रमाणें êle conduze असें असावयाचें पण तें conduz असें असतें.

१४५ खालील दहा क्रियापदांच्या, स्वार्थी वर्तमानकाळाच्या एकवचनाच्या द्वितिय व तृतिय आणि अनेक वचनाच्या तृतिय पुरुषाच्या रूपांत u च्या जागीं o येतो. उ० acudir या सकर्मक क्रियापदांची स्वार्थाच्या वर्तमानकाळाचीं रूपें:— eu acudo, tu acódes, êle acóde, nós acudimos, vós acudis, êles acódem.

| | |
|---|---|
| acudir | प्रसंगास पावणें, साह्य देणें |
| bulir | चळवळणें, हालणें |
| escapulir | सोडून देणें, ताब्यातून सोडणें |
| fugir | पळणें, चुकविणें |
| consumir | खाऊन टाकणें, खर्च करणें |
| cuspir | थुंकणें |
| engulir | गिळणें |
| sacudir | हलविणें, झाडपणें |
| subir (स.) | चढणें, वाढणें |
| sumir | बुडविणें, नाश करणें, लपवणें |

१४६ खालील सात क्रियापदांच्या, स्वार्थी वर्तमानकाळाच्या, एकवचनाच्या प्रथम पुरुषाच्या आणि विध्यर्थी वर्तमान काळाच्या सर्व पुरुषांच्या रूपांत o च्या जागीं u येतो; आणि स्वार्थी वर्तमान काळाच्या एक वचनाच्या द्वितिय व तृतिय व अनेकवचनाच्या तृतिय पुरुषाच्या रूपांत o चा उच्चार ó असा होतो. उ० (झांकणें=)cobrir चीं स्वार्थाच्या वर्तमान काळाचीं रूपें:— eu cubro, tu cóbres, êle cóbre, nós cobrimos, vós cobris, êles cóbrem.

| | | | |
|---|---|---|---|
| abolir | रद्द करणें | dormir | निजंण |
| demolir | मोडणें, खालीं पाडणें | encobrir | वेष्टिणें, झांकणें |
| descobrir | शोध लावणें, उघडणें | tossir | खोंकणें |

१४७ खालील सात क्रियापदांच्या स्वार्थी वर्तमान काळाच्या एकवचनाच्या तीनही व अनेक वचनाच्या तृतिय व विध्यर्थी वर्तमान काळाच्या सर्व पुरुषांच्या रूपांत, क्रियापदांतील शेवटच्या e च्या जागीं i येतो. उ० (अडखळ करणें, अडविणें=) impedir चीं स्वार्थी वर्तमान काळाचीं रूपें:— eu impido, tu impides, êle impide, nós impedimos, vós impedis, êles impidem.

| | | | |
|---|---|---|---|
| agredir | विरूद्ध जाणें, हल्लाकरणें | prevenir | इषारा देणें, सुचवणें |
| despedir | निरोप देणें | progredir | भरभराट होणें, सुधरणें |
| expedir | पाठवणें, धाडणें | transgredir | उल्लंघिणें, मोडणें, भंग करणें |

---

| | |
|---|---|
| atrair | आकर्षण करणें, ओढून घेणें |
| cair | पडणें |
| contrair | आकुंचित करणें, आखुडणें |
| destrair | विभक्त करणें, काढणें, दुर्लक्ष्य करणें |
| retrair | मागें घेणें, परत आणणें |
| subtrair | वजाकरणें |
| trair | फसवणें, विश्वासघात करणें |
| aduzir | पुढें उभा करणें, दाखवणें |

| | |
|---|---|
| conduzir | नेणें, हांकणें |
| deduzir | बाहेर आणणें, सिद्धांत काढणें |
| induzir | आंत नेणें, घालणें, पदरीं बांधणें |
| luzir | चकाकणें |
| produzir | उत्पन्न करणें, पिकवणें |
| reduzir | कमी करणें, रूप देणें |
| seduzir | मोडून टाकणें, मारणें, फूस लावणें |

## खालील वाक्यांचें भाषांतर कराः—

मी आकर्षण करतों. तूं पडतोस. तो आकुंचित करतो. आह्मी दुर्लक्ष्य करतों. तुह्मीं मागें घेतां. त्या वजा करतात. मी फसवतों. मी पडतों. मी बाहेर पडतों. मी नेतों. तूं सिद्धांत काढतोस. ती आंत नेते. तें चकाकतें. तो उत्पन्न करतो. तुह्मीं कमी करतां. ती मोडून टाकते. त्या उत्पन्न करतात. मी हल्ला करतों. तूं निरोप देतोस. तो पाठवतो. आह्मीं उल्लंघितों. तुह्मीं सुचवितां. मीं इषारा देतों. ते भरभराटतात. मीं अडवितों. ते भंग करतात. मी वेष्टितों. तूं निजतोस. तो खोंकतो. आह्मीं शोध लावतों. तुह्मीं रद्द करतां. ते घरें खालीं पाडतात. मीं रद्द करतों. ते खोंकतात. ती बुडविते. मीं चढतों. तो हलवितो. तुह्मीं गिळतां. ते थुंकतात. ते खाऊन टाकतात. तूं पळतोस त्या सोडून देतात. मीं प्रसंगास पावतों. मीं पळतों. ती चळवळते. (Contrair, produzir, fugir, dormir व agredir हीं क्रियापदें स्वार्थाच्या वर्तमान काळांत चालवून दाखवा.)

---

## पाठ ४९ वा

१४८ खालील क्रियापदांच्या स्वार्थी वर्तमान काळाच्या प्रथम आणि विध्यर्थी वर्तमान काळाच्या सर्व पुरुषांच्या रूपांत, शेवटच्या e च्या जागीं i येतो. उ० repetir चें eu repito; विध्यर्थ— eu repita tu repitas इत्यादि. त्याच प्रमाणें mentir चें eu minto;

विध्यर्थ– eu minta tu mintas êle minta, nós mintamos, vós mintais, êles mintam.

| | |
|---|---|
| aderir | चिकटणें, मिळणें, पाठिंबा देणें |
| inserir | शिरकावणें, मध्यें घालणें |
| preterir | गाळणें, अधिक नापसंत करणें |
| compelir | बलत्कार करणें, भाग पाडणें |
| expelir | झिडकारणें, घालवून देणें |
| impelir | पुढें लोटणें, ढकलणें |
| repelir | दूर सारणें, लोटणें, नाकारणें |
| competir | स्पर्धा करणें, योग्य होणें |
| repetir | फिरून करणें, पुन्हा सांगणें |
| convergir | एकाच बिंदूकडे जाणें |
| divergir | केंद्रापासून फांकणें, भिन्नत्व असणें |
| emergir | उदयास येणें, वर येणें |
| submergir | बुडविणें |
| aspergir | खराब करणें, शिंतोडे उडवणें |
| gerir | व्यवस्था करणें, चालवणें |
| ferir | दुखापत करणें, हाणणें, टोंचून बोलणें |
| aferir | मापें अजमावणें व शिक्का मारणें |
| auferir | आदाकरणें, उत्पन्न होणें |
| comferir | तपासणें, ताडून पहाणें, देणें, भाषणकरणें |
| deferir | मंजूर करणें, भीड धरणें |
| diferir | अंतर असणें, तफावत पडणें, शीघ्र सोडणें |
| inferir | तर्क करणें, अनुमान काढणें |
| preferir | आधीं पसंत करणें, विशेष चहाणें |
| proferir | भाषण करणें, उच्चारणें |
| referir | उद्देशून बोलणें, लागू पडणें |
| transferir | बदली करणें |
| seguir | पुढें चालवणें, मागें चालणें, मागून येणें |
| conseguir | साध्य करणें, संपादणें |
| perseguir | छळणें, गांजणें, पीडाकरणें |
| prosseguir | पुढें चालू करणें, पिच्छा पुरवणें |

| | |
|---|---|
| digerir | जिरवणें. पचवणें |
| ingerir | रिघणें, बुडबुडणें, आंत शिरणें |
| sugerir | ध्यानांतघालणें,मनांत आणणें,सुचवणें |
| discernir | तारतम्य पहाणें |
| divertir | रंजविणें. रमविणें |
| advertir | इशारत देणें, बोध करणें |
| mentir | खोटें बोलणें |
| reflectir | विचार करणें. परावर्तन पावणें |
| sentir | स्पर्श करणें. भासणें. वाईट वाटणें |
| servir | उपयोगी पडणें, कामास लावणें |
| vestir | नेसवणें, भूषविणें |
| revestir | पुन्हां नेसवणें, भूषविणें |

---

मी चिलगतों. तूं दुखापत करतोस. तो पचवतो. ती खोटें बोलते. आम्हीं शिरकावतों. तुम्हीं मापें अजमावून शिक्का मारतां. तें लुडबुडतें. ते विचार करतात. त्या गाळतात. मी ताडून पाहतों. तूं तारतम्य पहातोस. तो भाग पाडतो. आम्हीं आदा करतों. तें उपयोगीं पडतात. मी सुचवतों. तूं झिडकारतोस. ती भीड धरते. आम्हीं रंजवितों. तुम्हीं नेमावितां. ते भूषवितात. मी बोध करतों. तूं दूर सारतोस. तो अनुमान करतो. ते स्पर्धा करतात. आम्हीं विशेष चहातों. मी फिरून सांगतों. तुम्हीं उच्चारतां. ते एकाच बिंदूकडे जातात. त्या केंद्रापासून फांकतात. तुम्हीं बदली करतां. ती उदयास येते. तुम्हीं बुडवितां. आम्हीं साह्य करतों. तो शितोडे उडवतो. तुम्हीं फार छळतां. ते व्यवस्था करतात. मीं पुढें चालवतों. (Conseguir व ferir हीं क्रियापदें चालवून दाखवा.

## पाठ ४६ वा

## अपूर्ण व पूर्ण भूतकाळ

१४९ द्वितिय व तृतिय गणांच्या धातूंस, ia, ias, ia, iamos, ieis, iam हे प्रत्यय जोडले असतां, स्वार्थाच्या अपूर्ण भूत काळाचीं दो-

न्हीं वचनांच्या तिन्ही पुरुषांचीं रूपें अनुक्रमें सिद्ध होतात. उ०

| | |
|---|---|
| मी लिहित होतों | eu escrevia |
| तूं लिहित होतास | tu escrevias |
| तो लिहित होता | êle escrevia |
| आह्मी लिहित होतों | nós escreviamos |
| तुह्मीं लिहित होतां | vós escrevieis |
| ते लिहित होते | êles escreviam |

---

| | |
|---|---|
| मी जोडित होतों | eu unia |
| तूं जोडित होतास | tu unias |
| तो जोडित होता | êle unia |
| आह्मी जोडित होतों | nós uníamos |
| तुह्मीं जोडित होतां | vós unieis |
| ते जोडित होते | êles uniam |

१९० द्वितिय गणांतील धातूंस, i, este, eu, émos, estes, eram व तृतिय गणांतील धातूंस, i, iste, iu, imos, istes, iram हे प्रत्यय जोडले ह्मणजे स्वार्थाच्या पूर्ण भूतकाळाचीं दोनही वचनाच्या तीनही पुरुषांचीं रूपें अनुक्रमें तयार होतात. (क १९४ पहा.)

| | | | |
|---|---|---|---|
| मीं लिहिलें | eu escrevi | मीं जोडलें | eu uni |
| त्वां लिहिलें | tu escreveste | त्वां जोडलें | tu uniste |
| त्यानें लिहिलें | êle escreveu | त्यानें जोडलें | êle uniu |
| आह्मीं लिहिलें | nós escrevémos | आह्मीं जोडलें | nós unímos |
| तुह्मीं लिहिलें | vós escrevestes | तुह्मीं जोडलें | vós unístes |
| त्यांनीं लिहिलें | êles escreveram | त्यांनीं जोडलें | êles uniram |

---

| | | | |
|---|---|---|---|
| costume | चाल, संवय | heroico | शूरास उचित |
| dívida | ऋण | inimigo | शत्रु |
| falta | कमतरता, गैरहजिरी | traição | विश्वासघात, संकट |

## खालील वाक्यांचे भाषांतर करा:—

O rei e a raínha saíram ontem. Eu bebia leite quando tu comias pão. O rapaz não abriu a bôca. Os soldados defenderam heroicamente a cidade. Ainda não devolveste o meu livro? Ele supriu a minha falta. As abelhas zunem. Os inimigos urdiram uma traição. Nós banímos aquele costume. Morreram quatro mil homens. Tu não percebeste bem a lição. Vós cumpristes o vosso dever (= कर्तव्य) Quinhentas rupias garanto eu. Resolvestes os problemas? Ele já não vivia quando eu cheguei. Eu adquiri uma dívida. O médico demoliu todos os templos, ambas as mesquitas e as igrejas também. Colombo descobriu o Brazil. O doente tossia muito. Eu torci a sua orelha. Vós dormistes ontem todo o dia.

मी मिळालों. तूं झिडकारित होतास. त्यानें दूर सारलें. आह्मी स्पर्धा करित होतों. तुह्मीं बदली केली. त्यांनीं तोच मार्ग पुढें चालवला. ते ताडून पहात होते. त्यानें अर्ज मंजूर केले. मी छळलें नाहीं. ते एकाच बिंदूकडे जात होते व हे बिंदूपासून फांकत होते. त्वां बुडविली. मी पुन्हा सांगत होतों. तो उच्चारित होता. आह्मीं पुढें लोटित होतों. तुह्मी सुचवित होतां. मी पीळ देत होतों. त्वां विणलें. तो विसरत होता. आह्मीं खालीं आलों. तुह्मी खेद करित होतां. त्यांनीं मऊ केलें. मी आवळून आणलें. तूं कारभार चालवित होतास. तो चकाकला. आह्मीं प्यालों. तुह्मी खात होतां. ते धांवले. त्यांनीं मारलें. आह्मीं पडलों. तुह्मी पढलां. मी आकुंचित केलें.

### पाठ ४७ वा

### अपूर्ण भविष्य व भविष्यभूत काळ.

१९१ द्वितिय गणाच्या धातूंस erei, erás, erá, eremos, ereis, erão व तृतिय गणाच्या धातूंस irei, irás, irá, iremos, ireis, irão

हे प्रत्यय जोडले ह्मणजे अपूर्ण भविष्य काळाचीं दोन्ही वचनाच्या तिन्ही पुरुषांचीं रूपें अनुक्रमें सिद्ध होतात. उ०—

| | | | |
|---|---|---|---|
| मी लिहीन | eu escreverei | मी जोडीन | eu unirei |
| तूं लिहिशील | tu escreverás | तूं जोडशील | tu unirás |
| तो लिहील | êle escreverá | तो जोडील | êle unira |
| आह्मीं लिहूं | nós escreveremos | आह्मीं जोडूं | nós uniremos |
| तुह्मीं लिहाल | vós escrevereis | तुह्मीं जोडाल | vós unireis |
| ते लिहितील | êles escreverão | ते जोडतील | êles unirão |

१५२. द्वितिय गणाच्या धातूंस eria, erias, eria, eriamos, erieis, eriam व तृतिय गणाच्या धातूंस iria, irias, iria eriamos, irieis, iriam हे प्रत्यय जोडले ह्मणजे भविष्य भूत काळाचीं, दोन्हीं वचनाच्या तीन्ही पुरुषाचीं रूपें अनुक्रमें सिद्ध होतात. उ०—

| | | | |
|---|---|---|---|
| मी लिहितों | eu escreveria | मी जोडतों | eu uniria |
| तूं लिहितास | tu escreverias | तूं जोडतास | tu unirias |
| तो लिहिता | êle escreveria | तो जोडता | êle uniria |
| आम्हीं लिहितों | nós escreveriamos | आह्मी जोडतों | nós uniriamos |
| तुह्मीं लिहितां | vós escreverieis | तुह्मीं जोडतां | vós unirieis |
| ते लिहिते | êles escreveriam | ते जोडते | êles uniriam |

**वि. सू.** २८— ( वि. सू. १९ पहा ) 'मी बोलावयास पाहिजे होतें, त्यानें शिकलें पाहिजे' अशा सारख्या वाक्याचा अर्थ कर्तव्यदर्शक ह्मणजे 'बोलणें हें माझें कर्तव्य होतें, शिकणें हें त्याचें कर्तव्य आहे' असा असतां 'dever' या क्रियापदाची योजना करतात. वरील वाक्याचें भाषांतर, अर्थात, 'eu devia falar, êle deve estudar' असें करावें लागेल.

**वि. सू.** २९— 'मी नक्कल करण्याचें वचन दिलें, त्यानें पांच हजार रुपयांची हमी दिली,' 'मी पत्र लिहिण्याचें वचन देतों ना' वगैरे सारखीं वाक्यें 'eu prometi copiar, êle garantiu cinco mil rupias, eu não prometeria escrever a carta. अशी करतात.

वि. सू. १०— 'मी लिहिण्यास अगर लिहूं धजलों,' 'तो गाव-यास शिकता ना,' 'eu ousei escrever, êle não aprenderia cantar' अशीं करतात.

## खालील वाक्यांचें भाषांतर करा:—

Eu venderia a casa. Tu não devias fugir. Ele não prometerá unir? Nós sairíamos certamente. Vós não deveríeis ocultar o dinheiro. Eles conseguirão entrar? O país progrediria logo. Eu nunca prometi transferir. Eles não cairiam. Eu não despederia tão cedo o homem. Tu subirás a escada? Nós dormiríamos sossegadamente. Ele engulíria tudo. Os soldados não agrediriam. Vós produziríeis mais. Nós não preveniríamos. Nós repetiremos a lição. Ele promete não mentir. Eu prefiro aquele. Ele preferirá morrer.

मी उल्लंघितों ना. तूं फसवता ना. तें चकाकतें. आह्मीं कालच कमी करतों. ते उद्यां बाहेर पडणार नाहींत. त्या मोडून टाकल्या. तुह्मीं केंव्हां-ही दुखवतां ना. तो पाठिंबा देता. मी रमवीन. तो बोध करील. तूं खोटें बोलशील. तें उपयोगी पडणार नाहीं. आह्मीं नेसवूं. ते ह्याला विशेष चहा-तील. मीं मरणें आधीं—पसंत—करतों. मी इतका वाढतों ना. मी बोलण्या-स विसरतों ना. मीं बोलण्यास शिकलें पाहिजे होतें. तुह्मीं वचन द्यावयास नको होतें. तो कान पिळता. हाच माणूस राज्यकारभार चालवील. आ-ह्मीं उद्यां लपवूं. तुह्मीं पसरवाल. त्यानें खरें बोलावयास पाहिजे होतें व हिनें खोटें बोलावयास नको होतें. आह्मीं, ही चाल रद्द न करण्याची हमी देऊं. तो पळण्यास इच्छित होता.

2303

## पाठ ४८

### शब्दयोगी अव्ययें

१९३ जे शब्द, दोन वस्तु अगर एकाच वाक्याचे दोन भाग यांजमधील संबंध दाखवितात त्यांस शब्दयोगी अव्ययें ह्मणतात. 'मेज व दौत' यांमध्यें 'खालवर' संबंध आहे असें दाखवायाचें असतां, आपण 'वर' हा शब्द योजतों आणि 'दौत मेजावर' आहे असें ह्मणतों, ह्मणून 'वर' हें शब्दयोगी अव्यय होय. पुर्तुगिजींतील शब्दयोगी अव्ययें खालीं दिलीं आहेत. त्यांतील कांहींचें भाषांतर, मराठींत शब्दयोगी अव्ययांनीं न करतां, विभक्तिप्रत्ययांनीं करावें लागतें:—

| | | | |
|---|---|---|---|
| a | स, ला, कडे, पर्यंत, कडून | entre | आंत, मध्यें, पैकीं, |
| ante | आधीं, पूर्वी | para | स, ला, करतां |
| após | नंतर, पाठीमागून | perante | समोर, पुढें |
| até | पर्यंत | por | करतां, साठीं, कडून, माफत |
| com | ने, सह, शीं, बरोबर | segundo | प्रमाणें |
| contra | विरुद्ध, टेंकून | sem | शिवाय, वांचून |
| de | चा, ची, चें, चे, च्या, चीं, कडून, पासून, हून, पैकीं, ने | sob | खालीं |
| desde | पासून | sôbre | वर |
| em | आंत, मध्यें, वर | trás | मागें |

१९४ कांहीं विशेषणांचाही शब्दयोगी अव्ययांप्रमाणें उपयोग करण्यांत येतो. उदाहरणार्थ:—

| | | | |
|---|---|---|---|
| conforme | प्रमाणें | mediante | मधून |
| durante | (अमुक इतक्याकालाच्या) आंत | | |
| salvo | शिवाय } खेरिज करून, सोडून | | |
| excepto | वगळून } | | |

१९५ मराठींत शब्दयोगी अव्ययें नामांच्या नंतर व नामाला जोडून लिहितात. व त्याच्यामुळें नामाचें सामान्यरूप होतें. पण पुर्तुगिजांत

तों नामांच्या पूर्वीं घालतात व त्यांना न जोडतां लिहितात. ( विभक्ति नसल्यामुळें, पुर्तुगिजींत, ज्याप्रमाणें नामांचें सामान्य रूप होत नाहीं त्याच प्रमाणें त्यांचें शब्दयोगी अव्ययांमुळेंही, अर्थातच, होत नाहीं.) उ० पुस्तकाचा=de livro; चाकूनें=com canivete; त्याच्यावर=sôbre êle; दोघामध्यें=entre dois.

१९६ ज्या नामाच्या मागें शब्दयोगी अव्यय यावयाचें असतें त्या बरोबर एखादें विशेषण, विशेषणात्मक सर्वनाम अगर उपपद आलें तर शब्दयोगी अव्यय सर्व जातीच्या शब्दाच्या आधीं घालतात. उ० com prudentes homens= शहाण्या माणसाशीं; sôbre êste livro= यापुस्तकावर; desde a cabeça=डोक्यापासून; para o meu bom pai=माझ्या चांगल्या बापाकरतां.

१९७ शब्दयोगी अव्ययें फक्त नामें, सर्वनामें अगर त्यांच्याप्रमाणें योजलेल्या शब्दांच्याच मागें येऊं शकतात ह्मणून पुर्तुगिजींत त्याची व्याख्या पुढील प्रमाणें करतात:- जे शब्द नामें, सर्वनामें अगर तत्सम शब्दाच्या मागें आले असतां एकाच वाक्याच्या दोनभागांमधील संबंध दाखवतात त्यांस शब्दयोगी अव्ययें ह्मणतात.

वि. सू. ३१— पुर्तुगिजींत उपपदांप्रमाणें शब्दयोगी अव्ययांची योजनाही महत्वाची असल्यानें त्यांवरील पाठ विशेष लक्ष्यपूर्वक शिकावे.

१९८ 'पासून' याचें de व desde आणि 'पर्यंत' चें a व até अशा दोन शब्दांनीं भाषांतर करतां येतें. या ठिकाणीं हें लक्षात ठेवावें कीं, जेंव्हां 'पासून' चें भाषांतर de नें करण्यांत येतें तेंव्हां 'पर्यंत' चें a नें केलें पाहिजे व जेंव्हां पासूनचें desde नें केलें जातें तेंव्हां पर्यंतचें até नें केलें पाहिजे उ० de Pangim a Margão=पणजीपासून मडगांवपर्यंत, desde cinco até onze horas=पांचपासून अकरा तासापर्यंत.

## खालील वाक्यांचें भाषांतर करा:—

Após o rei falou a rainha. Eu cortei a manga com canivete. Falou conforme escreveu. Desde Bombaim até Carachi. D. João reinou durante vinte e nove anos. Deixei os livros sôbre a mêsa. Em cinco dias acabei tudo. Tu nunca sais sem livro. Dormiram todos, exepto eu. Entre a mêsa e os bancos. Chegarei até lá. Chorou perante o meu pai. Nunca deveis falar contra a consciência (= अंतःकरण). Falei segundo a minha opinião (=मत). Eles estudam de nove a dez. Compramos livros para a biblioteca. Não comi por isso. Por isso mesmo contrariaram. Tomei o medicamento (= औषध) mediante a água. Salvo uns quatro, ninguêm aprendeu. De novo apanhei só um. Os homens de grandes cabeças. Um caia sôbre outro.

एकाच दिवसांत सर्व पुस्तक शिकलों. मुलांनंतर मुली पोंचल्या. पुर्तुगालपासून फ्रान्सपर्यंत. पुर्तुगालचे राजे. तो नित्य कायद्या (= lei) विरुद्ध बोलत होता. मी पांचपासून आठपर्यंत काम केलें असतें. एकेचाळीसांपैकीं दोनसुद्धा पोंचले नाहींत. तूं फार शहाणपणा (= prudência) नें बोललास. आमच्या घरासमोर. तुम्हीं सांगितल्याप्रमाणें मीं लिहिलें. हे पुस्तक मी माझ्या वाचनमंदिराकरतां घेतलें. माझ्याशिवाय सर्व निजले. चार मोठ्या चुका सोडून. मी तें चहामधून प्यालों.

मी तें कष्टां (=maçada) शिवाय साध्य केलें. एक दुसऱ्यावर पडेल. माझी घोडी तुमच्या घोड्याप्रमाणें दिसते. देऊळ व मशिद यांच्यामध्यें. त्या दोघांही मुलांतून. याचसाठीं मी लिहित होतों. त्यानें फक्त एक वर्ष राज्य केलें. कंठमण्यापासून पायांच्या बोटांच्या नखांपर्यंत. मी माझ्या मित्राबरोबर बाहेर पडत होतों. एक रवर सोडून बाकी सर्व वस्तु. पृथ्वी आणि आकाश यांच्यामध्यें. राजा सहाव्या घोड्यासमोर थांबला. पुर्तुगेजीमधून मराठी कीं मराठीमधून पुर्तुगेज? या दोघांतून कोणी तरी एक. तुमच्या पैकीं कोणी तरी. हा खेरिज करून बाकी सर्व हुशार विद्यार्थी खेळत होते. मी पुस्तकावर दौत ठेवली. या चारशें वर्षांत.

## पाठ ४९ वा

## शब्दयोगी अव्ययें व उपपदें.

१५९ क) 'A' या शब्दयोगी अव्ययापुढें o व os हीं उपपदें आलीं असतां त्यांचा संयोग होऊन ao व aos अशीं रूपें होतात. ao mar Arábico, aos homens.

१ ख) 'A' या शब्दयोगी अव्ययापुढें a व as हीं उपपदें आलीं असतां त्यांचा संयोग होऊन á व ás अशीं रूपें होतात. उ० a a porta aberta= á porta aberta, a as mulheres= ás mulheres.

१ ग) त्याच प्रमाणें a या शब्दयोगी अव्ययापुढें aquele हें दर्शक सर्वनाम अगर त्याचीं रूपें आलीं असतां त्यांचाही संयोग होऊन àquele, àquela, àqueles, àquelas, अशीं रूपें होतात. उ० a aquele rapaz= àquele rapaz; a aquelas raparigas= àquelas raparigas.

१६० 'De' या शब्दयोगी अव्ययापुढें कोणतेंही नियामक अगर अनियामक उपपद, स्वरानें सुरु होणारें कोणतेंही सर्वनाम अगर क्रियाविशेषण (व कित्येक वेळीं कोणत्याही जातीच्या स्वराद्य शब्दाचें रूप) आलें असतां e चा लोप होऊन दोन्हीं शब्दांचा संयोग होतो. उ० de o livro = do livro, de uma rapariga = duma rapariga, de aquelas mulheres = daquelas mulheres, de outros homens = doutros homens, de ali = dali. de onde = donde, de amar = damar.

१६१ 'Em' या शब्दयोगी अव्ययापुढें कोणतेंही नियामक अगर अनियामक उपपद आणि स्वरानें सुरूहोणारें कोणतेंही सर्वनाम आलें असतां 'em' चें 'n' होऊन त्या दोन्हीं शब्दांचा संयोग होतो.
उ० Em o mar Arábico=no mar Arábico; Em um dia=num dia; em ela=nela; em êste=nêste; em outro=

noutro. (Em ह्यां पुढें अनियामक उपपद आलें असतां त्यांचा संयोग न करण्याचाही प्रघात आहे.)

१६२ 'Por' या शब्दयोगी अव्ययापुढें नियामक उपपद आलें असतां por चें pel होऊन उपपदाशीं संयोग होतो. उ० por o mar=pelo mar; por as raparigas=pelas raparigas.

---

| | | | |
|---|---|---|---|
| parente | नातेवाईक, सोयरा. Parentesco, relação | | नातें, संबंध, सोयरगत |
| afilhado | धर्मपुत्र | aio, tutor | पालक |
| bisavô | पणजा | áia | दाई |
| bisneto | पणतू | neto | नातू |
| concunhado | साडू | noivo | वर, नवरा |
| cunhado | मेहुणा | primo | चुलत-मावस-मामे आते-भाऊ |
| enteado | सावत्रभाऊ | sobrinho | भाचा, पुतण्या |
| esposo | पति | sogro | सासरा |
| | | tio | मामा, चुलता |
| filho | पुत्र | materno | मातेसंबंधींचा (मातेकडून) |
| filho bastardo | दासीपुत्र | paterno | पित्यासंबंधींचा (पित्याकडून) |
| irmão colaço | दत्तक बंधु | adoptivo | दत्तक |
| familia | कुटुंब | | |

वि. सू. ३२— वरील सर्व शब्दांचीं स्त्रीलिंगी व अनेक वचनी रूपें नियमाप्रमाणें तयार करतात. उ० मामा किंवा चुलता=tio; मामी किंवा चुलती=tia. नातू=neto; नात=neta. Tio म्हणजे मामा कीं चुलता हें निश्चितपणें समजत नाहीं. सबब तें नातें 'materno' व 'paterno' हे शब्द पुढें घालून निश्चित करावें लागतें. उ० चुलता=tio paterno; मामा=tio materno; sobrinho म्हणजे भाचा कीं पुतण्या हें निश्चितपणें कळत नाहीं, तें पुढीलप्रमाणें दाखवतात:— भाचा=sobrinho por-

irmã; पुतण्या=sobrinho por irmão. याप्रमाणें, primo, neto वगैरे शब्दांसंबंधीं समजावें.

टि. सू. ३३— नातें दाखवणाऱ्या पुल्लिंगी शब्दाचें अनेक वचन केलें असतां त्या शब्दांच्या स्त्रीलिंगी रूपाचाही त्यांत अंतर्भाव होऊं शकतो उ० pais=आईबाप irmãos=बहिणभाऊ, भावंडें; esposos=नवराबायको; noivos=वधुवरें; filhos=मुलगे

A' minha irmã. Neste ano. Pelo teu irmão. O Livro da minha tia materna. Num dia. No tinteiro Pelas primas. Ás minhas netas. Na noite. Ao teu concunhado. Naquele dia. Pelos filhos. Aos pais. Em um país. Dêste rapaz e dos outros dois. Dali até Margão. Na França. Em Portugal e nos outros paises da Europa. Nesta gaveta e noutra. Ao marido pela mulhér, ao sogro pela sogra. A' nossa enteada e a vossa irmã colaça. Todos os negociantes desta cidade vendem papéis, tinteiros e livros.

माझ्या मेहुण्याकडून. तुमच्या दत्तक बंधूला. तुमच्या भाचींत. या तीन गुरवांत. डॉक्टर सदाशिवरावांचे दोन्ही मुलगे. उभय बंधूंशीं. शूर नेपोलियनाकडून हिंदुस्थानांत व चिनांत. पुर्तुगालांत, फ्रान्साकडून. लिस्बनपासून पोर्टोपर्यंत. आरबी समुद्रांत. टेबलावर आणि अंथरूणाखालीं. ग्रीसचे सातही विद्वान्. दक्षिणेस व उत्तरेस. पासिफिक महासागराच्या पूर्वेस.

---

## पाठ ५० वा.

## शब्दयोगी अव्ययें व पुरुषवाचक सर्वनामें

१६३ Com या शब्दयोगी अव्ययापुढें eu, tu, nós, vós व 'आपण स्वतः' या अर्थी असणारीं êle, ela, êles, elas हीं पुरुषवाचक सर्वनामें आलीं असतां त्यांचीं रूपें अनुक्रमें migo, tigo, nosco vosco व sigo अशीं होऊन नंतर त्यांचा संयोग होतो. उ०

com+eu=com+migo=comigo=माझ्यापाशीं, मजबरोबर
com+tu=com+tigo=contigo=तुझ्यापाशीं, तुजबरोबर
com+nós=com+nosco=conosco=आमच्यापाशीं, आम्हांबरोबर
com+vós=com+vosco=convosco=तुमच्यापाशीं, तुम्हांबरोबर
com+êle किंवा ela वा êles वा elas=com+sigo=consigo=आपल्यापाशीं.

वि. सू. १४— migo व nosco हीं रूपें जोडतांना m चा लोप होतो; इतर रूपें जोडतांना m च्या जागीं n येतो.

## शब्दयोगी अव्ययें व क्रियाविशेषणें

११४ शब्दयोगी अव्ययें व क्रियाविशेषणें यांमधील फरक नीट लक्षांत घेतला पाहिजे. पहिलीं, दोन वस्तूंमधील संबंध दाखवतात, तर दुसरीं एखाद्या क्रियापदाचा, विशेषणाचा अगर दुसऱ्या क्रियाविशेषणाचा गुण दाखवतात. ज्या दोन अगर अधिक शब्दांपासून एखाद्या अव्ययाचा अर्थ उत्पन्न होतो त्यास पुर्तुगिजींत locução अशी संज्ञा आहे. Locução चा, अर्थ क्रियाविशेषणासारखा झाला तर loc. adverbial व शब्दयोगी अव्ययासारखा झाला तर loc. prepositiva असें म्हणतात. पुर्तुगिजींत, कांहीं क्रियाविशेषणें व कांहीं locuções adverbiais अशीं आहेत कीं, त्यांच्यापुढें de हें अव्यय घातलें असतां तीं locuções prepositivas होतात. उ० antes या क्रियाविशेषणापासून antes de हें locução prepositiva तयार होतें. Em frente या locução adverbial पासून em frente de हें loc. prepositiva तयार होतें. आतां मराठींत antes व antes de किंवा em frente व em frente de या दोहोंचाही अर्थ अनुक्रमें 'आधीं व समोर' असे होतात हें खरें. पण व्याकरण दृष्ट्या antes चा 'आधीं' व antes de चा 'आधीं' या दोहोंत फरक असतोच. उ० 'तूं आधीं बोललास' या वाक्यांत 'आधीं' हें क्रियाविशेषण आहे व 'तूं रामाच्या आधीं बोललास' यांतील 'आधीं'

शब्दयोगी अव्यय आहे. पुर्तुगिजींत वरील वाक्यांचीं भाषांतरें, अनुक्रमें, tu falaste antes, tu falaste antes de Rama अशीं करावीं लागतील.

## कांहीं Locuções adverbais:—

| | | | |
|---|---|---|---|
| em brve | इतक्यांत, थोडक्यांत | de pressa | जलद, लगेच |
| em vão | उगीच, कारणाशिवाय | de vagar | सावकाश, हळूच |
| ás escuras | गुप्तपणें, कोणास कळूं न देतां | ao acaso | कदाचित्. प्रसंगोपात |
| ás direitas | नीट, योग्य रीतीनें | ás claras | उघडपणें |

## Adverbios व त्यांपासून होणारीं Locuções prepositivas

dentro–dentro de = आंत; fóra–fóra de = बाहेर; em cima–em cima de = वर; longe–longe de = दूर, ao redór–ao redór de, = सभोंवार, भोंवतीं; em volta– em volta de = भोंवतीं, सभोंवार; a fim de = करतां, साठीं इ० इ०

## खालील वाक्यांचें भाषांतर करा:–

Crisna chegará em breve. Eu entrei antes dêle. Ele jantaria antes de Rama. João falou ás escuras. Eles jogavam ás direitas. A farmácia fica muito longe. O hospital fica perto de igreja. हरी इतक्यांत गाईल. तुह्मी आधीं जेवलां. मी नंतर बोलेन. कृष्णानंतर हरी खेळेल. तो उशिरां उठतो. आह्मी उगीच शिकलों. गाडी सावकाश चालते. रामा वर खेळतो. रामा माडीवर खेळतो. माझ्याशीं कीं स्वतःशीं?

## पाठ २१ वा

## अनियमित क्रियापदें

## कर्तरिप्रयोग–स्वार्थ–साधकाळ

### प्रथम गण

१६९ प्रथम गणांत खालीं दिलेलीं फक्त दोन सिद्ध क्रियापदें व त्यांचे खालीं दिलेले (स्वार्थीचे) काळ अनियमित आहेत. इतर काळांचीं रूपें नियमांप्रमाणें तयार करावीं.

*Dar* देणें — Estar असणें, होणें, रहाणें

#### वर्तमान काळ

| | | | |
|---|---|---|---|
| मी देतों | eu dou | मी असतों | eu estou |
| तूं देतोस | tu dás | तूं असतोस | tu estás |
| तो देतो | êle dá | तो असतो | êle está |
| आह्मी देतों | nós damos | आह्मी असतों | nós estamos |
| तुह्मी देतां | vós dais | तुह्मी असतां | vós estais |
| ते देतात | êles dão | ते असतात | êles estão |

#### पूर्ण भूतकाळ

| | | | |
|---|---|---|---|
| मीं दिला-ली-लें-ले त्या-लीं | eu dei | मी असलों | eu estive |
| तूं दिला-ली इ० | tu déste | तूं असलास | tu estiveste |
| त्यानें दिला-ली इ० | êle deu | तो असला | êle esteve |
| आह्मीं दिला-ली इ० | nós démos | आह्मी असलों | nós estivemos |
| तुह्मीं दिला-ली इ० | vós déstes | तुह्मी असलां | vós estivestes |
| त्यांनीं दिला-ली इ० | êles déram | ते असले | êles estiveram |

वि. सू. ३९— Dar प्रमाणें desdar (=दिलेलें परत घेणें किंवा गांठ सोडणें) आणि estar प्रमाणें sobreestar किंवा sóbrestar (=थांबणें, बंद करणें) हीं साधित क्रियापदें चालतात. (क. ११४ व वि. सू. २० ही फिरून एकदां पहा.)

**वि. सू. ३६**— Estar या क्रियापदाच्या रूपांबरोबर एखादें विशेषण किंवा विशेषणाप्रमाणें योजलेला अगर योजलेलें शब्द आले असतां त्याचा (म्हणजे estar चा) अर्थ 'असणें, बनणें, होणें' असा होतो. उ० Eu estou feliz=मी सुखी आहें. Como estas?=कसा आहेस? O rapaz estava demente=तो मुलगा बुद्धिभ्रष्ट बनला होता. Nós estaremos velhos=आम्ही म्हातारे होऊं. Eu estou já inútil=मी निरुपयोगी झालों आहे.

ब) Estar च्या रूपांबरोबर एखादें स्थलवाचक क्रियाविशेषण अगर मागें शब्दयोगी अव्यय असलेलें स्थलवाचक नाम आलें असतां त्याचा (म्हणजे estar चा) अर्थ 'असणें, वास्तव्य असणें, राहणें' असा होतो. उ० Onde está o teu filho? तुझा मुलगा कोठें आहे? (म्हणजे कोठें राहतो?) Ele não está aqui, está em Margão= तो येथें नाहीं, मडगावांत आहे (=राहतो.) Eu amanhã estarei contigo= मी उद्यां तुमच्याशीं असेन (=तुमच्या येथें राहीन).

क) Estar च्या रूपांपुढें para हें शब्दयोगी अव्यय व या अव्यया पुढें एखादें क्रियापद धात्वर्थी आलें तर त्याचा अर्थ 'तयार असणें, टेंकणें, पोंचणें' असा होतो. उ० Eu não estou para comprar= मी विकत घेण्याला तयार नाहीं. O rei estava para sair= राजा बाहेर पडण्याच्या तयारींत होता. (किंवा बाहेर पडण्याला तयार होता.) त्याच प्रमाणें Nós não estamos para isso= आम्ही याला तयार नाहीं. Ela estava para morrer= ती मरावयाला टेंकली होती.

Tu estavas em Margão. Ele está um verdadeiro ladrão. Nós estaremos amanhã em Pangim. Os soldados estiveram no Pôrto. Eu estarei lá. Dou fins livros, levas não? Sim, senhor, levo. Ele dará a sua pena. Em Portugal não está. Quando estareis na França? O canivete meu está contigo? Ontem estava comigo Ele está para sair. Tu desdarás. Eu estou pobre. Eu sobrestive. Ele daria tudo mas está pobre. Ali estão alguns rapazes. Déste o meu

livro? Eu dava o livro mas não estava em casa, estava com o Rama. Os amigos darão dinheiro? Devem dar. Eu hontem devia estar em vossa casa, mas o amigo estava fóra. Ele esteve hontem conosco. Desdais ou sobreestais? Como estais? Está bom.

मी देत होतों पण शाई देत नाहीं. देत नाहींस? त्यानें पैसे दिले नाहींत. हा देईल? ती देती पण ती आज घरीं नाहीं. तो घरीं केव्हां असेल? तो साताऱ्यास झाला आहे. तो फ्रान्सांतच असतो. कांहीं मुलगे बकरे बनले आहेत. हे दोघे गोंव्यांत असतात. ती गांठ सोडवता पण हा बंद करतो. ते कोठें राहातात, गोंव्यांत कीं इंग्रजी हिंदुस्थानांत? आम्हीं तेथेंच असूं. तुम्ही कोठें होतां? तो फार दुःखी झाला आहे. त्या गरीब झाल्या आहेत. ही दुःखी झाली आहे व तो सुखी झाला नाहीं. आम्ही केव्हां शहाणे झालेले असूं? तुम्ही हुशार झालेच आहांत, आतां, लगेच शहाणे व्हाल. तुम्हीं पैसे द्याल? ती पुस्तकही देती. आम्हीं देऊं पण तुम्हीं कसे द्याल? त्यानें दिलेलें परत घेतलें. तो चालण्यास तयार आहे आणि ही धांवण्यास तयार नाहीं. तुम्ही कसे आहां? आम्ही चांगले आहोंत.

---

## पाठ ५२ वा.

## द्वितिय गण

११६ द्वितिय गणांत १९ सिद्ध क्रियापदें अनियमित आहेत. त्यांचे स्वार्थाचे पुढें दिलेले काळ अनियमित आहेत. स्वार्थाच्या इतर काळांचीं रूपें नियमाप्रमाणें तयार होतात.

ser असणें, होणें

| वर्तमान काळ | | अपूर्ण भूत काळ | |
|---|---|---|---|
| मी आहें | eu sou | मी होतों | eu era |
| तूं आहेस | tu és | तूं होतास | tu eras |

| | | | |
|---|---|---|---|
| तो, ती आहे | êle é | तो होता | êle era |
| आह्मी आहों | nós somos | आह्मी होतों | nós éramos |
| तुह्मी आहां | vós sois | तुह्मी होतां | vós éreis |
| ते आहेत | êles são | ते होते | êles eram |

**पूर्ण भूतकाळ** — **अपूर्ण भविष्य काळ**

| | | | |
|---|---|---|---|
| मी झालों किंवा होऊन गेलों | eu fui | मी होईन | eu serei |
| तूं झालास | tu foste | तूं होशील | tu serás |
| तो झाला | êle foi | तो होईल | êle será इ० (नियमाप्रमाणे) |
| आह्मी झालों | nós fomos | **भविष्य भूतकाळ** | |
| तुह्मी झालां | vós fostes | मी झालों असतों | eu seria |
| ते झाले | êles foram | आह्मी झालों असतों | nós seriamos इ. (नि. प्र.) |

**वि. सू. ३७**— estar या क्रियापदाचा केव्हां 'होणें, असणें' आणि केव्हां 'राहाणें, वास्तव्य असणें' असे अर्थ होतात, हें मागें सांगितलेंच आहे. Ser या क्रियापदाचा अर्थही 'होणें, असणें' असा होत असल्यानें या दोघांमधील फरक समजून घेतला पाहिजे. हा फरक नियमापेक्षां उदाहरणांनींच विशेष स्पष्ट होणारा असल्यामुळें खालीं दिलीं आहेत तीं लक्षपूर्वक पहावीं:—

| | |
|---|---|
| Eu estou feliz | मी सुखी झालों आहें. |
| Eu sou feliz | मी सुखी आहें |
| Como está êla? | ती (आरोग्यानें) कशी आहे? |
| Como é êla? | ती (स्वभावानें) कशी आहे? |
| Tu estavas maluco | तूं वेडा झाला होतास |
| Tu eras maluco | तूं वेडा होतास |
| Ele esteve dormido | तो निजलेला राहिला |
| Ele foi médico | तो डॉक्टर होऊन गेला |
| Nós estaremos felizes | आह्मी सुखी झालेले असूं |
| Nós seremos felizes | आह्मी सुखी होऊं |
| Vós estaríeis dormidos | तुह्मी निजलेले राहिलां असतां |

| | |
|---|---|
| Vós serieis felizes | तुह्मी सुखी झाले असतां |
| Eles estão surdos | ते बहिरे बनले आहेत |
| Eles são surdos | ते बहिरे आहेत. |

**वि. सू. ३८**— Ser क्रियापदाच्या रूपांबरोबर कित्येक विशेषणें आलीं असतां त्यांचें भाषांतर विशिष्ट प्रकारें करावें लागतें. उ० O homem é falível=मनुष्य चुकीस पात्र असतो. O homem é mortal=मनुष्य मरणाधीन किंवा मर्त्य आहे. E' याचा अर्थ 'असतो, होय' व são याचा अर्थ 'असतात' असा होऊं शकतो. उ० O ladrão é geralmente astuto= चोर बहुधा धूर्त असतो. O mentir é uma doença= खोटें बोलणें हा एक रोग होय. As mulheres são quási sempre fracas= बायका बहुतकरून अशक्त असतात.

Defeito व्यंग

| | | | |
|---|---|---|---|
| calvo | बोडका, केश नसलेला | gémeos | जुळे |
| canhoto | डावखुरा | impotente | नपुंसक |
| corcovado | कुबडा, पोंक्या | miopo | गजदृष्टी, ऱ्हस्वदृष्टी |
| cego | आंधळा | mudo | मुका |
| coxo | लंगडा | surdo | बहिरा |
| gago | तोतरा, बोबडा | vesgo | तिरसट नजरेचा |

## खालील वाक्यांचें भाषांतर कराः-

Eu sou um estudante. Tu estás calvo. Ele é canhoto. A rapariga é cega. O rapaz está cego. Ele era muito diligente. Nós eramos obedientes. O rei estava impaciente. Elas são gémeas. Vós não sois desgraçados. Sois negligentes. A rainha estava socegada (=शांत) Vós fostes ingratos. O pai é avarento mas a filha é pródiga. Quando o professor entrou na aula os alunos estiveram com medo (भीती). Ele será hipócrita ? Não, êle é um verdadeiro santo. Eu seria tolo. Eu estaria em sua casa. Vós sois mali-

ciosos. Nós fomos humildes. Serás feliz. Os homens são animais. Alguns cavalos eram muito fortes. O Crisna é realmente um bom rapaz. Os bons rapazes nunca são precipitados. E' mau comer muito. Estais bons? Sim, não estamos mal. Ela é inteligente.

तो बहिरा झाला आहे. हे सर्व मुके आहेत. हा मुलगा तिरसट होईल. मी न्हस्वदृष्टी बनलों आहें. तुम्ही फार कृपण व्हाल. ती फार मित्री होती. ते कृतघ्न बनले आहेत. साधू नम्र असतात. ढोंगी भयंकर असतात. खोटें बोलणें हें पाप (=pecado) होय. हीं सर्व मुलें कृतघ्न होतील. ते नम्र झाले असते. तुम्ही मूर्ख झालां. तो लंगडा झाला आहे. मी काल पर्जीत होतों. जेव्हां विद्यार्थि शिकतात तेव्हां शिक्षक खुष होतो. ती एक मोठी धाडशी राणी होऊन गेली. तो श्रीमंत मनुष्य गर्विष्ठ आहे. खऱ्या मोठ्या आहेत. कांही विद्यार्थी गरिब असतात, पण हुशार आणि बुद्धिमान् असतात. तो खोखरीचा चोर आहे. ही खरोखर फार सुंदर आहे. तुम्ही फार सशक्त झालां असतां. त्या धीट आणि शहाण्या होतील. तूं आतां वक्ता झालास. ही थोड्क्यात कवयित्री झालेली असेल. तुम्ही कोठें असाल? मनुष्यें मरणाधीन आहेत.

---

## पाठ ५३ वा

११५ २. Ter=····जवळ असणें,·····ला असणें.

| वर्तमानकाळ | | अपूर्ण वर्तमानकाळ | |
|---|---|---|---|
| मजजवळ किंवा मला आहे–त | eu tenho | मजजवळ होता-ती-ते इ० | eu tinha |
| तुला आहे | tu teus | तुजजवळ होता | tu tinhas |
| तिला-त्याला आहे | êle-ela tem | त्याजजवळ होता | êle tinha |
| आम्हांला आहे | nós temos | आम्हांजवळ होता | nós tinhamos |
| तुम्हांला आहे | vós tendes | तुम्हांजवळ होता | vós tinheis |
| त्यांना आहे | êles têm. | त्यांजजवळ होता | êles tinham |

## पूर्ण भूतकाळ

| | |
|---|---|
| मजजवळ असला-ली इ. किंवा मला मिळाला-ली इ. | eu tive |
| तुला मिळाला | tu tiveste |
| त्याला मिळाला | êle teve |
| आम्हांला मिळाला | nós tivemos |
| तुम्हांला मिळाला | vós tivestes |
| त्यांना मिळाला | êles tiveram |

## अपूर्ण भविष्यकाळ

| | |
|---|---|
| मजजवळ असेल, मला मिळेल | eu terei |
| तुजजवळ असेल, तुला मिळेल | tu terás इ. |

नियमाप्रमाणें

## भविष्यभूतकाळ

| | |
|---|---|
| माझ्याकडे असला असता | eu teria |
| तुझ्याकडे असला असता | tu terias (इ. नि. प्र.) |

**वि. सू. ३९**— Ter प्रमाणें खालील क्रियापदें चालतात.

| | | | |
|---|---|---|---|
| abster | वर्जणें, वांचून रहाणें | manter | सांभाळणें, पोसणें, ठेवून घेणें |
| conter | सांठवणें, मावून घेणें | obter | मिळणें, घेणें |
| deter | थांबवणें, अडविणें | reter | रहाणें, मिळवणें. |
| entreter | रमविणें, चाकरीस ठेवणें | suster | धरणें, आधार देणें, सिद्ध करणें |

**वि. सू. ४०**— Ter हें क्रियापद वाक्यांत मुख्य असलें तर त्याचा अर्थ, 'धनीपणा वाळगणें, जवळ असणें' असा होतो, आणि सहाय्यक असलें तर नुसता 'असणें' असा होतो. त्याचें भाषांतर करण्याचे प्रकार पुढीलप्रमाणें आहेत:—

**अ.**) Eu tenho um livro=मजजवळ एक पुस्तक आहे. Tu tinhas algumas penas=तुजकडे कांहीं पेनें होतीं.

ciosos. Nós fomos humildes. Serás feliz. Os homens são animais. Alguns cavalos eram muito fortes. O Crisna é realmente um bom rapaz. Os bons rapazes nunca são precipitados. E' mau comer muito. Estais bons? Sim, não estamos mal. Ela é inteligente.

तो बहिरा झाला आहे. हे सर्व मुके आहेत. हा मुलगा तिरसट होईल. मी न्हस्वदृष्टी बनलों आहें. तुह्मी फार कृपण व्हाल. ती फार सिद्धी होती. ते कृतघ्न बनले आहेत. साधू नम्र असतात. रोगी भयंकर असतात. खोटें बोलणें हें पाप (=pecado) होय. हीं सर्व मुलें कृतघ्न होतील. ते नम्र झाले असते. तुह्मी मूर्ख झाला. तो लंगडा झाला आहे. मी काल पराजीत होतों. जेव्हां विद्यार्थि शिकतात तेव्हां शिक्षक खुष होतो. ती एक मोठी धाडशी राणी होऊन गेली. तो श्रीमंत मनुष्य गर्विष्ठ आहे. खऱ्या मोठ्या आहेत. कांहीं विद्यार्थी गरिब असतात, पण हुशार आणि बुद्धिमान् असतात. तो खराखरीचा चोर आहे. ही खरोखर फार सुंदर आहे. तुह्मी फार सशक्त झालां असतां. त्या धीट आणि शहाण्या होतील. तूं आतां वक्ता झालास. ही थोडक्यात कवयित्री झालेली असेल. तुह्मी कोठें असाल? मनुष्यें मरणाधीन आहेत.

---

## पाठ ५३ वा

११७ २. Ter=····जवळ असणें,····ला असणें.

| वर्तमानकाळ | | अपूर्ण वर्तमानकाळ | |
|---|---|---|---|
| मजजवळ किंवा मला आहे–त | eu tenho | मजजवळ होता-ती-ते इ० | eu tinha |
| तुला आहे | tu teus | तुजजवळ होता | tu tinhas |
| तिला-त्याला आहे | êle-ela tem | त्याजजवळ होता | êle tinha |
| आह्मांला आहे | nós temos | आह्मांजवळ होता | nós tinhamos |
| तुह्मांला आहे | vós tendes | तुह्मांजवळ होता | vós tinheis |
| त्यांना आहे | êles têm | त्यांजजवळ होता | êles tinham |

## पूर्ण भूतकाळ

| | |
|---|---|
| मजजवळ असला-ली इ. किंवा मला मिळाला-ली इ. | eu tive |
| तुला मिळाला | tu tiveste |
| त्याला मिळाला | êle teve |
| आम्हांला मिळाला | nós tivemos |
| तुम्हांला मिळाला | vós tivestes |
| त्यांना मिळाला | êles tiveram |

## अपूर्ण भविष्यकाळ

| | |
|---|---|
| मजजवळ असेल, मला मिळेल | eu terei |
| तुजजवळ असेल, तुला मिळेल | tu terás इ. |

नियमाप्रमाणें

## भविष्यभूतकाळ

| | |
|---|---|
| माझ्याकडे असला असता | eu teria |
| तुझ्याकडे असला असता | tu terias (इ. नि. प्र.) |

**वि. सू. ३९**— Ter प्रमाणें खालील क्रियापदें चालतात.

| | | | |
|---|---|---|---|
| abster | वर्जणें, वांचून रहाणें | manter | सांभाळणें, पोसणें, ठेवून घेणें |
| conter | सांठवणें, मावून घेणें | obter | मिळणें, घेणें |
| deter | थांबवणें, अडविणें | reter | रहाणें, मिळवणें. |
| entreter | रमविणें, चाकरीस ठेवणें | suster | धरणें, आधार देणें, सिद्ध करणें |

**वि. सू. ४०**— Ter हें क्रियापद वाक्यांत मुख्य असलें तर त्याचा अर्थ, 'धनीपणा बाळगणें, जवळ असणें' असा होतो, आणि सहाय्यक असलें तर नुसता 'असणें' असा होतो. त्याचें भाषांतर करण्याचे प्रकार पुढीलप्रमाणें आहेत:—

**अ.**) Eu tenho um livro=मजजवळ एक पुस्तक आहे. Tu tinhas algumas penas=तुजकडे कांहीं पेनें होतीं.

आ.) Tem व têm या रूपांवरून, नेहमीं जवळ असणाऱ्या वस्तूचा बोध होत असला तर त्यांचें भाषांतर 'असतो व असतात' या शब्दांनीं करावें लागतें उ० O homem tem o dom de falar.=मनुष्याला बोलण्याची देणगी (=शक्ति) असते. As aves têm azas=पक्ष्यांना पंख असतात. Nem todos os rapazes têm livros=सर्वच विद्यार्थ्यांजवळ पुस्तकें नसतात.

इ) कधीं कधीं, पोर्तुगिजींतील कर्ता मराठींत षष्ठ्यंत करावा लागतो. उ० Eu tenho quatro criados=माझे चार चाकर आहेत. Ele tem orelhas compridas=त्याचे कान लांब आहेत.

ई) कांहीं ठिकाणीं पोर्तुगिजींतील कर्ता, मराठींत चतुर्थ्यंत करून (ह्मणजे त्याला 'ला, ना' वगैरे प्रत्यय लावून) पुढें 'असणें' या क्रियापदाचीं रूपें घालावीं लागतात. उ० Rama tinha quatro filhas=रामाला चार मुली होत्या. Eu tenho duas mãos=मला दोन हात आहेत. Vós amanhã tereis leite=तुह्मांला उद्यां दूध मिळेल. Nós teriamos o livro=आह्मांला तें पुस्तक मिळालें असतें.

## Partes de casa. घराचे भाग

| | | | |
|---|---|---|---|
| alicerce | पाया | parede | भिंत |
| átrio, páteo | आंगण | pavimento | आंगण |
| baluarte, muro | तट, किल्ल्याची भिंत. | portal, portão | दरवाजा |
| canto | कोंपरा | quarto | खोली |
| casa de jantar | भोजनगृह | sala | दिवाणखाना |
| cosinha | सैंपाकघर | sobrado | माडी |
| degrau | पायरी, सोपान | tecto, telhado | छप्पर |
| dispensa | सामान ठेवण्याची खोली, कोठी | urinário | मुत्री, मूत सांडण्याची जागा |
| dormitório | शयनगृह | varanda | वरांडा, ओटी, पडवी |
| galeria | सज्जा, गच्ची | aguieiro | वासा |
| goteira | पागोळी | espigão | पाटी |

| | | | |
|---|---|---|---|
| grade | कठडा | prego | खिळा, चुक |
| latrina | शौचकुप | ripa | कांब |
| lavatório | स्नानगृह | telha | नळा |

Eu tenho um relógio. Tu tens muitos amigos. O velho tem uma filha. Os burros têm orelhas compridas. A mesa tem quatro pés. O rio tem margens. As casas do Japão são pequenas mas lindas. Ele tem filhos muito inteligentes. O rapaz tem mãos sujas. Tu terás o prémio. Nós tinhamos alguns aguieiros. A nossa casa tem dois lavatórios, duas latrinas, doze quartos de dormir e duas vastas salas. O sobrado do palácio é muito estreito. O templo tinha um portal. Ela teria muitos amigos. A loja tinha duas dispensas. Ontem eu tive muitos hóspedes. O tinteiro contem tinta. Tu detiveste o carro? Amanhã teremos o vinho pôrto. Ela entretinha os homens. Os hospitais mantem sempre enfermeiros e parteiras. ( सुइणी ). Eu retive o meu dinheiro. Nem todas as casas têm sobrados.

---

## पाठ ९४ वा

११८ Ter या क्रियापदाच्या रूपांबरोबर कांहीं विशिष्ट—विशेषतः शारिरिक गरजा, व्यंगें, आजार इत्यादि दाखवणारे—शब्द आले असतां त्यांचें भाषांतर विशिष्ट प्रकारें करावें लागतें. उ० eu tenho fome=मला भूक लागली आहे. Ela tinha mêdo=तिला भीती वाटत होती. ela teria cegueira=तिला अंधत्व आलें असतें. O Ramá tem febre=रामाला ताप आला आहे.

वि. सू ४१— "एखाद्याला काय होतें, ह्मणजे त्याला कोणता आजार जडला आहे" असें विचारावयाचें असतां, त्याचप्रमाणें एखाद्याचें वय विचारावयाचें असतां ter क्रियापदाच्या रूपांचाच उपयोग करतात. उ० Que tem êle ?= त्याला काय होतें ? Que idade tem ela ?= तिचें वय काय आहे ?

---

| | |
|---|---|
| ter calor | एखाद्याला उष्मा होणें |
| ter calvicie | एखाद्याला टक्कल पडणें |
| ter dôres | एखाद्याला वेदना होणें |
| ter fome | एखाद्याला भूक लागणें |
| ter frio | एखाद्याला थंडी वाजणें |
| ter gagueira | एखाद्याला तोतरेपणा असणें |
| ter mêdo | एखाद्याला भीति वाटणें |
| ter mudêz | एखाद्याला मुकेपणा असणें |
| ter cegueira | एखाद्याला अंधत्व येणें |
| ter dó | एखाद्याला दया येणें |
| ter nojo | एखाद्याला वीट येणें |
| ter náuseas | एखाद्याला किळस किंवा शिसारी येणें |
| ter pena | एखाद्याला कींव येणें |
| ter surdês | एखाद्याला बहिरेपणा असणें |
| ter sono | एखाद्याला झोंप येणें |
| ter sêde | एखाद्याला तहान लागणें |

---

Eu tenho dôres de dentes. Tu tens dôres de cabeça. Ela tem dôres de parto ( प्रसूती ). Nos não tivemos mêdo, tivemos pena. Os ouvintes ( श्रोते ) tinham sono O orador tinha gagueira. O doente tinha frio. Tendes sêde, nem sêde nem fome, nós estamos cançados. Eles tinham náuseas. Ele tinha quatro filhas e cinco filhos, o primeiro filho tinha vinte e cinco anos. Eu tenho nôjo.

---

मजजवळ कांहीं पेन्सिली आहेत. त्याचे डोळे लहान आहेत. तिला भूक लागली होती. तुजपाशीं एक चाकू आहे. कांहीं फुलांनां तांबडा रंग असतो. त्याची एक म्हैस आहे. हत्तीला रुंद कान असतात. राजवाड्यां- नां फरसबंदी व सज्जे असतात. सर्वच घरांनां माड्या नसतात. त्याला कींव आली नाहीं पण वीट आला. हिचें नाक मोठें आहे. त्याला दोन

हुशार ग्रंथ आहेत. आमच्या जुन्या घराला माडी होती. या झाडांना पानें येतील काय? तुजजवळ एक छत्री होती ना? माझे मित्र पुष्कळ आहेत. खुर्चीला बाहू असतात. तुला उद्यां पैसे मिळतील. रामा हुशार होईल. कृष्णा चांगला झाला असता. तूं काल माडी झाडिली? होय ती आपल्या पाहुण्यांना रंजवील. हरीची बहीण नम्र आहे मला भूक लागेल. तुम्हांला भीती वाटेल आम्हाला सर्व दिवस मिळाले असते. साधू नम्र असतात. तूं साध्वी झाली आहेस. ती कवयित्री बनली आहे. त्याचा भाऊ फार गर्विष्ठ आहे. सर्वच माणसें चांगलीं नसतात. कांहीं वाईट असतात. हरीपाशीं केव्हांही पैसा नसतो. मला तिची कींव आली. माझे मित्र अनेक आहेत. दौतींत शाई असते. बैलांना शिंगें असतात. पुस्तकांना पानें असतात.

---

## पाठ ५५ वा

### आजार Doenças

| | | | |
|---|---|---|---|
| abscesso | पू भरलेलें क्षत, फोड | empigem | दद्रु, नायटा |
| acesso | झटका | empola | पुळी |
| animia | रक्ताच्या कमीपणामुळें आलली अशक्तता | epidemia | सांथ, रोग |
| apoplexia | बेशुद्धि | febre | ज्वर, ताप |
| asma | दमा | fogões | कांज्या |
| bexigas | देवी | gangrena | सडणारी जखम |
| borbulha | फुटकुळी | gota | संधिवायु, वातरोग |
| cãibra | वळ, पेटका | hidropisia | उदररोग |
| cancer | पुळी, चाळणपुळी | indigestão | अजीर्ण, निर्मोळी |
| catarro | पडसें, सैत्य | lepra | महारोग, रक्तपिती |
| chaga | व्रण, क्षत | paralisia | अर्धांग वायु |
| cicatriz | डाग, चट्टा, माव | peste | महामारी, संधिपातज्वर |
| contágio | संसर्ग, वसा | pneumonia | न्यूमोनिया |
| convulsão | मोडणें, फेंपरें. | pustula | पुळी, फोड |
| constipação | सर्दी, थंडी | reumatismo | संधिवात |

| | | | |
|---|---|---|---|
| cólicas | पोटशूळ | sarna | खरूज |
| crosta | खपली | sarampo | गोंवर, गोंवें |
| despepsia | अजीर्ण | tósse | कफ, खोंकला |
| desmaio | मूर्च्छा, झांट | tísica | क्षय |
| diabete | मधुमेह | tumor | गळूं |
| diarréa | अतिसार, हगवण | vómitos | ओकारी |
| disenteria | आमांश, आमरक्त | vertigem | भोंवळ, घेरी |
| disuria | वेदना होऊन होणारें मुत्र | | |

**वि. सू. ४२**— Ter क्रियापदाच्या रूपाबरोबर आजारदर्शक शब्द आला असता त्याचें भाषांतर, येणें, होणें, जडणें अशा अर्थाच्या क्रियापदांच्या रूपानीं करावें लागतें हें लक्ष्यांत ठेवून वर दिलेल्या शब्दांमागें ter घालून भाषांतर करा. उ० ter sarampo=एखाद्याला गोंवर येणें; ter tumor=एखाद्याला गळूं होणें; ter cólicas=एखाद्याला पोटशूळ जडणें. इ०

O meu marido tem vertigem. Grandes homens têm geralmente diabete. A ferida não tem ainda crosta. Esta ferida não deixará cicatriz. A anímia é uma doença geral. A peste é uma doença contagiosa. ( सांसर्गिक ) Os homens sujos têm sempre sarna e empigem. Nem todos os bêbados tem hidropisia. Ela tinha uma gangrena. Eu tinha febre com frio. Os glutões têm sempre indigestão, Tens constipação? não, tenho só frio. A mulher tinha um tumor. Todos os doentes tiveram vómitos.

मला ताप येतो. तिला एक गळूं आलें आहे. रामाला काल झटका आला. मला पोटशुळाची व्यथा जडली आहे. त्याला क्षय झाला आहे. हरीला खोंकला येतो. तिला देवी आल्या आहेत. तुह्मांला वसा येईल. लहान मुलांना पडसें असतेंच. कृष्णाला अतिसार झाला आहे. तुला अजिर्ण होईल. त्याला चाळणपुळी झाली होती. तुह्मांला ओकारी येईल. माझ्या बहिणीला संधिवात झाला होता. आमांशाचा विकार भयंकर असतो. त्याला काय होत होतें? देवी कीं कांज्या आल्या होत्या? नुसती गोंवर आली होती. मला काल घेरी आली. पण आज बरा आहें.

---

## पाठ ५६ वा.

११९ Ter या क्रियापदाच्या रूपांपुढें de हें शब्दयोगी अव्यय व या अव्ययापुढें, धात्वर्थांत असणारें एखादें क्रियापद आलें तर 'ter de' याचें भाषांतर खालील प्रमाणें करावें लागतें:-

अ.) स्वार्थाच्या वर्तमान काळांत 'पाहिजे किंवा लागतें' या शब्दांनीं. उ० Eu tenho de falar=मला बोलले पाहिजे. o homem tem de trabalhar muito=त्या मनुष्याला पुष्कळ काम--करावें लागतें.

आ.) अपूर्ण भूतकाळीं '....चें होतें' या शब्दांनीं. उ० Eu tinha de comprar um canivete=मला एक चाकू विकत-घ्यावयाचा होता. Ele tinha de sair=त्याला निघावयाचें होतें.

इ.) इतर काळांत 'लागणें' या क्रियापदाच्या रूपांनीं. उ० Eu tive de beber=मला प्यावें लागलें. Elas tiveram de ficar em casa. त्यांना घरीं रहावें-लागलें. Nós teremos de sair já=आह्मांला इतक्यांत निघावें लागेल. Vós terieis de comprar mesmo=तुह्मांला विकत घ्यावें लागलेंच असतें.

**वि. सू. ४३**— पुष्कळ वेळीं या de अव्ययाच्या ऐवजीं que हा शब्द योजतात. उ० Eu tive que comer=मला खावें लागलें.

| | | | |
|---|---|---|---|
| ajuntar | जोडणें, मिळवणें | quadrar | द्विगुणित घात करणें, योग्य होणें जुळणें |
| condenar | शिक्षा देणें | recorrer | दाद मागणें, मदत मागणें |
| equiparar | समान करणें, | resistir | हल्ला परतविणें, प्रतिकार करणें |
| obedecer | आज्ञा पाळणें | sacrificar | अर्पिणें, एकाद्यासाठीं त्यजिणें |
| obviar | काळजी घेणें, दुरुस्त करणें | sobreviver | नंतर जिवंत रहाणें |
| outorgar | देणें, अर्पण करणें | suceder | मागून येणें, घडणें |

### Instrumentos आहुतें

| | | | |
|---|---|---|---|
| afiador | सहाण, निसणा | furador | टिचणी, टोपण |
| agulha | सुई | funda | गोफण |

| | | | |
|---|---|---|---|
| agulhão | दाभण | gadanho | कोयता |
| alavanca | पहार | lança | भाला |
| alfinete | टांचणी | lima | कानस |
| arado | नांगर | machado | कुऱ्हाड |
| balança | तराजु, तागडी | machadinha | लहान कुऱ्हाड |
| bigorna | ऐरण | martelo | घण |
| cinzel, buril | किकरें, विंधणें (विन्धें) | navalha | वस्तरा, वाकर |
| campainha | लहान घंटा | piçäo | खुरपें, टिकाव |
| carabina | बंधुक | pinças | गाव्री, लहान चिमटा |
| enxada | कुदळ, कुदळी | plaina | रांखणी, किसूळ |
| enxadão | पिकासर | relha | जगल |
| enxó | तासणी | serra | करवत |
| espada | तरवार | sino | घांट |
| fole | लोहाराचा भाता | aljava | बाण, भाला |
| forja | लोहाराचा कारखाना, साळ | vassoura | केरसुणी, सारण |
| | | tenaz | चिमटा |
| foice | विळा, कोयता | verrima | गिरवा, सामता |

O rapaz tinha uma funda. Os caçadores tiveram carabinas. O barbeiro não tinha navalha. Os carpinteiros têm buris, plainas, serras, verrimas, limas e martelos. O ferreiro tem bigorna, martelo de ferro e fole na sua forja. Os lavradores têm arados com relhas. Os rendeiros têm foices e bilhas ( भांडीं ) de barro. O ourives não tinha pinças. Os operarios (=मजूर ) têm, enxadas, enxadões, picões e gadanhos. O guerreiro tem espada e carabina. O varredor(झाडू) tinha vassoura. As escolas têm sinos e campainhas. Eu tive de ordenar. Elas terão de obedecer. Nós teriamos de recorrer. O pai teve de sobreviver ao filho. Nós temos de sacrificar a vida. Todos vos tereis de obedecer. Tu não tiveste de resistir muito.

न्हाव्याजवळ सहाण, वस्तरा व कातर असते. त्या पारध्याजवळ बंदुक होती. सुताराकडे आउतें नव्हतीं. मला फार बोलावें लागलें नाहीं.

तुला आज्ञा पाळावी लागेल. मजुरांजवळ सर्व आहुतें होतीं. त्या शिंप्याकडे, सुया, दाभणें, कातरी व अंगुस्तानें होतीं. घिसाड्याकडेही सामते (विंध) असतात. पाथरवटाकडे, पिकांदरें असतात. सुताराकडे तासण्या, रांखण्या, करवती, किकरें व कुदळ्या असतात. तुझ्मेला पुष्कानंतर जिवंत रहाणें लागलें नसतें.

## पाठ ५७ वा.

### १. Haver= असणें.

१७० Haver या क्रियापदाच्या स्वार्थाच्या काळांपैकीं फक्त खालील दोन अनियमित आहेत.

| वर्तमान काळ | | पूर्ण भूत काळ | |
|---|---|---|---|
| ए. व. | अ. व. | ए. व. | अ. व |
| eu hei | nós havemos | eu houve | nós houvemos |
| tu hás | vós haveis | tu houveste | vós houvestes |
| êle há | êles hão | êle houve | êles houveram |

वि. सु. ४४— Haver प्रमाणें rehaver (पुनःअसणें, पुनःमिळविणें) हें क्रियापद चालतें; पण तें अपूर्ण असून, ज्या रूपात v हें अक्षर कायम राहातें तींच रूपें मात्र प्रचारांत आहेत. उ० वर्त. nós havemos, vós haveis.

१७१ Haver हें क्रियापद विशेषतः सहाय्यक म्हणून योजलें जातें व तेव्हां त्याचा अर्थ, सहाय्यक ter प्रमाणेंच होत असतो. परंतु जेव्हां मुख्य क्रियापद म्हणून योजावयाचें असतें तेव्हां तें अकर्तृक व सकर्मक समजलें जातें. सकर्मक म्हणून त्याला नित्य कर्म असावें लागतें. (पुर्तुगिज्मींतील हें कर्म मराठींत 'असणें या क्रियापदाच्या कर्तृस्थानीं घालून भाषांतर करावें लागतें.) आणि अकर्तृक म्हणून

त्याचीं तृतियपुरुषी एकवचनी रूपें तेवढींच योजलीं जातात; इतकेंच नव्हे तर haver हें मुख्य क्रियापद असतां त्याच्या बरोबर येणारें सहाय्य क्रियापदही एकवचनांतच योजावें लागतें, मग त्याचें कर्म कोणत्याही वचनाचें असो. अशा प्रसंगीं या रूपांचें भाषांतर कसें-करावें हें पुढील उदाहरणावरून समजून घ्यावें:—

Há aqui tinteiro?= येथें दौत आहे? Não, aqui há só pe-nas=नाहीं, येथें फक्त लेखण्या आहेत. Não há nem um real na algibeira= खिशांत एक पैही नाहीं. Hoje há de haver fogos= आज दारूकाम असेल. Ontem tambêm havia fo-gos= कालही दारूकाम होतें. Houve homens tais = अशीं माणसें होऊन गेलीं. Em qualquer outra parte do mundo haverá mulheres semilhantes?= जगाच्या दुसऱ्या कोणत्याही भागावर असल्या बायका असतील? Em Gôa tambêm haveria grandes homens= गोव्यांतही मोठे पुरुष असते (झाले असते.).

१७२ Haver च्या रूपांपुढें जेव्हां de, व या शब्दयोगी अव्ययापुढें एखादें, धात्वर्थी असणारें, क्रियापद येतें तेव्हां:—

अ) वर्तमान कालीन रूपांत भविष्य कालीन निश्चयाचा बोध होतो. Eu hei de aprender= मी शिकेनच. Ela há de comer= ती खाईलच.

आ) अपूर्ण भूतकाळीं संकेताचा बोध होतो. उ० Eu havia de es-tudar= मी शिकतों (= शिकलों असतों.) Tu havias de sair= तुं निघाला असतास. (इतर काळीं haver de चा फारसा उपयोग करित नाहींत.).

१७३ Haver च्या रूपांपुढें कालवाचक नाम आलें असतां तितक्या "कालामागें" असा अर्थ होतो. उ० Há quatro anos= चार वर्षां पूर्वीं. Havia sete dias= सात दिवसांमागें. Haverá uns dois anos= एक-दोन वर्षें झालीं असतील.

**वि. सू. ४९—** Estar, ser, ter व haver या सर्वांस 'असणें' हा अर्थ असू शकत असल्यानें त्यांतील भेद विद्यार्थ्यांनीं विशेष बारकाईनें लक्ष्यांत ठेवावा.

## पाठ ५८ वा

### काळ=temp

| | | | |
|---|---|---|---|
| segundo | सेकंद | mês | महिना |
| minuto | मिनिट | trimestre | तिमाही |
| hora | तास | semestre | सहामाही |
| dia | दिवस | ano | वर्ष |
| manhã | सकाळ | ano bissexto | ३६६ दिवसांचें वर्ष |
| meio dia | दुपार, माध्यान्ह | ano solar | सौरवर्ष |
| tarde | संध्याकाळ | ano lunar | चांद्रवर्ष |
| semana | आठवडा | ano lectivo | शैक्षणिकवर्ष |
| quinzena | पंधरवडा, पक्ष | ano económico | व्यापारी वर्ष |
| lua cheia | पौर्णिमा | século | शतक |
| lua nova | अमावास्या | era | शक |

| वर्षाचे काळ | estações de ano |
|---|---|
| primavera | वसंत काळ |
| outono | शरत्काल |
| verão | उष्णकाळ |
| inverno | हिमकाल |

| आठवड्याचे दिवस | dias de semana |
|---|---|
| Domingo | रविवार |
| segunda-feira | सोमवार |
| terça-feira | मंगळवार |
| quarta-feira | बुधवार |
| quinta-feira | गुरुवार |
| sexta-feira | शुक्रवार |
| sábado | शनिवार |

| वर्षाचे महिने | meses de ano |
|---|---|
| Janeiro | जानेवारी |
| Fevereiro | फब्रुवारी |
| Março | मार्च |
| Abril | एप्रील |
| Maio | मे |
| Junho | जून |
| Julho | जुलै |
| Agosto | ऑगस्ट |
| Setembro | सप्टेंबर |
| Outubro | ऑक्टोबर |
| Novembro | नव्हेंबर |
| Dezembro | डिसेंबर |

वि. सू. ४६— एका आठवड्याला सात दिवस असतात, वर्षाला बारा महिने आहेत. वगैरे सारखीं वाक्यें पुर्तुगीजींत दोन प्रकारें करण्याचा प्रघात आहे:- Uma semana tem sete dias. Um ano tem doze meses. किंवा, Há sete dias em uma semana. Há doze meses em um ano.

Um século tem cem anos. Aquí não há mesas há só cadeiras. Há quatro estações em um ano. Nós haviamos de comprar ambas as casas. Eu havia de estudar a lição mas não tinha livro. Eu tenho de sair e hei de sair. Eu vendi ambos os cavalos, há oito dias. Aqui deve haver muitos livros. Deve, sim, mas não há. Estará aberta a farmácia? Aquela não é farmácia, é drogaria. Há quinze dias em uma quinzena. Um minuto tem sessenta segundos.

एका तासाला साठ मिनिटें असतात. मला बोलले पाहिजे आणि मी बोलेनच. मी तो धडा आठ दिवसांमागें शिकलों. तेथें पुष्कळ घरें असावयाचीं. दोहोंत शाई आहे? तेथें आंब्याचीं झाडें असतील? विद्वान लोक होऊन गेले. पुर्तुगीज लोक मोठे शूर आहेत. घरांना छपरें असतात. फुलाला वास नव्हता. तो कोठें असेल? येथें न्हावी आहेत काय? रहदारीजवळ एक सुंदर कुत्रा होता. पण तो आतां कोठें आहे? मी तुम्हाला उद्यां एक सुंदर राजवाडा दाखवीन. तुम्ही मला पांच रुपये द्याल काय? मी फार गरीब झालों आहे. साधू गरीबच असतात.

## पाठ ५९ वा.

## अनियमित क्रियापदें (पुढें चालू)

१७४ खालील क्रियापदांचे, स्वार्थाच्या काळांपैकीं फक्त खालीं दिलेले काळ अनियमित व इतर नियमित आहेत.

### 4. Caber मावणें, योग्य होणें.

वर्त. caibo, cabes cabe, cabemos, cabeis, cabem.

पूर्ण भू. coube coubeste, coube, coubemos, coubestes, couberam.

## 5. Crer विश्वास ठेवणें, श्रद्धा असणें.

वर्त. creio, crês, crê, cremos, credes crêm.

वि. सू. ४७— crer प्रमाणें descrer (=विश्वास न ठेवणें, खोटें मानणें) हें क्रियापद चालतें.

## 6. Dizer सांगणें

वर्त. digo, dizes, diz, dizemos, dizeis, dizem.
पू. भू. disse, disseste disse, dissemos, dissestes, disseram.
अ. भू. direi, dirás, dirá, diremos, direis, dirão.
भ. भू. diria, dirias, diria, diríamos, diríeis, diriam.

वि. सू. ४८— Dizer प्रमाणें खालील क्रियापदें चालतात:—

| | |
|---|---|
| bendizer | वाखाणणें, चांगलें बोलणें |
| condizer | जुळणें, प्रमाणांत असणें |
| contradizer | विरुद्ध सांगणें, प्रतिकार करणें |
| desdizer | उलट सांगणें |
| maldizer | निंदा करणें, वाईट बोलणें |
| predizer | पूर्वी सांगणें, भविष्यकरणें |

## 7. Fazer करणें

वर्त. faço fazes, faz, fazemos, fazeis, fazem.
पू. भू. fiz, fizeste, fez, fizemos, fizestes, fizeram.
अ. भ. farei, farás, fará, faremos, fareis, farão.
भ. भू. faria, farias, faria, faríamos, faríeis, fariam.

वि. सू. ४९— Fazer प्रमाणें खालील क्रियापदें चालतात:—

| | |
|---|---|
| afazer | सवय करणें, अंगवळणी पाडणें |
| contrafazer | नक्कलकरणें, अनुसरणें |

| | |
|---|---|
| desfazer | वितळविणें, नाश करणें |
| liquefazer | वितळविणें, पाणी करणें |
| perfazer | पूर्णकरणें, संख्यावाढवणें |
| rarefazer | पातळ करणें |
| refazer | पुनः करणें |
| satisfazer | संतोष–आनंद देणें |

**8. Jazer** पडलेला असणें

वर्त. Jazo, Jazes, jaz, jazemos, jazeis, jazem.

---

## पाठ ६० वा

**9. Ler** वाचणें

वर्तमान– leio, lês, lê, lêmos, ledes, lêm.

वि. सू. ५०— Ler प्रमाणें, reler (=पुनः वाचणें) व tresler (वेडा होणें) हीं क्रि० चालतात.

**10. Perder** सांडवणें गमवणें

वर्त. perco, perdes, perde, perdemos, perdeis, perdem.

**11. Poder** शकणें

वर्त. posso, podes, pode, podemos, podeis, podem.
पू. भू. pude, pudeste, poude, pudemos, pudestes, puderam.

**12. Pôr** घालणें, ठेवणें (क. १०१ पहा.)

वर्त. ponho, pões, põe, pomos, pondes, põem.
अ. भू. punha, punhas, punha, púnhamos, púnheis, punham
पू. भू. puz, puzeste, poz, puzemos, puzestes, puzeram.
भ. भू. porei, porás, porá, poremos, poreis, porão.
भ. भू. poria, porias, poria, poríamos, poríeis, poriam.

वि. सू. ५१— Pôr प्रमाणें खालील क्रियापदें चालतात:—

| | |
|---|---|
| antepor | आधीं.-पूर्वी घालणें, अधिक महत्व देणें |
| apor | वर घालणें, बरोबर लावणें |
| compor | घडविणें, बनविणें, रचणें |
| contrapor | समोर लावणें, उलट घालणें |
| decompor | पृथःकरण-विभाग करणें |
| depor | बाजूला घालणें, साक्ष देणें |
| descompor | बदलणें, टांकून-टोंचून बोलणें |
| dispor | व्यवस्थेशीरलावणें, तयार असणें |
| entrepor | मध्यें घालणें |
| expor | बाहेर घालणें, मांडणें |
| impor | वर घालणें, वजन पाडणें, भाग पाडणें |
| indispor | व्यवस्था बिघडणें, रागावणें. |
| interpor | मध्यें घालणें |
| opor | विरुद्ध घालणें |
| pospor | नंतर-मागें घालणें |
| predispor | तयार ठेवणें |
| prepor | पुढें घालणें, आधीं पसंत करणें |
| pressupor | ताडणें |
| propor | पुढें आणणें, ठराव मांडणें |
| recompor | पुनः रचणें, नवीन रूप देणें |
| repor | परत करणें, पुनः घालणें |
| sotopor | खालीं घालणें, नंतर घालणें |
| supor | समजणें, कल्पना करणें |
| transpor | उलटापालट करणें, वर घालणें |

वि. सू. ५२— Poder याचा अर्थ 'शकणें' असा आहे. परंतु कित्येक ठिकाणीं -विशेषतः प्रश्नार्थक वाक्यांत—त्याचा अर्थ 'परवानगी असणें' असा होऊं शकतो. उ० Eu posso fazer isto=मी हें करूं शकतों. Posso eu entrar? मला आंत येण्याला परवानगी आहे काय? Sim senhor, pode perfeitamente=होय महाराज, पूर्ण परवानगी आहे. (Poder व dever यांतील फरक लक्ष्यांत येण्याकरतां वि. सू. २८ पहा.)

**वि. सू. ५३**— Fazer या क्रियापदांच्या रूपांबरोबर कांहीं—विशेषतः हवामानदर्शक—शब्द आले असतां त्यांचें भाषांतर होणें, पडणें, इत्यादि क्रियापदांच्या रूपानीं करावें लागतें, उ० Ontem fazia muito calor =काल उष्मा फार होत होता, Hoje faz frio= आज थंडी वाजत आहे, Amanhã fará vento=उद्यां जोराचा हारा वाहूं लागेल, fazer nevoeiro=धुकें पडणें, इ०

---

## पाठ ६१ वा

### 13 Prazer आवडणें

हें क्रियापद अपूर्ण असून त्याला फक्त एकवचनाचीं तृतिय पुरुषी रूपें-च तेवढीं आहेत.

वर्त. praz. पू. भू. prouve,

**वि. सू. ५४**— aprazer (=आवडणें) व desprazer (=नावडणें) हीं दोन्हीं prazer प्रमाणें चालतात. पण तीं पूर्ण आहेत. Comprazer (=आवडणें) हें नियमित आहे. पण स्वार्थाच्या वर्तमानकालाचें तृतिय पुरुषी एकवचनीरूप compraze असें आहे.

### 14 Querer पाहिजे असणें, इच्छिणें

वर्त. quero, queres, quere, queremos, quereis, querem.
पू. भू. quiz, quizeste, quiz, quizemos, quizestes, quizeram.

### 15. Requerer अर्जकरणें, गरज असणें.

वर्त. requeiro, requeres, requere, requeremos requereis, requerem.

### 16. Saber जाणणें, ठाऊक असणें

वर्त. sei, sabes, sabe, sabemos, sabeis, sabem.
पू. भू. soube, soubeste soube, soubemos, soubestes, souberam

### 17. Trazer आण

वर्त. trago, trazes, traz, trazemos, t-eis, trazem.
पू. भू. trouxe, trouxeste, trouxe, rouxemos, trouxestes, trouxeram
अ. भ. trarei, trarás, trará, trar-ios, trareis, trarão
भ. भू. traria, trarias, traria, tra-amos, trarieis, trariam.

### 18. Valer किंमत असणें, उपयोगी पडणें

वर्त. valho, vales, vale, valenos, valeis, valem.

वि. सू. ५५— Valer प्रमाणें desvaler(=उपयोगी न पडणें, हिणकस होणें) व equivaler(=बरोबर होणें, समान होणें) ही क्रियापदें चालतात.

### 19. Ver पहाणें

वर्त. vejo, vês, -ê, vemos, vêdes, vêem
पू. भू. vi, viste, viu, vimos, vistes, viram.

वि. सू. ५६— Ver प्रमाणें, antever, pre-ver (-ढ़े पहाणें), entrever=(पुसट पुसट पहाणें.) व rever (. पासणें) हीं क्रियापदें चालतात. Prover (=पुरवठा करणें) व desprover (=संपवणें, खलास करणें) हीं, ver प्रमाणें चालतात. तथापि स्वार्थाच्या भूतकाळीं, त्याच्यावरून तयार होणाऱ्या इतर काळीं व भूतकाळवाचक धातुसाधित अव्ययाच्या बाबतींत नियमित क्रियापदाप्रमाणें चालतात.

## पाठ ६२ वा.

## अनियमित क्रियापदें—तृतिय गण

१७५ तृतिय गणांत ७ सिद्ध क्रियापदें व स्वार्थाच्या काळांपैकीं खालीं दिलेले त्यांचे काळ अनियमित असून इतर नियमित आहेत.

### 1. Frigir तळणें

वर्त. frijo, freges, frege, frigimos, frigis, fregem.

### 2. Ir जाणें

वर्त. vou, vais, vai, vamos ou imos, ides, vão
पू. भू. fui, foste, foi, fomos, fostes, foram

वि. सू. ४७— Ser व ir या दोन्हीं क्रियापदांची स्वार्थाच्या भूतकाळांचीं व त्याचप्रमाणें इतर कांहीं वेळांचीं रूपें एकसारखीं आहेत. जेंव्हां या रूपांबरोबर एखादें विशेषण येतें तेंव्हां तीं ser चीं व जेंव्हां एखादा स्थळदर्शक शब्द येतो तेंव्हां ir चीं आहेत असा सर्वसाधारण नियम आहे.

### 3. Medir मापणें, मोजणें

वर्त. meço, medes, mede, medimos, medis, medem.

### 4. Pedir

वर्त. peço, pedes, pede, pedimos, pedis, pedem.

### 5. Ouvir ऐकणें

वर्त. ouço, ouves, ouve, ouvimos, ouvis, ouvem.

### 6. Rir हंसणें

वर्त. rio, ris, ri, rimos, rides, riem.

वि. सू. ५८— Rir प्रमाणें sorrir (=गालांत हंसणें) हें क्रियापद चालतें.

### 7. Vir

वर्त. venho, vens, vem, vimos, vindes, vêm.
अ. भू. vinha. vinhas, vinha, vínhamos, vínheis, vinham.
पू. भू. vim, vieste, veio, viemos, viestes. vieram.

वि. सू. ५९— vir प्रमाणें खालील क्रियापदें. चालतात:—

| | | | |
|---|---|---|---|
| advir | पोंचणें, घडणें | desavir | अमान्य होणें, न जुळणें |
| avir | परवडणें, गुण्यागोविंदानें रहाणें | intervir | मध्यें येणें, मध्यस्ती करणें |
| contravir | मोडणें, उत्तरकरणें | provir | उगम पावणें ...वरून येणें |
| convir | परवडणें, सोईस्कर असणें, खपणें | sobrevir | नंतर घडणें, पोंचणें |

REFBK-0002373

REFBK-0002373